सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर बुधवार, दि. २३ एप्रिल २०२५ वर्ष - तिसरे अंक २२ पाने : ८ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## फडणवीस सांगतील तसं चालणार! थोपटेंनंतर तांबेही भाजपाच्या दिशेने?

पुणे : पुण्यातून काँग्रेससाठी आणखी एक धक्का देणारी राजकीय कुजबुज सुरु झाली आहे. संग्राम थोपटेंनी काँग्रेसचा राजीनामा देत थेट भाजपात उडी घेतली आणि त्या पाठोपाठ आता माजी काँग्रेस आमदार सत्यजित तांबे यांनीही भाजपा प्रवेशाचे संकेत दिले आहेत. 'फडणवीसांचं नेतृत्व आवडतं, ते सांगतील तशी वाटचाल करणार' या वक्तव्यानं त्यांनी आपली पुढील दिशा स्पष्ट करत काँग्रेससाठी नवा पेच निर्माण केला आहे.

सत्यजित तांबे म्हणतात, फडणवीसांसोबत काम करताना एक वेगळाच अनुभव येतो. त्यांचे नेतृत्व स्पष्ट आहे, ते दिशा दाखवतात, ताकद देतात. त्यामुळे माझी पुढची वाटचाल काय असेल हे ते ठरवतील. एवढं म्हणताना त्यांनी भाजपाकडे वाट वळवल्याचे अघोषित संकेत दिले.

तांबे यांनी काँग्रेसबद्दलची नाराजीही थेटपणे व्यक्त केली आहे. त्यांनी स्पष्ट सांगितले की, काँग्रेसमध्ये सध्या भ्रमनिरास पसरलेला आहे. पक्षात पराभूत नेत्यांकडे लक्ष दिलं जातं, विजयी नेत्यांकडे नाही. महाविकास आघाडीच्या काळात सत्ता असूनही जनाधार असलेल्या नेत्यांना महामंडळं मिळाली नाहीत, ही पक्षाची मोठी चूक होती. त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये नैराश्य आहे आणि काँग्रेसचं नेतृत्व या प्रश्नांकडे दुर्लक्ष करतंय.

त्यांच्या शब्दांतून एक वेदना होती की, पक्षाने त्यांची हकालपट्टी केली आणि पुन्हा सामील होण्यासाठी कित्येकदा विनंती करावी लागली, तरीही दारं उघडली गेली नाहीत. त्यांना वाटतंय की काँग्रेसमध्ये आता नेतृत्व करतायत ते लोक जनाधाराविना आहेत आणि यामुळे पक्षाची अवस्था दिवसेंदिवस गंभीर होणार आहे.

या पार्श्वभूमीवर संग्राम थोपटे भाजपात गेले, आता तांबेही त्यांच्या पावलावर पाऊल टाकणार का, हा प्रश्न उपस्थित झाला आहे. त्यांचं 'फडणवीस सांगतील तसं' हे विधान म्हणजे प्रत्यक्ष भाजपाप्रवेशाची पूर्वसूचना तर नाही ना? राजकीय वर्तुळात याबाबत जोरदार चर्चा सुरू आहेत.

# जम्मू-काश्मीरमधील पर्यटकांवर दहशतवाद्यांकडून अंदाधुंद गोळीबार

### एक ठार तर अनेकजण गंभीर जखमी

पहलगाम: जम्मू-काश्मीरमधील (गर्राी रपव घरीहाळी) पहलगाम येथील पर्यटकांवर आज दहशतवादी (झरहरश्रसरा ढर्शाी –ीींरलज्ञ) हल्ला झाला आहे. सूत्रांकडून मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार दहशतवाद्यांनी पर्यटकांच्या गटाला लक्ष्य करून अंदाधुंद गोळीबार केला. या गोळीबारात दहा किंवा त्याहून अधिक पर्यटक जखमी झाले असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

पर्यटकांमध्ये अत्यंत लोकप्रिय असलेल्या दक्षिण काश्मीरमधील पहलगाम भागात एक धक्कादायक घटना घडली आहे. जिथे उन्हाळ्यामुळे हजारो पर्यटक दरवर्षी भेटी देत असतात, यावर्षी देखील अनेक लोक या भागात पर्यटनाचा आनंद घेत असताना, पर्यटकांच्या एका



गटावर दहशतवाद्यांनी हल्ला केला आहे. ज्यामुळे परिसरात प्रचंड तणाव निर्माण झाला आहे.

जखमींना तातडीने वैद्यकीय मदत पुरवण्यासाठी प्रयत्न सुरू, सुरक्षा यंत्रणा सतर्क

सुरुवातीच्या वृत्तानुसार दहशतवाद्यांनी पर्यटकांच्या गटाला लक्ष्य करून अंदाधुंद गोळीबार केला. या गोळीबारात दहा

किंवा त्याहून अधिक पर्यटक जखमी झाले असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. जखमींना तातडीने वैद्यकीय मदत पुरवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. मात्र, हल्ल्याचे ठिकाण डोंगराळ आणि दुर्गम भागात असल्याने मदत कार्यात विलंब होण्याची शक्यता आहे. या घटनेची माहिती मिळताच परिसरातील सुरक्षा यंत्रणा तातडीने सतर्क झाली आहे. अतिरिक्त सुरक्षा दल घटनास्थळी रवाना झाले असून, परिसराची नाकेबंदी करण्यात आली आहे. दहशतवाद्यांचा शोध घेण्यासाठी मोठे शोध अभियान सुरू करण्यात आले आहे. मात्र घनदाट जंगल आणि डोंगराळ भागामुळे दहशतवादी सहजपणे लपून बसण्याची शक्यता असल्याने सुरक्षा दलांना अत्यंत सावधगिरीने कारवाई करावी लागत आहे. हा हल्ला पहलगाममधील बैसरण परिसरात झाल्याची माहिती समोर येत आहे.

टीआरएफ या दहशतवादी संघटनेचा हात !

या हल्ल्यामागे 'द रेझिस्टन्स फ्रंट' (टीआरएफ) या दहशतवादी संघटनेचा हात असल्याचा संशय व्यक्त होत आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, दहशतवाद्यांनी पर्यटकांना नाव विचारून त्यांच्यावर गोळीबार केला. गुप्तचर यंत्रणांच्या माहितीनुसार, प्राथमिक तपासात टीआरएफ या दहशतवादी संघटनेचे नाव समोर येत आहे. हल्लेखोर पोलीस गणवेशात होते आणि त्यांची संख्या २ ते ३ असल्याचे सांगितले जात आहे. हा हल्ला विशेषतः पर्यटकांना लक्ष्य करून घडवण्यात आला होता.

## टायगर श्रॉफला जीवे मारण्याची धमकी! खोटी माहिती देणाऱ्या व्यक्तीला पंजाबमधून अटक

मुंबई: टायगर श्रॉफला जीवे मारण्याच्या धमकी संदर्भात केलेल्या खोट्या तक्रारीबद्दल, मुंबई पोलिसांनी पंजाबमधील एका व्यक्तीला अटक केली आहे.

बॉलिवूड स्टार टायगर श्रॉफला जीवे मारण्याचा कट रचला जात असल्याची माहिती एका व्यक्तीने मुंबई पोलिसांना दिली होती. मात्र, ही माहिती खोटी असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे खोटी माहिती देणाऱ्या व्यक्तीला पंजाबमधून अटक करण्यात आली आहे.

खोटी बातमी देणाऱ्या व्यक्तीची ओळख

मुंबईतील खार पोलिस स्टेशनच्या पोलिस अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, खोटी बातमी देणाऱ्या व्यक्तीचे नाव मनीष कुमार सुजिंदर सिंग असे आहे. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, त्या व्यक्तीने खोटा दावा केला होता की टायगर श्रॉफला मारण्यासाठी काही लोकांना २ लाख रुपये आणि शस्त्रे देण्यात आली होती.

पोलिसांना देण्यात आली चुकीची माहिती

पोलीस अधिकाऱ्याने पुढे सांगितले की, आरोपींनी पोलिसांना फोन करून माहिती दिली की सुरक्षा एजन्सीशी संबंधित काही लोक टायगर श्रॉफला मारण्याचा कट रचत आहेत. पोलिसांनी तपास केला तेव्हा असे आढळून आले की ही फक्त एक अफवा होती आणि सिंग यांनी पोलिसांना चुकीची माहिती दिली होती.

खोटी माहिती देणाऱ्यावर गुन्हा दाखल

मुंबई पोलिसांनी सिंहविरुद्ध खारमध्ये गुन्हा दाखल करून, पंजाब पोलिसांशी संपर्क साधला. त्यानंतर पंजाब पोलिसांनी त्या माणसाला अटक केली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीला मुंबईत आणले जात आहे.

टायगर श्रॉफ 'बागी ४' च्या चित्रीकरणात व्यस्त

सध्या टायगर श्रॉफ 'बागी ४' या त्याच्या आगामी चित्रपटाच्या चित्रीकरणामध्ये व्यस्त आहे. हा चित्रपट ५ सप्टेंबर रोजी सिनेमागृहात प्रदर्शित होणार आहे. गेल्या वर्षी १८ नोव्हेंबर रोजी या चित्रपटाची घोषणा करण्यात आली होती. या चित्रपटाचे दिग्दर्शन ए हर्ष करीत आहेत.

# पितांबरी उद्योगसमूहाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. रविंद्र प्रभुदेसाई यांचा ठाणेकरांच्या वतीने नागरी सत्कार !

### भरगच्चं सभागृहात गौरव सोहळा संपन्न

ठाणे : 'डॉक्टर' ही पदवी मी केवळ नावामागे लावायचा मान म्हणून पाहत नाही, तर तिच्यामागे दडलेला विचार उद्योगासाठी खूप महत्त्वाचा आहे. 'डी' – 'डिफरेंशिएटर' अर्थात आपल्या प्रॉडक्टचं वेगळेपण, 'ओ' – 'ऑब्जेक्टिव्ह' म्हणजे उद्योगाचं स्पष्ट ध्येय आणि उद्दिष्ट असणे, 'सी' – 'कलेक्टिवली' म्हणजे टीमवर्क आणि एकजूट, 'टी' – टाइम मॅनेजमेंट अर्थात वेळेचं काटेकोर नियोजन, 'ओ' – ऑर्डर म्हणजे नियोजनबद्ध अंमलबजावणी, 'आर' – रिझल्ट म्हणजे शंभर टक्के रिझल्टची खात्री. अशा प्रकारे 'डॉक्टर'या शब्दातील प्रत्येक अक्षर पितांबरी उद्योगाच्या यशाचा पाया आहे. म्हणूनच पितांबरी उद्योगाला पाठबळ देणाऱ्या प्रत्येक संस्थेला, मला मिळालेली ही 'डॉक्टरेट' पदवी मनःपूर्वक अर्पण करतो. असे प्रतिपादन डॉ. रविंद्र प्रभुदेसाई यांनी पुरस्कार स्विकारताना केले.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांच्यावतीने उद्योगक्षेत्रातील नेत्रदीपक कर्तृत्व आणि सामाजिक क्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल पितांबरीचे व्यवस्थापकीय संचालक रविंद्र प्रभुदेसाई यांना नुकतीच डि. लिट. ही मानाची पदवी प्रदान करण्यात आली. या निमित्त त्यांचा नागरी सत्कार गुरुवारी डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात नागरी अभिवादन सत्कार समिती, ठाणेच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर, प्रसिद्ध व्याख्याते डॉ. सच्चिदानंद शेवडे,




चितळे उद्योगसमूहाचे श्रीकृष्ण चितळे, आमदार संजय केळकर, आमदार निरंजन डावखरे आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. ठाणेकरांची उपस्थिती लाभलेल्या आणि ब्रह्मवृंद आशीर्वचनाने मंत्रमुग्ध झालेल्या भरगच्चं सभागृहात मान्यवरांच्या हस्ते पुणेरी पगडी आणि मानपत्र देऊन डॉ. रविंद्र प्रभुदेसाई यांचा सत्कार करण्यात आला.

ठाण्यातील जवळपास २५ हून अधिक प्रतिष्ठित संस्था, त्यांचे पदाधिकारी, प्रतिनिधी आणि ठाणेकर नागरिक मोठ्या संख्येने या गौरव सोहळ्याला उपस्थित राहिले होते.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी डॉ. रविंद्र प्रभुदेसाई यांना डॉक्टरेट प्राप्त झाल्याविषयी पाठवलेल्या संदेशाचे व्यासपीठावरून वाचन करण्यात आले.

रविंद्र प्रभुदेसाई यांनी पुढे बोलताना देशी गाईंचे आरोग्यदायी आणि आध्यात्मिक महत्व अधोरेखित करत पितांबरीच्या गोमूत्र कॅप्सूलची निर्मिती आणि परिणामकारकता याविषयी माहिती दिली. तसेच भविष्यात गोमूत्रावर अधिक संशोधन करण्याची आवश्यकता असल्याचे मतही त्यांनी यावेळी व्यक्त केले. सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या मार्गदर्शनाने व सनातन संस्थेच्या मार्गदर्शन तत्वानुसार गुरुकृपा योगानुसार साधना ही पितांबरीच्या व्यावसायिक वृद्धीसाठी कशी साहाय्यभूत ठरली तसेच ऐहिक आणि आध्यात्मिक अडचणी सुटण्यासाठी साधना का आवश्यक आहे हे देखील त्यांनी सांगितले.

दरम्यान, रविंद्र प्रभुदेसाई यांचे उद्योग, सामाजिक व आध्यात्मिक कार्यातील मोलाचे योगदान उलगडणारा लघुपट दाखविण्यात आला. तसेच प्रभुदेसाई यांच्या प्रेरणादायी वाटचालीविषयीचा लेख, सविस्तर माहिती आणि अभिप्रायांचा समावेश असलेली स्मरणिका यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आली.

मी देशाचा आणि देश माझा. माझ्या देशासाठी अधिकाधिक काय करता येईल या विचारातून रविंद्रजींनी उद्योग क्षेत्रात कार्य केले. उद्योगात प्रगती करतानाच अनेक सामाजिक, धार्मिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थांना साहाय्य केले. असे मत डॉ. सच्चिदानंद शेवडे यांनी व्यक्त केले.

सरस्वती आणि लक्ष्मी एकत्र असाव्यात त्याचप्रमाणे आध्यात्म आणि उद्योग यामध्येही विरोधाभास नाही. एका मराठी उद्योजकाने आपल्या उत्पादनाच्या माध्यमातून जागतिक स्तरावर झेप घेतली. म्हणून त्यांचा सन्मान हा ठाणेकरांच्या शिरपेचात मानाचा तुरा आहे. अशा शब्दात डॉ. काकोडकरांनी प्रभुदेसाई यांचा गौरव केला.

रविंद्र प्रभुदेसाई यांच्या उदाहरणातून उद्योग आणि व्यवसाय वेगळे नाहीत हे लक्षात येते. त्यांची ही घौडदौड गुरूंच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. ते भविष्यात व्यवसायात पुष्कळ प्रगती करतील असे मत श्रीकृष्ण चितळे यांनी व्यक्त केले.

राजकारणात काम करताना सचोटीने काम करणारे मोजके उद्योजक पाहिले, त्यात रविंद्र प्रभुदेसाई हे एक आहेत. त्यांच्या कामात शिस्त आहे. त्यांच्या कार्यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा मोठा पगडा आहे. यशस्वी व्यक्तीमध्ये अहंकारमुक्त नम्रता दुर्मिळ असते, रविंद्रजींमध्ये ती पाहायला मिळते. नेहमी प्रसन्नमुख असणारे उद्योजक ठाण्याला लाभले हे ठाणे शहराचं भाग्य आहे असे गौरवोद्गार आमदार संजय केळकर यांनी काढले. तर समाजातील प्रत्येक घटकाला ते साहाय्य करण्यासाठी प्रयत्नशील असतात. केवळ आर्थिक नव्हे तर वैचारिक धनही त्यांनी समाजाला दिले आहे. असे मत आमदार निरंजन डावखरे यांनी डॉ. रविंद्र प्रभुदेसाई यांच्याबद्दल व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभिनेते अधोक्षज कऱ्हाडे यांनी केले तसेच कार्यक्रमाचे प्रास्ताविक संजय ढवळीकर यांनी केले.

## बालकामगार, बालभिक्षेकरी व शाळाबाह्य मुलांचे सर्वेक्षण करा - जिल्हाधिकारी

छत्रपती संभाजीनगर, २२ एप्रिल : जिल्ह्यातील बालकांना शिक्षण, आरोग्य, आणि त्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी सर्व समावेशक प्रयत्न करावेत. त्यासाठी आधी बाल भिक्षेकरी, बालकामगार, शाळाबाह्य मुले यांचे सर्वेक्षण करण्यासाठी विशेष मोहीम राबवावी असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज दिले. महिला बालकल्याण विभागाची आढावा बैठक आज पार पडली.

जिल्ह्यात शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे, त्यांची आरोग्य तपासणी व त्यांच्या हक्काचे संरक्षण करण्याबाबत सर्व समित्यांनी समन्वयाने काम करावे.

बालभिक्षेकरी, बालकामगार यांच्या हक्कासाठी पोलीस प्रशासनाने जिल्हा महिला बालविकास कार्यालयाच्या समन्वयाने पुढाकार घ्यावा असे, निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी बैठकीत दिले.

जिल्ह्यामध्ये बालविवाह प्रतिबंधाबरोबरच मुलीचा जन्मदर वाढवण्यासाठी जाणीव जागृती करावी. ग्रामीण भागातील ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका, ग्रामपंचायत यांच्या माध्यमातून मुलीच्या जन्माचे स्वागत करून मानसिकता बदल करण्यासाठी समुपदेशन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

जिल्ह्यातील महिला बचत गटांना हिमरू शाल निर्मितीचे प्रशिक्षण देऊन एक जिल्हा एक उत्पादन या अंतर्गत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे हिमरूशालीचे उत्पादन वाढवण्यासाठी तसेच बाजारपेठ उपलब्धतेसाठी महिला आर्थिक विकास महामंडळ व इतर विभागाच्या अंतर्गत कार्यरत असणाऱ्या बचत गटांनी या संदर्भात नियोजन करावे असे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिले.

बैठकीमध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजना, सखी वन स्टॉप सेंटर,. बालगृह, निरीक्षणगृह त्यांच्यामध्ये प्रवेशित बालकांची संख्या, महिलांसाठी अभयगृह, तात्पुरता निवारा, भरोसा सेल, विवाहपूर्व समुपदेशन केंद्र. बालकांसाठी सानुग्रह अनुदान योजना याबरोबरच केंद्र शासनाच्या महिला व बालकांसाठी असलेल्या योजनांचा आढावा बैठकीत घेण्यात आला.

जिल्ह्यातील सिल्लोड, सोयगाव या तालुक्यामध्ये कौटुंबिक हिंसाचार, व्यसनधीनता व मुलीच्या जन्माचे प्रमाण कमी असल्याच्या विविध कारणांची विश्लेषणात्मक माहिती सादर करण्यात आली. येथे निरक्षरता प्रथा, परंपरा आणि व्यसनाधीनता यामुळे असे प्रकार होत असल्याचे निदर्शनास आले असून यावर समुपदेशन, उपाययोजनात्मक कार्यक्रम राबवण्यासंदर्भात जिल्हाधिकारी यांनी सुचित केले.

विविध योजनांच्या अंमलबजावणी विषयीची सद्यस्थिती व उपाय योजना याचा आढावा जिल्हा महिला बालविकास अधिकारी रेशमा चीमंद्रे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी महादेव डोंगरे यांनी समिती सदस्यांसमोर सादर केला.

## भावे आणि कंपनीचे कुंभारवाड्यातील दुकानास आग

छत्रपती संभाजीनगर, २२ एप्रिल – आज पहाटे ४.४० भावे आणि कंपनीच्या कुंभारवाड्यातील दुकानातून धूर येत असल्याचे एकाने पाहून भावे आणि कंपनीचे संचालक विश्वजीत भावे यांना एका व्यक्तीनी फोन करुन कळविले.विश्वजीत भावे जवळच रहात असल्याने ते लगेचच दुकानासमोर आले.धूर खूप येत होता.त्यानी लगेचच अग्निशमन दलाच्या कार्यालयात फोन करुन कळविले.दहा मिनीटातच अग्निशमन दलाची टीम कुंभारवाड्यात पोहोचली.अग्नी शामक दलाच्या जवानांच्या तप्तरतेमुळे मोठा अनर्थ टळला.आग आटोक्यात आणली.शार्ट सर्कीटमुळेच ही आग लागली असावी असा अंदाज व्यक्त केला जात आहे.भावेयांच्या मतां नुसार १५ लाखांहून अधिक रुपयांचे नुकसान झालेले असावे. भावे आणि कंपनीचे सर्वेसर्वा असणारे विश्वजीत भावे म्हणाले अक्षय्य तृतीया.. परशुराम जयंती उत्सव समोरच असताना या आगीच्या मुळे झालेलं हे लाखो रुपयांचे नुकसान भरुन निघणार नाही .



# यूपीएससी'चा निकाल जाहीर! महाराष्ट्राचा अर्चित डोंगरेने मारली बाजी

नवी दिल्ली : देशातील सर्वात स्पर्धात्मक परीक्षांपैकी एक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या णझडउ उडए मध्ये दरवर्षी लाखो इच्छुकांचा सहभाग दिसून येतो. ही परीक्षा भारतीय प्रशासकीय सेवा (IAS), भारतीय पोलिस सेवा (IPS), भारतीय परराष्ट्र सेवा (IFS), भारतीय महसूल सेवा, भारतीय व्यापार सेवा आणि इतर गट अ (A) आणि ब (B) केंद्रीय सेवांसारख्या प्रतिष्ठित पदांसाठी प्रवेशद्वार म्हणून घेण्यात येते. दरवर्षीप्रमाणे यंदाही केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत यूपीएससी परीक्षा घेण्यात आली होती. या परीक्षेचा नुकताच निकाल जाहीर झाला असून महाराष्ट्राने बाजी मारली आहे.

यंदाच्या यूपीएससी परीक्षेत उत्तरप्रदेश प्रयागराजयेथील शक्ति दुबे या विद्यार्थ्याने देशात पहिला क्रमांक पटकावला असून हर्षिता गोयल देशात दुसरी आली आहे. तर महाराष्ट्राचा अर्चित डोंगरेने देशात तिसरा क्रमांक पटकावत बाजी मारली आहे.

एकूण १००९ उमेदवार यूपीएससी उत्तीर्ण

केंद्रीय लोकसेवा आयोगाने (UPSC) २०२४ च्या नागरी सेवा परीक्षामध्ये नियुक्तीसाठी एकूण १,००९ उमेदवारांची निवड केली आहे. या उमेदवारांना भारतीय प्रशासकीय सेवा (IAS), भारतीय परराष्ट्र सेवा (IFS), भारतीय पोलिस सेवा (IPS) आणि इतर केंद्रीय सेवा (गट अ आणि ब) या पदांवर नियुक्त केले जाईल. निवडलेल्या उमेदवारांमध्ये विविध श्रेणीतील उमेदवारांचा समावेश आहे, ज्यामध्ये सामान्य श्रेणीतील ३३५, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील (EWS), ३१८ इतर मागासवर्गीय (OBC), १६० अनुसूचित जाती (SC) आणि ८७ अनुसूचित जमाती (ST) यांचा समावेश आहे.

दिव्यांग श्रेणीतून ४५ उमेदवारांची निवड

अपंग व्यक्ती (PWBD) श्रेणी अंतर्गत एकूण ४५ उमेदवारांची निवड करण्यात आली आहे, त्यापैकी १२ उमेदवार PWBD-1 (दृष्टीहीन), ८ उमेदवार PWBD-2 (श्रवणहीन), १६ उमेदवार PWBD-3 (गतिशीलता कमजोरी) आणि ९ उमेदवार PWBD-5 (इतर अपंगत्व) आहेत.

कसा पहाल निकाल?

यूपीएससी नागरी सेवा परीक्षेचा अंतिम निकाल जाहीर झाला आहे. निकाल तपासण्यासाठी उमेदवारांना प्रथम यूपीएससीची अधिकृत वेबसाइट upsc.gov.in ला भेट द्यावी लागेल. त्यानंतर, होमपेजवरील नवीन काय आहे विभाग किंवा थेट निकाल लिंकवर क्लिक करा. त्यानंतर, नागरी सेवा परीक्षा (CSE) निकालाच्या लिंकवर क्लिक करा. येथे तुम्हाला एक झऊऋ फाइल मिळेल ज्यामध्ये उत्तीर्ण उमेदवारांची नावे आणि रोल नंबर असतील. तुम्ही तुमचे नाव किंवा रोल नंबर शोधून निकाल पाहू शकता.

### पावसाळ्यापूर्वी जलसंधारणाची कामे पूर्ण करा - जिल्हाधिकारी

छत्रपती संभाजीनगर, २२ एप्रिल : विविध योजनांद्वारे करावयाची जलसंधारणाची कामे कालबद्ध कार्यक्रम आखून विहित वेळेत पूर्ण करावी. जेणेकरुन पावसाळ्यात पडणारा प्रत्येक थेंब जमिनीत जिरवून भूजल पातळीत वाढ झाली पाहिजे, असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज सर्व संबंधित यंत्रणांना दिले.

जलसंधारण उपचारांचा आढावा घेण्यासाठी आज बैठक घेण्यात आली. वरिष्ठ भूवैज्ञानिक जीवन बेडवाल, जिल्हा जलसंधारण अधिकारी विजय कांबळे, सामाजिक वनिकरण विभागाचे एस.बी. फुले तसेच दुरदृष्य प्रणालीद्वारे सर्व तहसिलदार, उपविभागीय अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, गटविकास अधिकारी आदी सहभागी झाले होते.



सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# आसाममध्ये जिहादी दहशतवाद्यांच्या कारवाया

दखल

**नागार्जुन**



अलीकडेच, पश्चिम बंगाल, आसाम आणि केरळ पोलिसांनी एकत्रितपणे 'ऑपरेशन प्रघात' राबवून दहशतवादाच्या एका मोठ्या मॉड्यूलचा पर्दाफाश केला. या दहशतवादविरोधी अभियानात आठ दहशतवाद्यांना अटक करण्यात आली. हिंदुत्ववादी संघटनांचे नेते आणि ईशान्य भारताला जोडणारा सिलीगुडी कॉरिडॉर म्हणजेच 'चिकन नेक' हे त्यांचे लक्ष्य होते. देशाला जातीय हिंसाचाराच्या वणव्यात ढकलून पश्चिम बंगाल आणि ईशान्य भारतात खळबळ निर्माण करून आपले मनसुबे पूर्ण करण्याचा त्यांचा डाव होता.

### धोकादायक हेतू

आसाम एसटीएफने केरळ आणि पश्चिम बंगाल पोलिसांच्या मदतीने अटक केलेल्या दहशतवाद्यांमध्ये बांगलादेशी मोहम्मद साद राडी ऊर्फ ??साद शेख याचाही समावेश आहे. केरळमधील कासरगोड येथून अटक करण्यात आलेल्या साद शेखचा आसाममधील एका दहशतवादी प्रकरणाशी संबंध आहे. तो सुमारे चार महिन्यांपूर्वी केरळमध्ये बनावट पासपोर्टवर आला होता आणि बांधकाम मजूर म्हणून काम करत होता. १७-१८ डिसेंबर रोजी टाकण्यात आलेल्या छाप्यांमध्ये मीनारुल शेख आणि मोहम्मद अब्बास अली या दहशतवाद्यांना पश्चिम बंगालच्या मुर्शिदाबाद येथून तर नूर इस्लाम मंडल, अब्दुल करीम मंडल, मोजिबर रहमान, हमीदुल इस्लाम आणि इनामुक हक यांना आसाममधून अटक करण्यात आली होती. हे सर्वजण ३० ते ४६ वर्षे वयोगटातील असून ते बांगलादेशस्थित दहशतवादी संघटना अन्सारुल्ला बांगला टीम (एबीटी) शी संबंधित आहेत.

'आमचे लक्ष्य सिलीगुडी कॉरिडॉर म्हणजेच चिकन नेक होते', असे चौकशीदरम्यान या दहशतवाद्यांनी सांगितले. रा. स्व. संघाचे पदाधिकारी आणि हिंदू नेत्यांच्या हत्येनंतर पश्चिम बंगाल, विशेषत: संवेदनशील चिकन नेक कॉरिडॉर आणि आसाममधील दळणवळण दुवे खराब करणे आणि या राज्यांमधील सुरक्षा आस्थापनांवर हल्ला करणे ही एबीटी स्लीपर सेलची योजना होती. त्यांची योजना शक्य तितक्या लक्ष्यित हत्या घडवून आणण्याची होती, ज्यामुळे हिंसाचार वाढेल आणि पश्चिम बंगाल, आसाम आणि त्रिपुरामध्ये मणिपूरसारखी परिस्थिती निर्माण होईल. अशा स्थितीत दहशतवाद्यांना 'चिकन नेक' कापणे सोपे झाले असते. जातीय दंगली भडकवण्यासाठी ते शस्त्रे आणि दारूगोळा मिळवण्याचा प्रयत्न करीत होते. त्यांचे तार पाकिस्तान आणि बांगलादेशातील दहशतवादी संघटनांशी जुळलेले आहेत. ते काही काळापासून त्यांच्या म्होरक्यांच्या आदेशानुसार भारतातील कट्टरपंथी इस्लामी मौलवींच्या मदतीने स्लीपर सेलमध्ये भरतीसाठी स्थानिकांची भरती करण्याच्या प्रयत्नात होते. सुरक्षा यंत्रणांकडून पकडले जाऊ नये म्हणून त्यांना सतर्क राहण्यास सांगण्यात येत होते. अटक केलेल्या दहशतवाद्यांकडून हिंदूंविरुद्ध द्वेष पसरवणारे आणि काफिरांच्या विरोधात हिंसाचाराचे समर्थन करणारे कट्टरपंथी इस्लामिक साहित्यही सापडले. यात भारताविरुद्ध विध्वंसक कारवाया करण्याविषयी लिहिले आहे.

महत्त्वाची बाब म्हणजे गेल्या वर्षी मे महिन्यात प्रतिबंधित दहशतवादी संघटना हिज्ब-उत-तहरीरचे दोन दहशतवादी सब्बीर अमीर आणि रिदवान मुनफ हे भारतात पश्चिम बंगालमध्ये वैध कागदपत्रांसह आले होते. ही संघटना सुशिक्षित विद्यार्थी आणि डॉक्टर, अभियंता, शिक्षण तज्ज्ञांसह इतर व्यावसायिकांची भरती करते. विशेषत: त्यांचे लक्ष्य मध्यमवर्गीय आणि श्रीमंत कुटुंबातील तरुण असतात. या संघटनेचे दहशतवादी भडक भाषणे देत नाहीत, उलट 'इस्लाम खतरे मे है' चा संदेश आणि भारतातील मुस्लिमांवरील तथाकथित अत्याचारांबद्दल अतिशय सोप्या भाषेत त्यांचे विचार मांडतात. एचयूटीचे हे दोन दहशतवादी पश्चिम बंगालमधील महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये विद्यार्थ्यांना भेटत होते.



गुप्तचर संस्थांचे म्हणणे आहे की, एचयूटीने भारतात विशेषत: पूर्वेकडील राज्यांमध्ये आपले मॉड्युल स्थापित केले आहेत. गेल्या काही महिन्यांत मध्य प्रदेश, छत्तीसगड, तेलंगणा आणि तामिळनाडूमधून एचयूटीशी संबंधित संशयित लोकांना अटक देखील करण्यात आली आहे. यानंतर केंद्रीय गृह मंत्रालयाने एचयूटीवर बंदी घातली.

गृहमंत्रालयाच्या अधिसूचनेनुसार, हिज्ब-उत-तहरीर ही एक अशी दहशतवादी संघटना आहे की, जी जिहाद आणि दहशतवादी कारवायांच्या माध्यमातून लोकशाही पद्धतीने निवडून आलेली सरकारे उलथवून भारतासह जागतिक स्तरावर इस्लामिक राज्य आणि खिलाफत स्थापन करण्यास इच्छुक आहे. ही संघटना लोकशाही व्यवस्था आणि देशाच्या अंतर्गत सुरक्षेला गंभीर धोका आहे.

मात्र, या दोन दहशतवाद्यांना पकडण्यासाठी पश्चिम बंगाल, बिहार, झारखंड आणि ओडिशामध्ये मोठ्या प्रमाणावर शोधमोहीम सुरू करण्यात आली असली तरी ते अद्यापही आवाक्याबाहेर आहेत. बांगलादेशातील सत्तापालटानंतर तेथील दहशतवादी संघटनांनी भारतात घुसखोरी करण्याचे, स्लीपर सेल तयार करण्याचे आणि दहशतवादी हल्ल्यांचे नियोजन करण्याचे प्रयत्न तीव्र केले आहेत. महंमद युनूस सरकारने केवळ त्यांच्या कारवायांकडे डोळेझाक केली असे नसून दहशतवाद्यांची तुरुंगातून सुटका करून त्यांना प्रोत्साहनही दिले आहे. युनूस सरकारने बांगलादेश जमात-ए-इस्लामीवरील बंदी जशी उठवली त्याचप्रमाणे शेख हसीना सरकारने संघटनेवर घातलेले निर्बंध उठवावेत, अशी मागणी एचयूटीने उघडपणे केली आहे.

एबीटी ही भारतीय उपखंडातील अल-कायदा (एक्यूआयएस) ची संलग्न संस्था आहे. प्राथमिक तपासानुसार, या दहशतवादी संघटनेने दहशतवाद्यांची भरती करण्यासाठी आणि स्लीपर सेल तयार करण्यासाठी नोव्हेंबर २०२४ च्या सुरुवातीला बांगलादेशातील राजशाही येथील रहिवासी मोहम्मद साद शेख याला भारतात पाठवले होते. त्यानंतर ते आसाम, पश्चिम बंगाल आणि केरळमध्ये गेले. पश्चिम बंगाल आणि आसाममध्ये त्याला त्याला आश्रय देण्याची व कट्टरपंथीयांकडे नेण्याची जबाबदारी आसामच्या कोकराझार येथील नूर इस्लाम मंडल आणि मोजिबर रहमान यांच्याकडे सोपविण्यात आली होती. दहशतवादी साद शेख या राज्यांमध्ये स्लीपर सेलशी समन्वय साधण्यासाठी नेटवर्क तयार करीत होता. यासाठी त्याला बांगलादेशात ठाण मांडून बसलेले एबीटीचे म्होरके मोहम्मद जसीमुद्दीन रहमानी यांच्या निकटचे मोहम्मद फरहान इसराक यांच्याकडून आदेश मिळत होते.

साद शेख, नूर इस्लाम आणि मोजिबर रहमान यांनी चौकशीदरम्यान सांगितले की आम्ही इस्लामिक कट्टरपंथी गोळा करण्यासाठी पश्चिम बंगालच्या अलिपूरद्वारच्या फालाकाटा आणि दक्षिण मुर्शिदाबादमध्ये कट्टरपंथी मौलवींच्या अनेक बैठका घेतल्या. याशिवाय या बैठकांमध्ये लक्ष्यित लोकांवर हल्ले करण्याची योजनाही तयार करण्यात आली होती. हत्येनंतर हिंदूंमध्ये रोष निर्माण करण्याचा आमचा हेतू होता, जेणेकरून पश्चिम बंगाल आणि आसाममध्ये दंगली उसळतील, विशेषत: भारत आणि बांगलादेशच्या सीमेला लागून असलेल्या जिल्ह्यांमध्ये खळबळ माजेल आणि आणि संधी मिळताच 'चिकन नेक' कापता येईल. इस्लामिक कट्टरपंथी दीर्घकाळापासून हा कॉरिडॉर तोडण्याच्या योजनेवर काम करीत आहेत. नागरिकत्व दुरुस्ती कायदा (सीएए) विरोधी आंदोलनादरम्यान इस्लामवादी शरजील इमाम याच्या विधानावरून ही गोष्ट समजू शकते. सीएए विरोधात दिल्लीच्या शाहीनबाग झालेल्या आंदोलनादरम्यान त्याचा एक व्हिडीओ जानेवारी २०२० मध्ये व्हायरल झाला होता. त्यात त्याने 'आसाम आणि ईशान्येला उर्वरित भारतापासून तोडण्याचे' आवाहन केले होते. 'चिकन नेक' कॉरिडॉर 'कापण्याची' योजना 'गजवा-ए-हिंद' ध्येयाचा एक भाग आहे. यासाठी १९४७ पूर्व पाकिस्तान व नंतर बांगलादेशातून पश्चिम बंगाल विशेषत: त्याचा उत्तर भाग आणि आसाममध्ये प्रचंड प्रमाणात घुसखोर घुसविण्यात आले. तीन दशकांपूर्वीपर्यंत हा अरुंद कॉरिडॉर हिंदूबहुल होता. पण बांगलादेशी आणि रोहिंग्या मुस्लिमांच्या सर्रास घुसखोरीमुळे या क्षेत्राची जनसांख्यिकीय स्थिती (डेमॉग्राफी) पूर्णपणे बदलली आहे. या कॉरिडॉरमध्ये उत्तर दिनाजपूर जिल्ह्याचा उत्तरेकडील भाग आणि दार्जिलिंगचा दक्षिण भाग, पूर्वेला बांगलादेश आणि पश्चिमेला बिहारमधील मुस्लिमबहुल किशनगंज आणि पूर्णिया जिल्ह्यांचा समावेश आहे. पण बांगलादेश आणि म्यानमारमधून होणाऱ्या घुसखोरीमुळे हे संपूर्ण क्षेत्र आता मुस्लिमबहुल होण्यासोबतच अत्यंत असुरक्षितही झाले आहे.

(पांचजन्यवरून साभार)

# चर्च-नक्षलवादी युती घातक

राज्य

**सतीश पांडा**



छत्तीसगडच्या नक्षलग्रस्त व अतिशय दुर्गम अशा अबुझमाडच्या अंतर्गत भागात आजपर्यंत कोणतीही सरकारी यंत्रणा पूर्णपणे पोहोचू शकली नाही. मात्र, असे असूनही तेथे फक्त ख्रिश्चन मिशनरी व चर्चला मात्र मुक्त प्रवेश आहे. त्यामुळेच नक्षलवाद आणि चर्च यांच्यात नेमके काय साटेलोटे आहे यावर चर्चा व्हायलाच हवी. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे नक्षलवाद्यांच्या उच्च कॅडर आणि कनिष्ठ कॅडरमध्ये संघर्ष आहे. उच्च कॅडर मुख्यत: तेलंगणा किंवा आंध्र प्रदेशातील आहे, त्यांना मूळ संस्कृतीशी काहीही देणेघेणे नाही. मात्र, जो कनिष्ठ संवर्ग (कॅडर) आहे तो स्थानिक आहे. स्वत:च्या संस्कृतीवर, पूजा उपासनापद्धतीवर चर्चकडून होणाऱ्या वैचारिक हल्ल्यांमुळे हे कनिष्ठ कॅडर चिंतित आहे.

कनिष्ठ कॅडरची चर्चला सहकार्य करण्याची इच्छा नसते. याऊलट वरिष्ठ किंवा उच्च कॅडरला चर्चला सहकार्य करायचे असते. कारण त्याला धोरणात्मक निर्णय घ्यावे लागतात. नक्षलवादी लहान मुलींचे शारीरिक शोषणही करतात, हे कित्येकदा उघडकीस आले आहे. अबुझमाड परिसरात अशी अनेक गावे आहेत, जिथे पालकांना आपल्या मुलींना त्यांच्या इच्छेविरुद्ध नक्षलवाद्यांकडे सोपवावे लागते. या मुलींना प्रेम करण्यास अथवा विवाह करण्यास परवानगी नाही. काही कारणाने विवाह झाला तरी मूल जन्माला घालण्याची परवानगी नाही. काही वर्षांपूर्वी नारायणपूरजवळील एका गावात नक्षलवाद्यांनी किशोरवयीन मुला-मुलींना बळजबरीने कॅडरमध्ये समाविष्ट केले. त्यांचे आपसात प्रेम जुळल्यावर त्यांना जिवंत जाळण्यात आले. परिसरात कोणाकडे ट्रॅक्टर असल्यास नक्षलवादी वर्षाला २० हजार रुपये कर वसूल करतात. दुकाने, बाईक इत्यादींचा वसुलीचा 'दर' निश्चित केला आहे. जर नक्षलवाद्यांना त्या भागात १०० टक्के मतदान हवे असेल तर तेवढे मतदान होते. पण जर मतदान होऊ नये, असे त्यांना वाटत असेल, तर तसेही होते. नक्षलवादी जे काही म्हणतील, जे सांगतील तो कायदा होतो. छत्तीसगडमध्ये जनजाती समाजाचा एक मोठा वर्ग आहे आणि हा वर्ग सनातन संस्कृतीचा गाभा आहे. परंतु त्यांना जनगणनेतील धर्म कॉलममध्ये 'अन्य' असे लिहिण्यास प्रोत्साहन देण्यात आले. हे काम येथील चर्चशी संबंधित मंडळींनी केले. येथे नियोजित पद्धतीने जनजाती अर्थात वनवासी समाजाला प्रथम त्यांच्या धर्मापासून दूर केले जाते

> **बस्तरमध्ये एका व्यक्तीने व्हॉट्स ॲप ग्रुपमध्ये या अभियानाविषयी लिहिले तेव्हा त्याला ५०० लोकांनी घेरले आणि त्याला ५० हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. तसेच माफी मागण्यास भाग पाडले. जनजाती समाजाची दिशाभूल करण्यासाठी 'रावण हा वनवासींचा राजा आहे, दंडकारण्य ही त्याची राजधानी होती आणि महिषासुर हा त्यांचा पूर्वज आहे,' अशी आणखी एक खोटी कथा (नॅरेटिव्ह) रचण्यात आली.**

आणि नंतर त्यांचे धर्मांतर केले जाते.

अमेरिकेत बाहेरून आलेल्या गोऱ्या लोकांनी अर्थात वसाहतवादी मानसिकतेच्या गोऱ्या लोकांनी तिथल्या मूळ, स्थानिक वंशाच्या रहिवाशांची हत्या केली. त्यामुळे दरवर्षी ९ ऑगस्ट रोजी जागतिक आदिवासी दिन साजरा करण्याची परंपरा सुरू झाली. ही परंपरा आपल्या देशातही सुरू करण्यात आली. राज्यघटनेत आदिवासी या शब्दाचा उल्लेख नाही, तिथे जनजाती हा शब्द वापरण्यात आला आहे. त्यासाठी आम्ही एक अभियान सुरू करून एक कार्ड जारी केले. त्यावर लिहिले होते की आम्ही सर्व भारतवासी मूळ निवासी आहोत.



बस्तरमध्ये एका व्यक्तीने व्हॉट्स ॲप ग्रुपमध्ये या अभियानाविषयी लिहिले तेव्हा त्याला ५०० लोकांनी घेरले आणि त्याला ५० हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. तसेच माफी मागण्यास भाग पाडले. जनजाती समाजाची दिशाभूल करण्यासाठी 'रावण हा वनवासींचा राजा आहे, दंडकारण्य ही त्याची राजधानी होती आणि महिषासुर हा त्यांचा पूर्वज आहे,' अशी आणखी एक खोटी कथा (नॅरेटिव्ह) रचण्यात आली. छत्तीसगडची प्रतिमा डागाळण्याचा पद्धतशीर प्रयत्न केला गेला, जणू काही तिथे भुकेल्या नग्न लोकांचे राज्य आहे. काही लोक विचारतात की तेथील लोक घरात राहतात की जंगलात? कपडे घालता की नाही? काही लोकांच्या मनात अशीही प्रतिमा आहे की, तुम्ही रायपूर विमानतळावर उतरताच नक्षलवादी तुम्हाला गोळ्या झाडतील.

प्रत्यक्ष वस्तुस्थिती मात्र नेमकी उलटी आहे. सीता बेंगराच्या गुहेस जगातील सर्वात प्राचीन नाट्यगृह मानले जाते. छत्तीसगड हे प्राचीन भारतातील १६ महाजनपदांपैकी एक मानले जाते. कला आणि सांस्कृतिक क्षेत्रातही छत्तीसगड आघाडीवर आहे. जेव्हा आपण छत्तीसगडच्या समाजाकडे पाहतो तेव्हा त्यांचा साधेपणा आणि त्यांची उत्स्फूर्तता पाहून ते बौद्धिकदृष्ट्या मागास असल्याची प्रतिमा आपण तयार करतो. परंतु तसे मुळीच नाही. जेव्हा वारंवार छत्तीसगडचे नकारात्मक पैलू मांडले जातात तेव्हा स्थानिकांच्या मानसिकतेवर त्याचा परिणाम होतो. आमचे राज्य विकसित होण्याचा पूर्णपणे प्रयत्न करीत आहे. राज्याचा विकास करण्यासाठी शक्य ते प्रयत्न पूर्ण क्षमतेने करण्यात येत आहेत, सरकारही प्रयत्न करीत आहे. यासाठी प्रत्येकाने छत्तीसगडची योग्य व सकारात्मक प्रतिमा निर्माण करणे अपेक्षित आहे. छत्तीसगडकडे पूर्वग्रहदूषित नजरेने बघू नये. दिल्लीत बसून छत्तीसगडबद्दल लिहिण्यात येते. एकदा छत्तीसगडला भेट द्या, या राज्याला, येथील लोकांना समजून घ्या आणि मगच त्याबद्दल लिहा, अशी माझी सर्वांनी विनंती आहे.

# इंडोनेशियात रोहिंग्यांबद्दल संताप

विशेष

**डॉ. सोनाली मिश्रा**




या रोहिंग्या मुस्लिमांनी म्यानमारमधून पळ काढल्यानंतर बांगलादेशात आश्रय घेतला होता. पण आता ते बांगलादेश सोडून इंडोनेशिया आणि मलेशियाच्या दिशेने जात आहेत. विशेष म्हणजे हे दोन्ही मुस्लिम देश आहेत.

वास्तविक म्यानमारमध्ये आपल्या कट्टरवादी, जिहादी, धार्मिक कृत्यांमुळे स्थान न मिळाल्याने रोहिंग्या मुस्लिम आता इतर मुस्लिम देशांमध्ये जात आहेत. हे रोहिंगे मुसलमान आता जगातील सर्वांत मोठा मुस्लिम देश इंडोनेशियामध्ये आश्रयासाठी जात आहेत. पण एकीकडे मुस्लिम बंधुभावाची (उम्मा) तसेच मुस्लिम ब्रदरहूडची, ५७ मुस्लिम देशांची चर्चा होत असताना दुसरीकडे एकही मुस्लिम देश या रोहिंग्या मुस्लिम निर्वासितांना आश्रय देण्यास तयार नाही, ही खरोखरच अतिशय आश्चर्याची गोष्ट आहे.

या रोहिंग्या मुस्लिमांनी म्यानमारमधून पळ काढल्यानंतर बांगलादेशात आश्रय घेतला होता. मात्र, आता ते बांगलादेश सोडून इंडोनेशिया आणि मलेशियाच्या दिशेने जात आहेत, हे दोन्ही मुस्लिम देश आहेत. इंडोनेशियातील रोहिंग्या मुस्लिमांबद्दल आजकाल अनेक बातम्या येत आहेत. कारण सर्वांत मोठा मुस्लिम देशही रोहिंग्या मुस्लिमांसाठी अनुकूल नसून तो त्यांना आश्रय देण्यास तयार नाही. डिसेंबरमध्ये २५० रोहिंग्या मुस्लिमांनी भरलेली बोट इंडोनेशियातील एचे राज्यातील एका समुद्रकिनाऱ्यावर दाखल झाली होती. मात्र, स्थानिक रहिवाशांनी बोटीला उतरू दिले नाही आणि जबरदस्तीने बोट परत पाठवली. ज्या लाकडी बोटीत रोहिंग्या मुस्लिम बसले होते त्या बोटीचा नंतर कुठेही ठावठिकाणा लागलेला नाही.


पण संपूर्ण 'मुस्लिम जगत' एक आहे असे म्हणणारे देश मुस्लिम शरथार्णी निर्वासितांना स्वीकारण्यास नकार का देत आहेत, हे समजण्यापलीकडचे आहे? तीन आठवड्यांपूर्वी ही बोट बांगलादेशातून निघाली होती, असेही स्थानिकांनी सांगितले. बांगलादेश हा देखील मुस्लिम देश आहे. मात्र, रोहिंग्या मुस्लिमांना तेथून हाकलले जात आहे. तेथे त्यांच्याशी अशी वर्तणूक केली जात आहे की त्यांना देश सोडून जाणे भाग पडावे. जीवनातील अस्थिरता लक्षात घेऊनही ते पळून जात आहेत. मग या मुस्लिम निर्वासितांना मुस्लिम देशांमध्ये देखील का स्वीकारले जात नाही? असा प्रश्न उपस्थित होतो.

या रोहिंग्या मुस्लिमांना बांगलादेशातील अशा एका बेटावर पाठवण्यात आले होते जे नेहमीच वादळांनी घेरलेले असायचे. भारताचा शेजारी असलेला बांगलादेश हा एक असा देश आहे ज्याने २०१७ मध्ये म्यानमारमधून हाकलून दिलेल्या या मुस्लिमांना आश्रय दिला होता. वास्तविक बांगलादेश आर्थिकदृष्ट्या स्वत: तितका मजबूत नसला, तरी विदेशी संस्थांकडून मिळालेल्या विविध प्रकारच्या सहकार्याच्या आश्वासनाच्या आधारावर त्याने एवढे मोठे पाऊल उचलले असावे की सुमारे १२ लाख रोहिंग्या मुस्लिमांना आश्रय दिला. मात्र, लवकरच बांगलादेशात तणाव वाढल्याच्या बातम्या समोर येऊ लागल्या. 'कॉक्सबाजारमध्ये राहणारे लोक (रोहिंगे) मानवी तस्करी आणि अंमली पदार्थांचे व्यसन' यासारख्या समस्या निर्माण करीत असल्याचा आरोप स्थानिक लोक करू लागले. आणि आता कदाचित रोहिंग्या मुस्लिमांची परिस्थिती झपाट्याने बिकट झाली आहे, ज्यामुळे ते इतर मुस्लिम देशांमध्ये जात आहेत आणि हे मुस्लिम देश त्यांना आश्रय देण्यास तयार नाहीत? त्यामुळेच इंडोनेशिया किंवा बांगलादेशसारख्या मुस्लिम देशांसाठी रोहिंग्या मुस्लिम समस्या का बनत आहेत? हा प्रश्न या पृष्ठभूमीवर उपस्थित होतो.

सर्वांत मोठी गोष्ट म्हणजे संसाधनांवर होणारा परिणाम. प्रत्येक देशाच्या नागरिकांचा त्या देशाच्या साधनसंपत्तीवर हक्क असायला हवा आणि तो असतोही. जर निर्वासितांना बाहेरून आणून स्थायिक केले तर लोकसंख्याशास्त्रीय (डेमोग्राफी) बदलासोबतच संसाधनांचे देखील विभाजन आणि आणि हे स्थानिक लोकांना त्यांच्या हक्कांवरचे अतिक्रमण वाटते आणि तसेच घडते देखील. प्रसारमाध्यमांनी दिलेल्या माहितीनुसार, एक कार्यकर्ता नेटवर्क फ्री रोहिंग्या कोएलिशनचे सह-संस्थापक नाय सान ल्विन यांनी सांगितले की, या वर्षाच्या प्रारंभी जागतिक अन्न कार्यक्रमाने निर्वासितांसाठी असलेल्या अन्नधान्यात (रेशन) कपात केली होती. तर रोहिंग्यांसाठी ही मदत म्हणजे बुडत्याला काडीचा आधार होता. दुसरीकडे बांगलादेशात रोहिंग्या निर्वासितांना ना नोकऱ्या करण्याचे स्वातंत्र्य आहे ना बंगाली भाषा शिकण्याचे स्वातंत्र्य आहे. कारण रोहिंग्या मुस्लिमांनी समाजाच्या मुख्य प्रवाहात मिसळावे, असे बांगलादेशी अधिकाऱ्यांना वाटत नाही आणि त्यामुळेच ते आता इंडोनेशियासारख्या देशात जात आहेत. पण त्या देशातील नागरिकही या रोहिंग्यांबाबत सकारात्मक नाहीत आणि त्यांना सर्व प्रकारे विरोध करीत आहेत. म्यानमारच्या राखीन प्रांतातील सुन्नी मुस्लिमांना रोहिंग्या मुस्लिम म्हटले जाते आणि त्यांना म्यानमारचे नागरिकत्व देण्यात आलेले नाही. २०१७ मध्ये एका बौद्ध युवतीवर बलात्कार केल्यानंतर त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात आली होती आणि २०१८ मध्ये, संयुक्त राष्ट्र मानवाधिकार तज्ज्ञ टॉम अँड्र्यूज यांनी पत्रपरिषदेत सांगितले की रोहिंग्या दहशतवाद्यांनी म्यानमारमध्ये हिंदूंची सुनियोजितपणे हत्या केली होती. अराकान रोहिंग्या सॅल्व्हेशन आर्मीच्या कृतींच्या आधारावर हा अहवाल प्रकाशित करण्यात आला आहे. म्यानमारमध्ये हिंदूंचा सुनियोजित छळ आणि हत्या होत असल्याचे या अहवालात नमूद करण्यात आले होते. ॲम्नेस्टी इंटरनॅशनलच्या या अहवालात रोहिंग्या दहशतवाद्यांनी ९९ हून अधिक हिंदू महिला, पुरुष आणि लहान मुलांची हत्या केल्याचे सांगण्यात आले. खेड्यापाड्यात राहणाऱ्या हिंदूंचे मोठ्या प्रमाणात अपहरण करून त्यांच्यावर अत्याचार करण्यात आले. हे सर्व २०१७ मध्ये म्यानमारमधील रोहिंग्याबहुल प्रांत राखीनमध्ये घडले होते. या संघटनेचा अध्यक्ष पाकिस्तानचा अताउल्ला अबू आमेर जुनूनी होता आणि या संघटनेने जेव्हा खुद्द सुरक्षा दलांवर सातत्याने हल्ले केले तेव्हा म्यानमारच्या लष्कराने रोहिंग्या मुस्लिमांवर कारवाई केली होती आणि त्यानंतरच हजारो रोहिंग्या मुस्लिम भारतात आले होते. जगातील जवळपास प्रत्येक मुस्लिम देश कट्टरपंथी रोहिंग्या मुस्लिमांना आश्रय देण्यास मुळीच उत्सुक नाहीत. परंतु दुर्दैवाची गोष्ट अशी आहे की भारतात असे अनेक पक्ष किंवा संघटना आहेत जे त्यांच्या व्होट बँकेच्या राजकारणापायी रोहिंग्यांना बेकायदेशीरपणे भारतात वसविण्याविषयी चर्चा करीत आहेत. अलिकडेच एका मोठ्या कारवाईत, रोहिंग्या आणि बांगलादेशी मुस्लिमांना बेकायदेशीरपणे आश्रय दिल्याबद्दल जम्मू-काश्मीरमध्ये सुमारे ५० लोकांना अटक करण्यात आली. इंडोनेशियासारख्या मुस्लिम देशांना आपल्या येथील संसाधनांची जाणीव आहे आणि बेकायदेशीर निर्वासित एखाद्या देशासाठी किती धोकादायक ठरू शकतात हे देखील ते उत्तमपणे समजू शकतात. मात्र, याउलट भारताची परिस्थिती आहे. भारतातील काही सेक्युलर, पुरोगामी व वामपंथी लोक रोहिंग्यांना अवैधपणे भारतात वसविण्यासाठी धडपडत आहेत. व्होटबँकेच्या राजकारणापायी ते एवढे अंध झाले आहेत की आपण देशाच्या सुरक्षेसोबत खेळखंडोबा करीत आहोत, याची त्यांना यत्किंचितही जाणीव नाही. या नेत्यांना स्वत:च्या व्यक्तिगत फायद्याव्यतिरिक्त काहीही दिसत नाही.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

॥ उसंतवाणी ॥
१४८८



पुन्हा परदेशी । बरळे राहुल ।
विद्वेषाची चूल । पेटवुनी ॥१॥

आयोगावरती । करूनिया हल्ला ।
'लोकशाही' कल्ला । माजविती ॥२॥

घिसीपिटी तीच । तबकडी जुनी ।
आरोपांची धुनी । धुमसते ॥३॥

गवसेना वाला । जनतेची नाडी ।
काँग्रेसची गाडी । घसरली ॥४॥

यांच्याही काळात । होता हा आयोग ।
'हुकूम' प्रयोग । कुणी केले? ॥५॥

आता करितो हा । आरोप सहज ।
बिल्ली चली हज । काँग्रेसची ॥६॥

कांत देशद्रोही । जडला हा रोग ।
काँग्रेसींच्या भोग । नशिबात ॥७॥

श्रीकांत उमरीकर
९४२२८७८५७५
२२ एप्रिल २०२५

# मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाला ई-मेलद्वारे बॉम्बस्फोटाची धमकी

छत्रपती संभाजीनगर : मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाला ई-मेलद्वारे बॉम्बस्फोटाची धमकी आल्याने खळबळ उडाली आहे. ही धमकी आज (२२ एप्रिल) दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास प्राप्त झाली असून, संबंधित मेल चेन्नई येथून आल्याची प्राथमिक माहिती आहे. मेलच्या माहितीची खातरजमा होताच पोलिसांनी न्यायालय परिसरात कडेकोट बंदोबस्त तैनात केला असून, सायबर पोलिसांकडून तपास सुरू आहे.




या घटनेनंतर न्यायालय प्रशासनाने तत्काळ पोलिसांना माहिती दिली. काही क्षणातच वरिष्ठ पोलिस अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. पोलिस उपायुक्त प्रशांत स्वामी, सहाय्यक पोलिस आयुक्त डॉ. रणजीत पाटील, पोलीस निरीक्षक कृष्णा शिंदे, न्यायालय सुरक्षा अधिकारी कुंदन जाधव, सायबर पोलिस ठाण्याचे निरीक्षक शिवचरण पांढरे हे स्वतः घटनास्थळी उपस्थित राहून संपूर्ण परिसराची पाहणी केली.

तत्काळ बॉम्ब शोधक व नाशक पथकाची चार पथके, तसेच अँटी टेरिझम स्कॉडचे पथकही घटनास्थळी दाखल झाले. न्यायालयाच्या प्रत्येक प्रवेशद्वारावर पोलिसांनी नाकाबंदी केली असून, येणाऱ्या-जाणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची कसून तपासणी केली जात आहे. परिसरातील प्रत्येक हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे.

दरम्यान, न्यायालयाचे नियमित कामकाज सुरु असून, नागरिकांना तपासणीनंतर प्रवेश दिला जात आहे. कोणतीही संशयास्पद वस्तू आढळून आलेली नसली तरी पोलिस यंत्रणा सतर्क असून, मेल पाठवणाऱ्याचा शोध घेण्यासाठी सायबर पोलिसांकडून तांत्रिक तपास सुरू आहे.

## संघ हीच जीवनगाथा



अलकः- (९८) स्वामी विवेकानंद

इसवी सन १९६३ ला राष्ट्रीय पुर्नजागरणाचे सिंहसदृश्य कर्णधार स्वामी विवेकानंदांच्या जन्मशतीचा पुण्य- प्रेरणादायी अवसर जवळ आला, आणि सर्व स्वयंसेवकांनी सहजस्फूर्त सुचवले, की कन्याकुमारी समुद्र तटावरील समुद्राच्या मध्ये स्थित शिलेवर स्वामीजींच्या महानतेच्या अनुरोध स्मारक बनवावे. या शिलेवर एका परिव्राजक युवा संन्यासाने तीन दिवस गहन ध्यान केले होते. आणि इथेच त्याला त्याच्या ऐतिहासिक ध्येयाचे ध्यान व भान आले. म्हणून या युवा संन्यासाने हिंदू धर्माच्या तत्वज्ञानाचा पाश्चात्य देशात उद्घोष करण्याचे ठरवले. तेव्हा या युवा संन्यासाने सर्वानुमते स्वामी विवेकानंद हे नाव धारण केले. स्वामीजी ३१ मे १८९३ ला बोटीत

बसून शिकागोला गेलेत तिथल्या सर्व धर्म परिषदेतील भाषण ऐकून लोक त्यांचा आदर करू लागलेस्वामी विवेकानंदांच्या जन्मशताब्दी वर्षातच म्हणजेच सन १९६३ मध्ये माननीय एकनाथजी रानडे यांनी हिंदू तेजा जागरे या पुस्तकाच्या माध्यमातून स्वामींचे विचार संकलित केले होते आणि हे संकलन राष्ट्राला समर्पित केले होते श्री गुरुजींना पण हे पुस्तक खूप आवडले होते. म्हणून श्री. गुरुजींनी १९६३ मध्ये श्री एकनाथजी रानडे यांना रा.स्व. संघाच्या सहकार्यवाह पदावरुन मुक्त करून विवेकानंद शिला स्मारक या महान कार्याची जबाबदारी सोपवली.

(बाकी पुढील अलक मध्ये वाचू. क्रमशः

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१,
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

## ईमामी सादर करीत आहे 'प्योर ग्लो'

छत्रपती संभाजीनगर, २१ एप्रिल २०२५ – ईमामी लिमिटेड, ईमामी ग्रुपची प्रमुख पर्सनल केअर आणि हेल्थकेअर कंपनी ईमामी लिमिटेडने ईमामी प्योर ग्लो सादर करुन ४००० कोटिपेक्षा जास्त उलाढालीच्या ब्राइटनिंग क्रीम कॅटेगरीत प्रवेश करण्याची घोषणा केली आहे. ग्राहकांच्या प्रमुख चिंता दूर करण्यासाठी आणि ग्लो सेग्मेंटची पुनर्परिभाषा करण्यासाठी डिजाइन केलेले एक क्रांतिकारी स्किनकेअर सोल्युशन. ब्रँडचे आकर्षण वाढविण्यासाठी आणि देशभरातील ग्राहकांशी जोडण्यासाठी, ईमामीने प्योर ग्लोचा चेहरा म्हणून राशी खन्नाला निवडले आहे. प्रादेशिक आणि हिंदी चित्रपट उद्योगात मजबूत उपस्थिती असलेली राशी खन्ना, ब्रँडमध्ये आकर्षण, आत्मविश्वास आणि सापेक्षता आणते, ज्यामुळे ती नवीन काळातील स्किनकेअर क्रांतिसाठी परिपूर्ण बनते.

## हायर इंडियाद्वारे ग्रॅव्हिटी सिरीज एसी लाँच केले

छत्रपती संभाजीनगर : सलग १६ वर्षांपासून नंबर १ जागतिक प्रमुख उपकरण ब्रँड असलेल्या हायर अप्लायन्सेस इंडियाने, एअर कंडिशनर्सच्या बहुप्रतिक्षित ग्रॅव्हिटी सिरीजचे अनावरण केले आहे. फॅब्रिक फिनिशसह भारतातील एकमेव एआय क्लायमेट कंट्रोल एअर कंडिशनर्स म्हणून, हे नाविन्यपूर्ण एसी, फॅब्रिक फिनिशसह बुद्धिमान शीतकरण तंत्रज्ञानाचे अखंडपणे एकत्रीकरण करून आधुनिक घरगुती हवामान उपायांसाठी नवीन मानक स्थापित करतात. ग्रॅव्हिटी सिरीज सात आकर्षक रंगांमध्ये उपलब्ध आहे – मॉर्निंग मिस्ट, मून स्टोन ग्रे, मिडनाईट ड्रीम, गॅलेक्सी स्लेट, अ‍ॅक्वा ब्लू, कॉटन कँडी आणि व्हाइट – जे वर्तमान काळातील अंतर्भागांना दर्जेदार छटा देत शीतकरणाची अतुलनीय कामगिरी पार पाडतात.

## ईडीआयआयने आपला ४३ वा स्थापना दिन साजरा केला

मुंबई : भारतीय उद्योजकता विकास संस्था ने २० एप्रिल २०२५ रोजी आपला ४३ वा स्थापना दिन साजरा केला. गोव्याचे माननीय मुख्यमंत्री श्री. डॉ. प्रमोद सावंत यांनी या प्रसंगी आभासी भाषण केले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे डॉ. पिरोज खंबाटा, अध्यक्ष – रसना ग्रुप आणि माननीय कॉन्सुल जनरल, दक्षिण कोरिया (गुजरात) यांच्यासह अनेक मान्यवर अतिथी उपस्थित होते; सन्माननीय अतिथी श्री सुनील अंचिपाका, आयएएस, सचिव (उद्योग), गोवा; श्री बी. एस. पै अँगल, व्यवस्थापकीय संचालक, ईडीसी लिमिटेड, गोवा; आयडीबीआय बँक लिमिटेड, अहमदाबाद येथील मुख्य महाव्यवस्थापक आणि झोनल प्रमुख (अहमदाबाद झोन) श्री दिनेश सिंग रावत (आणि गव्हर्निंग बोर्ड सदस्य, ईडीआयआय) आणि ईडीआयआयचे महासंचालक डॉ. सुनील शुक्ला उपस्थित होते.

या कार्यक्रमाला सरकार, कॉर्पोरेट, उद्योग संघटना आणि शैक्षणिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. उद्योजकता, स्टार्टअप्स आणि नवोन्मेष देशाच्या सामाजिक–आर्थिक प्रगतीवर कसा परिणाम करत आहेत यावर या कार्यक्रमाचा केंद्रबिंदू होता.

## तीर्थ संरक्षिणी महासभेच्या वतीने जैन धरोहर चित्र प्रदर्शनीचे राजाबाजार जैन मंदिरात उद्धघाटन

छत्रपती संभाजीनगर – श्री भारतवर्षीय दिगंबर जैन महासभेचे सतत चालीस वर्ष पदावर राहिलेले राष्ट्रीय अध्यक्ष स्वर्गीय निर्मल कुमार जी सेठी याच्या चतुर्थ पुण्यतिथी निमित्त जैन धरोहर दिवस २७ एप्रील रोजी भारत भर संपन्न होत आहे ।ह्या निमित्ताने छत्रपती संभाजीनगर येथे श्री पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिर राजा बजार येथेही जैन धरोहर चित्र प्रदर्शनी चे आयोजन करण्यात आले। हया प्रदर्शनी चे उद्धघाटन सामाजिक कार्यकर्ते संतोष कल्याणमल जी कासलीवाल व श्रीमति शोभाबाई कल्याणमलजी कासलीवाल यांचे हस्ते करण्यात आले ।कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खंडेलवाल दिगंबर जैन पंचायत राजाबजार मंदिर चे अध्यक्ष, सामाजिक कार्यकर्ता महावीर पाटनी होते। प्रारंभी सौ सपना पापड़ीवाल यानी मंगलाचरण प्रस्तुत



केले तद नंतर पाहुण्याच्या हस्ते द्वीप प्रज्वलन व निर्मल कुमार जी सेठी यांच्या फोटोस माल्यार्पण करण्यात आले।तीर्थ संरक्षिणी चे अध्यक्ष वर्धमान पांडे यानी महावीर पाटणी याचे तर धर्म संवर्धनी चे कार्याध्यक्ष देवेंद्र काला यानी संतोष कासलीवाल याचे पुष्प हार घालुन स्वागत केले व प्राचीन तीर्थ जीर्णोद्धार पत्रिका भेट दिली।ह्या प्रसंगी श्रीमती शोभा बाई कासलीवाल यांचे ही स्वागत सौ निता ठोले यानी केले। तीर्थ संरक्षिणी महाराष्ट्र प्रांत चे महामंत्री महावीर ठोले यानी प्रस्ताविक करूंन निर्मल कुमार जी सेठी यांच्या कार्याचा आढावा धेवुन जैन धरोहराचे महत्व पटवुन दिले। अध्यक्ष वर्धमान पांडे ,सभाध्यक्ष महावीर पाटणी यानी जैन धरोहर दीवसावर प्रकाश टाकला ।कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन देवेंद्र काला यानी तर सूत्र संचालन पुरातत्व संयोजक अजीत लोहाडे यानी केले। कार्यक्रमा साठी सचिव प्रकाश अजमेरा डॉ प्रकाश पापड़ीवाल, अरुण पाटनी ललीत पाटनी महावीर सेठी मानिक गंगवाल, , डीबी पहाड़े, प्रकाश अजमेरा, महावीर ठोले, जितेंद्र पाटणी प्रकाश कासलीवाल,कैलास पाटणी, डा जयकुमार पाटणी ,डा सन्मति ठोले,डा शैलेश चान्दीवाल, नितीन पाटणी,प्रदीप कैलास पाटणी निता ठोले आदी उपस्थित होते.

## सीएसआरएल आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील तरुणांना दर्जेदार शिक्षण आणि कौशल्य विकास कार्यक्रमांद्वारे सक्षम करते

सीएसआरएल (सेंटर फॉर सोशल रिस्पॉन्सिबिलिटी अँड लीडरशिप), २००७ मध्ये स्थापन झालेली एक नोंदणीकृत एनजीओ. आम्ही एक समर्पित संस्था आहोत जी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील तरुणांना दर्जेदार शिक्षण आणि कौशल्य विकास कार्यक्रमांद्वारे सक्षम करून समावेशक आणि नैतिक समाज निर्माण करण्यासाठी काम करत आहे.

सीएसआरएलचा प्रमुख उपक्रम अभियांत्रिकी इच्छुकांसाठी एक वर्षाचा मोफत निवासी मार्गदर्शन कार्यक्रम प्रदान करतो, जेईई मेन्स आणि अ‍ॅडव्हान्स्डसाठी सघन प्रशिक्षण प्रदान करतो. विद्यार्थ्यांना आरामदायी निवास, पौष्टिक जेवण आणि भारतातील अत्यंत अनुभवी प्राध्यापकांकडून शैक्षणिक मार्गदर्शन दिले जाते.

सध्या, आम्ही देशभरात सुमारे ३० केंद्रे चालवतो. आमच्या नवीनतम जोड्यांपैकी एक, ओएनजीसी सुपर ३० जळगाव, जून २०२४ मध्ये ओएनजीसीने प्रायोजित केले. कर्मचारी आणि प्राध्यापक खालीलप्रमाणे आहेत:

प्रकल्प व्यवस्थापक – शशांक गारे, प्रकल्प अधिकारी – देवेंद्र सावकारे, प्रशिक्षणार्थी विद्याशाखा (रसायनशास्त्र) – कमलेश कुमार, भौतिकशास्त्र विद्याशाखा – गोविंद तिवारी, रसायनशास्त्र विद्याशाखा – आतिश कुमार, गणित विद्याशाखा – बिरेंद्र कुमार.

या केंद्राने पहिल्या बॅचमध्ये ३० विद्यार्थ्यांची नोंदणी केली. आम्हाला हे सांगताना खूप अभिमान वाटतो की:

जेईई मेन्स फेज १ मध्ये, ३० पैकी २६ विद्यार्थी पात्र ठरले. जेईई मेन्स फेज २ मध्ये, ३० पैकी २८ विद्यार्थी जेईई अ‍ॅडव्हान्स्ड परीक्षेसाठी पात्र ठरले.

नव्याने स्थापन झालेल्या केंद्राची ही अपवादात्मक कामगिरी केवळ विद्यार्थ्यांसाठीच नाही तर संपूर्ण समुदायासाठी अभिमानाची आणि प्रेरणादायी आहे. समर्पण, प्रतिभा आणि संधीची ही कहाणी व्यापकपणे सामायिक केली पाहिजे असे आम्हाला वाटते.

या प्रभावी उपक्रमाबद्दल व्यापक लोकांना प्रेरणा देण्यासाठी आणि माहिती देण्यासाठी तुमच्या आदरणीय प्रकाशनात या कामगिरीचा समावेश करण्याचा विचार करण्याची आम्ही विनंती करतो.

CIN: L67100MH1995PLC093797
Regd. Office: IIFL House, Sun Infotech Park, Road No. 16V, Plot No.B-23, Thane Industrial Area, Wagle Estate, Thane - 400604
Tel: (91-22) 41035000 • Fax: (91-22) 25806654
E-mail: reach@iifl.com • Website: www.iifl.com

सोन्याचा दागिन्यांचा ई–लिलावाची सार्वजनिक सूचना

येथे सगळ्या संबंधित ऋणकोंना विशेषत: आणि सर्व सामान्य नागरिकांना, सामान्यपणे असे सूचित करण्यात येते की, आम्ही आयआयएफएल फायनान्स लिमिटेड (''आयआयएफएल'') येथे थकबाकी असलेल्या कर्जदारांच्या सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव करणार आहोत, यामध्ये वारंवार सूचना देऊन देखील कर्जाची रक्कम न भरलेल्या किंवा कर्ज खाते सामान्य करू न शकलेल्या ऋणकोंचा समावेश केला गेला आहे. खालील कर्ज खात्यांसाठी गहाण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा **ई–प्रोक्योरमेंट टेक्नोलॉजीज लिमिटेड** मार्फत त्यांच्या **https://egold.auctiontiger.net** या ऑनलाईन लिलाव मंचावरून दिनांक **26.04.2025 रोजी दुपारी 02:00 ते 05:00** दरम्यान सार्वजनिक लिलाव करण्यात येणार आहे. स्थान किंवा तारखेतील बदल (जर असल्यास) लिलाव केंद्राकडे दर्शविला जाईल. येथे उल्लेख केलेल्या तारखेस कोणत्याही कारणास्तव ई–लिलाव होऊ शकला नाही किंवा त्याच दिवशी पूर्ण झाला नाही, तर लिलावाच्या प्लॅटफॉर्मवर आणि/किंवा लिलाव केंद्रावर त्याच अटी व शर्तींसह उक्त लिलाव पुढील कोणत्याही तारखेला आयोजित करण्याचा किंवा पुढे नेण्याचा अधिकार आयआयएफएल राखून ठेवते. लिलावात विक्री न झालेले सोन्याच्या दागिन्यांचा लिलावाच्या प्लॅटफॉर्मवर आणि/किंवा लिलाव केंद्रावर प्रदर्शित केल्यावर पुढील कामकाजी दिवसांवर लिलाव केला जाईल. शाखा स्तरावरील लिलाव अयशस्वी झाल्यास, **07.05.2025** रोजी त्यांचा निर्दिष्ट जिल्हा केंद्रात जिल्हा स्तरावर आणखी कोणत्याही नोटीसशिवाय पुन्हा लिलाव करण्यात येईल. कोणत्याही कारणास्तव, येथे उल्लेखित तारखेस जिल्हा स्तरावर लिलाव होऊ शकला नाही किंवा त्या दिवशी लिलाव पूर्ण होऊ शकला नाही, तर त्याच अटी व शर्तींसह पुढील कोणत्याही तारखेला जिल्हा स्तरावर लिलाव आयोजित करण्याचा किंवा पुढे नेण्याचा अधिकार आयआयएफएल राखून ठेवते. जर ग्राहकाचा मृत्यू झाला, तर सर्व नियम आणि अटी त्याच्या नॉमिनी/ वैधानिक वारसदार यांच्यावर लागू होणार.

जिल्हा केंद्र: **परभणी –स्टेशन रोड गोल्ड लोन – 1ला मजला कावरा कॉम्प्लेक्स, लक्ष्मीनारायण मंदिर स्टेशन जवळ , परभणी–431401**

**शाखेचे नांव: परभणी –स्टेशन रोड गोल्ड लोन, तालुका – परभणी .**

**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL25562631, GL25572380.

ई–लिलाव हा ''जिथे आहे तसे'', ''जसे आहे तसे'' आणि ''जेवढे आहे तेवढे'' या तत्वावर केला जाईल आणि आयआयएफएल द्वारे कोणत्याही प्रकारे सोन्याच्या दागिन्यांची गुणवत्ता, शुद्धता, कॅरेट, वजन किंवा मूल्यांकनाचे प्रतिनिधीत्वं केले जाणार नाही. ई–लिलाव प्रक्रिया आणि विक्री (झाल्यास) ई–लिलावाकरिता असलेल्या अटी आणि नियम या संपूर्णपणे आयआयएफएलच्या अनुसार किंवा लागू करतांना त्यांना अनुरूप वाटतील त्या पद्धतीच्या असतील. आयआयएफएल स्वत:हून, लिलाव पुढे ढकलू किंवा रद्द करू शकेल, लिलावाच्या यादी मधून एखाद्या खात्याचे नाव वगळण्याचा अधिकार देखील आयआयएफएल कडेच असेल आणि हे करताना त्याकरिताची पुर्व सूचना, करण्यामागची कारणे, एखाद्या बोलीचा स्वीकार किंवा रद्दीकरण केल्याची कारणे देण्याची कोणतीही आवश्यकता नसेल. थकबाकी असलेल्या ऋणकोंची यादी, त्यांनी जमा केलेले दागिने आणि इतर तपशील हा संबंधित शाखांमध्ये दिलेला असेल. अयशस्वी कर्जदारांकडे हा पर्याय आहे की त्यांनी अद्ययावत व्याज आणि सर्व लागू शुल्कांसह संपूर्ण थकबाकीची परतफेड करावी जेणेकरुन ही नोटीस प्रकाशित झाल्यानंतरही त्यांचे कर्ज खाते बंद करण्याचा किंवा नियमित करण्याचा पर्याय असतो परंतु कोणत्याही परिस्थितीत लिलावाच्या तारखेपर्यंतच हे शक्य आहे, यात ते अयशस्वी झाल्यास सोन्याचे दागिने विकले जातील आणि थकबाकी (असल्यास) व्याज आणि खर्चासह वसूल केली जाईल. ही सूचना छापून आल्यानंतर जर एखाद्या ऋणकोने आपल्या कर्जाचा व्यवहार पूर्ण केला किंवा आपली थकबाकी भरून कर्ज खाते बंद केले, तर त्याला या सूचनेच्या छपाईचा संपूर्ण खर्च मात्र उचलावा लागेल. ऋणकोंना आपल्या बँक खात्यांचा तपशील शाखेकडे जमा/अद्ययावत करण्याची विनंती केली जाते आहे जेणेकरून लिलाव प्रक्रियेमधून निघालेला परतावा असल्यास तो जमा करता येऊ शकेल.

**तपशीलवार माहिती, अटी आणि नियम जाणून घेण्याकरिता कृपया आयआयएफएल फायनान्स लिमिटेडच्या नजिकच्या शाखेशी संपर्क साधा.**

तारीख : **23.04.2025**
स्थळ: परभणी

स्वाक्षरीकर्ता/–
अधिकृत स्वाक्षरीकर्ता
आयआयएफएल फायनान्स लिमिटेड

## १० मिनिटांत औषधांची घरपोच डिलिव्हरी उपलब्ध

मुंबई– फोनपेचे पाठबळ लाभलेल्या पिनकोड या हायपरलोकल ई–कॉमर्स प्लिकेशन पतर्फे आता बंगळुरू, मुंबई व पुणे या शहरांमध्ये २४–तास ऑनलाइन फार्मसी सेवा सुरू केली आहे. या सेवेच्या माध्यमातून आवश्यकऔषधे २४ तास कधीही मिळू शकतात. ग्राहक आता कोणत्याही वेळेस औषधांची ऑर्डर देऊ शकतात आणि जवळच्या स्थानिक औषधाविक्रेत्यांकडून केवळ १० मिनिटांत औषधांची डिलिव्हरी मिळवू शकतात. ज्यांच्याकडे डॉक्टरांची चिठ्ठी (प्रिस्क्रिप्शन) नाही, अशा ग्राहकांसाठी पिनकोड पच्या माध्यमातून पात्र डॉक्टरांचा मोफत ऑनलाईन सल्ला घेण्याची सुविधा उपलब्ध आहे. तपासणीनंतर हे डॉक्टर टेलिमेडिसिनच्या मार्गदर्शक सूचनांनुसार डिजिटल प्रिस्क्रिप्शन देऊ शकतात. त्यामुळे औषधे मिळवण्याची प्रक्रिया अधिक सुलभ आणि कार्यक्षम होते.

## एचसीएल जिगसॉ सहाव्या आवृत्तीसाठी नोंदणी सुरु

पुणे : एचसीएल ग्रुप, १३.८ अब्ज अमेरिकन डॉलर्सचा जागतिक समूह, ने शालेय विद्यार्थ्यांसाठी भारतातील सर्वात मोठा समस्या सोडवणारा मूल्यांकन मंच, एचसीएल जिगसॉच्या सहाव्या आवृत्तीची घोषणा केली. नावीन्यपूर्णता आणि विश्लेषणात्मक कौशल्यांना प्रोत्साहन देण्यासाठी डिझाइन केलेले, एचसीएल जिगसॉ तरुणांना सर्जनशील आणि तार्किक विचारसरणीद्वारे वास्तविक जगातील आव्हानांना तोंड देण्यासाठी सक्षम करत आहे. हे व्यासपीठ इयत्ता ६ ते ९ मधील शालेय विद्यार्थ्यांना संशोधन, समीक्षात्मक विचारसरणी आणि संवाद यासह २१ व्या शतकातील प्रमुख कौशल्यांचे मूल्यांकन करते.

## शहाचंद बालचंद ललवाणी यांचे निधन



बीड : पुणे गुलटेकडी मार्केट यार्ड मधील जुन्या पिढीतील प्रसिद्ध मिरचीचे व्यापारी तथा ललवाणी अँड कंपनीचे संचालक शहाचंद बालचंद ललवाणी (वय ७०) यांचे अल्पशा आजाराने मंगळवार दिनांक २२ एप्रिल रोजी दुःखद निधन झाले. मूळचे चौसाळा ( जि बीड) येथील रहिवासी असलेले श्री शहाचंद ललवाणी यांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीत पुण्यामध्ये मिरचीचा व्यापार सुरू केला होता. गणराज मसाले या नावाने विविध उत्पादने सुरू केली होती. त्यांचे पश्चात पत्नी, भाऊ – भावजयी, बहिणी – मेहुणे, एक मुलगा, दोन मुली असा परिवार आहे. भारतीय जैन संघटनेचे अध्यक्ष शांतीलाल मुथा यांचे ते मावस बंधू होते.

CIN: L67100MH1995PLC093797
Regd. Office: IIFL House, Sun Infotech Park, Road No. 16V, Plot No.B-23, Thane Industrial Area, Wagle Estate, Thane - 400604
Tel: (91-22) 41035000 • Fax: (91-22) 25806654
E-mail: reach@iifl.com • Website: www.iifl.com

सोन्याचा दागिन्यांचा ई–लिलावाची सार्वजनिक सूचना

येथे सगळ्या संबंधित ऋणकोंना विशेषत: आणि सर्व सामान्य नागरिकांना, सामान्यपणे असे सूचित करण्यात येते की, आम्ही आयआयएफएल फायनान्स लिमिटेड (''आयआयएफएल'') येथे थकबाकी असलेल्या कर्जदारांच्या सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव करणार आहोत, यामध्ये वारंवार सूचना देऊन देखील कर्जाची रक्कम न भरलेल्या किंवा कर्ज खाते सामान्य करू न शकलेल्या ऋणकोंचा समावेश केला गेला आहे. खालील कर्ज खात्यांसाठी गहाण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा **ई–प्रोक्योरमेंट टेक्नोलॉजीज लिमिटेड** मार्फत त्यांच्या **https://egold.auctiontiger.net** या ऑनलाईन लिलाव मंचावरून दिनांक **26.04.2025 रोजी दुपारी 02:00 ते 05:00** दरम्यान सार्वजनिक लिलाव करण्यात येणार आहे. स्थान किंवा तारखेतील बदल (जर असल्यास) लिलाव केंद्राकडे दर्शविला जाईल. येथे उल्लेख केलेल्या तारखेस कोणत्याही कारणास्तव ई–लिलाव होऊ शकला नाही किंवा त्याच दिवशी पूर्ण झाला नाही, तर लिलावाच्या प्लॅटफॉर्मवर आणि/किंवा लिलाव केंद्रावर त्याच अटी व शर्तींसह उक्त लिलाव पुढील कोणत्याही तारखेला आयोजित करण्याचा किंवा पुढे नेण्याचा अधिकार आयआयएफएल राखून ठेवते. लिलावात विक्री न झालेले सोन्याच्या दागिन्यांचा लिलावाच्या प्लॅटफॉर्मवर आणि/किंवा लिलाव केंद्रावर प्रदर्शित केल्यावर पुढील कामकाजी दिवसांवर लिलाव केला जाईल. शाखा स्तरावरील लिलाव अयशस्वी झाल्यास, **07.05.2025** रोजी त्यांचा निर्दिष्ट जिल्हा केंद्रात जिल्हा स्तरावर आणखी कोणत्याही नोटीसशिवाय पुन्हा लिलाव करण्यात येईल. कोणत्याही कारणास्तव, येथे उल्लेखित तारखेस जिल्हा स्तरावर लिलाव होऊ शकला नाही किंवा त्या दिवशी लिलाव पूर्ण होऊ शकला नाही, तर त्याच अटी व शर्तींसह पुढील कोणत्याही तारखेला जिल्हा स्तरावर लिलाव आयोजित करण्याचा किंवा पुढे नेण्याचा अधिकार आयआयएफएल राखून ठेवते. जर ग्राहकाचा मृत्यू झाला, तर सर्व नियम आणि अटी त्याच्या नॉमिनी/ वैधानिक वारसदार यांच्यावर लागू होणार.

जिल्हा केंद्र: **जालना जीएल – पहिला मजला, कडबी मंडी , जुना मोंढा रोड आंध्रा बँकेच्या मागे , जालना – 431203.**

**शाखेचे नांव: जालना जीएल, तालुका – जालना .**

**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL33415018, GL35024746, GL33417494, GL33416063, GL32832652, GL32822219, GL32795549, GL32162483, GL33921659, GL32167273, GL33261804, GL33242489, GL32570744, GL34112448, GL34094005, GL33120619, GL33131457, GL33146815, GL33107282, GL33044103, GL33054248, GL33957542, GL33626273, GL33642522, GL34261846, GL33983839, GL33536715, GL33340327, GL33352075.

ई–लिलाव हा ''जिथे आहे तसे'', ''जसे आहे तसे'' आणि ''जेवढे आहे तेवढे'' या तत्वावर केला जाईल आणि आयआयएफएल द्वारे कोणत्याही प्रकारे सोन्याच्या दागिन्यांची गुणवत्ता, शुद्धता, कॅरेट, वजन किंवा मूल्यांकनाचे प्रतिनिधीत्वं केले जाणार नाही. ई–लिलाव प्रक्रिया आणि विक्री (झाल्यास) ई–लिलावाकरिता असलेल्या अटी आणि नियम या संपूर्णपणे आयआयएफएलच्या अनुसार किंवा लागू करतांना त्यांना अनुरूप वाटतील त्या पद्धतीच्या असतील. आयआयएफएल स्वत:हून, लिलाव पुढे ढकलू किंवा रद्द करू शकेल, लिलावाच्या यादी मधून एखाद्या खात्याचे नाव वगळण्याचा अधिकार देखील आयआयएफएल कडेच असेल आणि हे करताना त्याकरिताची पुर्व सूचना, करण्यामागची कारणे, एखाद्या बोलीचा स्वीकार किंवा रद्दीकरण केल्याची कारणे देण्याची कोणतीही आवश्यकता नसेल. थकबाकी असलेल्या ऋणकोंची यादी, त्यांनी जमा केलेले दागिने आणि इतर तपशील हा संबंधित शाखांमध्ये दिलेला असेल. अयशस्वी कर्जदारांकडे हा पर्याय आहे की त्यांनी अद्ययावत व्याज आणि सर्व लागू शुल्कांसह संपूर्ण थकबाकीची परतफेड करावी जेणेकरुन ही नोटीस प्रकाशित झाल्यानंतरही त्यांचे कर्ज खाते बंद करण्याचा किंवा नियमित करण्याचा पर्याय असतो परंतु कोणत्याही परिस्थितीत लिलावाच्या तारखेपर्यंतच हे शक्य आहे, यात ते अयशस्वी झाल्यास सोन्याचे दागिने विकले जातील आणि थकबाकी (असल्यास) व्याज आणि खर्चासह वसूल केली जाईल. ही सूचना छापून आल्यानंतर जर एखाद्या ऋणकोने आपल्या कर्जाचा व्यवहार पूर्ण केला किंवा आपली थकबाकी भरून कर्ज खाते बंद केले, तर त्याला या सूचनेच्या छपाईचा संपूर्ण खर्च मात्र उचलावा लागेल. ऋणकोंना आपल्या बँक खात्यांचा तपशील शाखेकडे जमा/अद्ययावत करण्याची विनंती केली जाते आहे जेणेकरून लिलाव प्रक्रियेमधून निघालेला परतावा असल्यास तो जमा करता येऊ शकेल.

**तपशीलवार माहिती, अटी आणि नियम जाणून घेण्याकरिता कृपया आयआयएफएल फायनान्स लिमिटेडच्या नजिकच्या शाखेशी संपर्क साधा.**

तारीख : **23.04.2025**
स्थळ: जालना

स्वाक्षरीकर्ता/–
अधिकृत स्वाक्षरीकर्ता
आयआयएफएल फायनान्स लिमिटेड

CIN: L67100MH1995PLC093797
Regd. Office: IIFL House, Sun Infotech Park, Road No. 16V, Plot No.B-23, Thane Industrial Area, Wagle Estate, Thane - 400604
Tel: (91-22) 41035000 • Fax: (91-22) 25806654
E-mail: reach@iifl.com • Website: www.iifl.com

सोन्याचा दागिन्यांचा ई–लिलावाची सार्वजनिक सूचना

येथे सगळ्या संबंधित ऋणकोंना विशेषत: आणि सर्व सामान्य नागरिकांना, सामान्यपणे असे सूचित करण्यात येते की, आम्ही आयआयएफएल फायनान्स लिमिटेड (''आयआयएफएल'') येथे थकबाकी असलेल्या कर्जदारांच्या सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव करणार आहोत, यामध्ये वारंवार सूचना देऊन देखील कर्जाची रक्कम न भरलेल्या किंवा कर्ज खाते सामान्य करू न शकलेल्या ऋणकोंचा समावेश केला गेला आहे. खालील कर्ज खात्यांसाठी गहाण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा **ई–प्रोक्योरमेंट टेक्नोलॉजीज लिमिटेड** मार्फत त्यांच्या **https://egold.auctiontiger.net** या ऑनलाईन लिलाव मंचावरून दिनांक **26.04.2025 रोजी दुपारी 02:00 ते 05:00** दरम्यान सार्वजनिक लिलाव करण्यात येणार आहे. स्थान किंवा तारखेतील बदल (जर असल्यास) लिलाव केंद्राकडे दर्शविला जाईल. येथे उल्लेख केलेल्या तारखेस कोणत्याही कारणास्तव ई–लिलाव होऊ शकला नाही किंवा त्याच दिवशी पूर्ण झाला नाही, तर लिलावाच्या प्लॅटफॉर्मवर आणि/किंवा लिलाव केंद्रावर त्याच अटी व शर्तींसह उक्त लिलाव पुढील कोणत्याही तारखेला आयोजित करण्याचा किंवा पुढे नेण्याचा अधिकार आयआयएफएल राखून ठेवते. लिलावात विक्री न झालेले सोन्याच्या दागिन्यांचा लिलावाच्या प्लॅटफॉर्मवर आणि/किंवा लिलाव केंद्रावर प्रदर्शित केल्यावर पुढील कामकाजी दिवसांवर लिलाव केला जाईल. शाखा स्तरावरील लिलाव अयशस्वी झाल्यास, **07.05.2025** रोजी त्यांचा निर्दिष्ट जिल्हा केंद्रात जिल्हा स्तरावर आणखी कोणत्याही नोटीसशिवाय पुन्हा लिलाव करण्यात येईल. कोणत्याही कारणास्तव, येथे उल्लेखित तारखेस जिल्हा स्तरावर लिलाव होऊ शकला नाही किंवा त्या दिवशी लिलाव पूर्ण होऊ शकला नाही, तर त्याच अटी व शर्तींसह पुढील कोणत्याही तारखेला जिल्हा स्तरावर लिलाव आयोजित करण्याचा किंवा पुढे नेण्याचा अधिकार आयआयएफएल राखून ठेवते. जर ग्राहकाचा मृत्यू झाला, तर सर्व नियम आणि अटी त्याच्या नॉमिनी/ वैधानिक वारसदार यांच्यावर लागू होणार.

जिल्हा केंद्र: **बीड– सुभाष रोड गोल्ड लोन – एच. क्रमांक 211290, प्रकाश हाइट्स, सुभाष रोड, बीड–431122**

**शाखेचे नांव:अंबेजोगाई–नगरपालिका संकुल जीएल, तालुका – अंबेजोगाई.**

**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL32885907, GL25570938, GL32854809, GL33459294, GL33438766, GL33350116, GL33335983, GL32903561, GL32926213, GL33383554, GL33944829, GL33382948, GL33085407, GL27198354, GL33067838, GL33398095, GL33921918, GL33938628, GL32793969, GL32788431, GL33589152, GL33588593, GL33055015, GL34216359, GL34194779, GL33041597, GL33794809, GL34106446, GL32122456, GL32105651, GL34194841, GL34216788, GL33121856, GL33105105, GL32166546, GL32797240.

**शाखेचे नांव: आष्टी शनी मंदिर रोड जीएल, तालुका – आष्टी.**

**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL25289280, GL26318365, GL30909912, GL30924249, GL33394692.

**शाखेचे नांव: बीड–बीड मोहो, तालुका – बीड.**

**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL33648528, GL33835744, GL25427933.

**शाखेचे नांव: बीड– सुभाष रोड गोल्ड लोन, तालुका – बीड.**

**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL31866488, GL34036968, GL34601153, GL32371528, GL32369769, GL33166204, GL32169741, GL32149410, GL31533816, GL33369534, GL33189062, GL32709833, GL33266178, GL33254478, GL25165703, GL33010129, GL33021676, GL30962267, GL31286648, GL30965920, GL34202436, GL32149726, GL33322562, GL33298684, GL26398672.

ई–लिलाव हा ''जिथे आहे तसे'', ''जसे आहे तसे'' आणि ''जेवढे आहे तेवढे'' या तत्वावर केला जाईल आणि आयआयएफएल द्वारे कोणत्याही प्रकारे सोन्याच्या दागिन्यांची गुणवत्ता, शुद्धता, कॅरेट, वजन किंवा मूल्यांकनाचे प्रतिनिधीत्वं केले जाणार नाही. ई–लिलाव प्रक्रिया आणि विक्री (झाल्यास) ई–लिलावाकरिता असलेल्या अटी आणि नियम या संपूर्णपणे आयआयएफएलच्या अनुसार किंवा लागू करतांना त्यांना अनुरूप वाटतील त्या पद्धतीच्या असतील. आयआयएफएल स्वत:हून, लिलाव पुढे ढकलू किंवा रद्द करू शकेल, लिलावाच्या यादी मधून एखाद्या खात्याचे नाव वगळण्याचा अधिकार देखील आयआयएफएल कडेच असेल आणि हे करताना त्याकरिताची पुर्व सूचना, करण्यामागची कारणे, एखाद्या बोलीचा स्वीकार किंवा रद्दीकरण केल्याची कारणे देण्याची कोणतीही आवश्यकता नसेल. थकबाकी असलेल्या ऋणकोंची यादी, त्यांनी जमा केलेले दागिने आणि इतर तपशील हा संबंधित शाखांमध्ये दिलेला असेल. अयशस्वी कर्जदारांकडे हा पर्याय आहे की त्यांनी अद्ययावत व्याज आणि सर्व लागू शुल्कांसह संपूर्ण थकबाकीची परतफेड करावी जेणेकरुन ही नोटीस प्रकाशित झाल्यानंतरही त्यांचे कर्ज खाते बंद करण्याचा किंवा नियमित करण्याचा पर्याय असतो परंतु कोणत्याही परिस्थितीत लिलावाच्या तारखेपर्यंतच हे शक्य आहे, यात ते अयशस्वी झाल्यास सोन्याचे दागिने विकले जातील आणि थकबाकी (असल्यास) व्याज आणि खर्चासह वसूल केली जाईल. ही सूचना छापून आल्यानंतर जर एखाद्या ऋणकोने आपल्या कर्जाचा व्यवहार पूर्ण केला किंवा आपली थकबाकी भरून कर्ज खाते बंद केले, तर त्याला या सूचनेच्या छपाईचा संपूर्ण खर्च मात्र उचलावा लागेल. ऋणकोंना आपल्या बँक खात्यांचा तपशील शाखेकडे जमा/अद्ययावत करण्याची विनंती केली जाते आहे जेणेकरून लिलाव प्रक्रियेमधून निघालेला परतावा असल्यास तो जमा करता येऊ शकेल.

**तपशीलवार माहिती, अटी आणि नियम जाणून घेण्याकरिता कृपया आयआयएफएल फायनान्स लिमिटेडच्या नजिकच्या शाखेशी संपर्क साधा.**

तारीख : **23.04.2025**
स्थळ: बीड

स्वाक्षरीकर्ता/–
अधिकृत स्वाक्षरीकर्ता
आयआयएफएल फायनान्स लिमिटेड

CIN: L67100MH1995PLC093797
Regd. Office: IIFL House, Sun Infotech Park, Road No. 16V, Plot No.B-23, Thane Industrial Area, Wagle Estate, Thane - 400604
Tel: (91-22) 41035000 • Fax: (91-22) 25806654
E-mail: reach@iifl.com • Website: www.iifl.com

सोन्याचा दागिन्यांचा ई–लिलावाची सार्वजनिक सूचना

येथे सगळ्या संबंधित ऋणकोंना विशेषत: आणि सर्व सामान्य नागरिकांना, सामान्यपणे असे सूचित करण्यात येते की, आम्ही आयआयएफएल फायनान्स लिमिटेड (''आयआयएफएल'') येथे थकबाकी असलेल्या कर्जदारांच्या सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव करणार आहोत, यामध्ये वारंवार सूचना देऊन देखील कर्जाची रक्कम न भरलेल्या किंवा कर्ज खाते सामान्य करू न शकलेल्या ऋणकोंचा समावेश केला गेला आहे. खालील कर्ज खात्यांसाठी गहाण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा **ई–प्रोक्योरमेंट टेक्नोलॉजीज लिमिटेड** मार्फत त्यांच्या **https://egold.auctiontiger.net** या ऑनलाईन लिलाव मंचावरून दिनांक **26.04.2025 रोजी दुपारी 02:00 ते 05:00** दरम्यान सार्वजनिक लिलाव करण्यात येणार आहे. स्थान किंवा तारखेतील बदल (जर असल्यास) लिलाव केंद्राकडे दर्शविला जाईल. येथे उल्लेख केलेल्या तारखेस कोणत्याही कारणास्तव ई–लिलाव होऊ शकला नाही किंवा त्याच दिवशी पूर्ण झाला नाही, तर लिलावाच्या प्लॅटफॉर्मवर आणि/किंवा लिलाव केंद्रावर त्याच अटी व शर्तींसह उक्त लिलाव पुढील कोणत्याही तारखेला आयोजित करण्याचा किंवा पुढे नेण्याचा अधिकार आयआयएफएल राखून ठेवते. लिलावात विक्री न झालेले सोन्याच्या दागिन्यांचा लिलावाच्या प्लॅटफॉर्मवर आणि/किंवा लिलाव केंद्रावर प्रदर्शित केल्यावर पुढील कामकाजी दिवसांवर लिलाव केला जाईल. शाखा स्तरावरील लिलाव अयशस्वी झाल्यास, **07.05.2025** रोजी त्यांचा निर्दिष्ट जिल्हा केंद्रात जिल्हा स्तरावर आणखी कोणत्याही नोटीसशिवाय पुन्हा लिलाव करण्यात येईल. कोणत्याही कारणास्तव, येथे उल्लेखित तारखेस जिल्हा स्तरावर लिलाव होऊ शकला नाही किंवा त्या दिवशी लिलाव पूर्ण होऊ शकला नाही, तर त्याच अटी व शर्तींसह पुढील कोणत्याही तारखेला जिल्हा स्तरावर लिलाव आयोजित करण्याचा किंवा पुढे नेण्याचा अधिकार आयआयएफएल राखून ठेवते. जर ग्राहकाचा मृत्यू झाला, तर सर्व नियम आणि अटी त्याच्या नॉमिनी/ वैधानिक वारसदार यांच्यावर लागू होणार.

जिल्हा केंद्र: **औरंगाबाद–पैठण गेट रोड - जोशी हाईट्स, कमर्शियल तळमजला, उजव्या बाजूचा भाग, सीटीएस क्रमांक १४१८५ क्रांती चौक ते गुलमंडी रोड, पैठण गेट परिसर, औरंगाबाद–४३१००१**

**शाखेचे नांव: औरंगाबाद–औरंगाबाद जी8एच, तालुका – छत्रपती संभाजी नगर .**

**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL24526444, GL31917262, GL34064123, GL25507377, GL24261839, GL32135612, GL32448167, GL24942507, GL25276199, GL34633527, GL24644419, GL31723856, GL34325426, GL34235412, GL28188070, GL25398272, GL34342461, GL26354906, GL32103661, GL24486712, GL34658785, GL34248804, GL25106823, GL30309507, GL30874794, GL34731726, GL34643368, GL28320573, GL25242118.

**शाखेचे नांव: औरंगाबाद–चिखलठाणा जीएल, तालुका – छत्रपती संभाजी नगर.**

**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL33238556, GL33223202, GL33443682, GL32441583, GL33460425, GL32417462, GL33460636, GL31231909, GL25366025, GL34775793, GL33449459, GL33900383, GL32794286, GL32801349.

**शाखेचे नांव: औरंगाबाद–सिडको गोल्ड लोन, तालुका – छत्रपती संभाजी नगर.**

**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL32240615, GL30949910, GL33351512, GL33328732, GL30938744, GL33151953, GL32855006, GL34101257, GL25289733, GL34110803, GL33141322, GL32971584, GL33468085, GL32166393, GL32983905, GL32847400, GL32858536, GL33321328, GL33300172, GL33414174, GL32903118, GL32922995, GL33816328, GL32714990, GL34156667, GL34156778, GL34101475, GL32543962, GL34192130, GL34050887, GL34174227, GL31843447, GL32788086, GL31901178, GL31884433, GL31851672, GL33889654, GL34026665, GL34049234, GL32119188, GL32110496, GL33300615, GL33004403, GL33024884, GL32855390, GL33873347, GL32799723, GL34237302.

**शाखेचे नांव: एमआयडीसी वाळूज औरंगाबाद, तालुका – गंगापूर**

**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL32980620, GL32805413, GL32785822, GL33145296, GL32790130, GL34084881, GL34057516, GL32806472, GL33141746, GL32264657, GL33377949, GL33007821, GL33020709, GL33402096, GL33429316.

**शाखेचे नांव: औरंगाबाद –पैठण गेट रोड, तालुका – छत्रपती संभाजी नगर.**

**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL34113434, GL34092233, GL32470917, GL32446421, GL34152107, GL34152327, GL33396552, GL34142488, GL34127000, GL33377842, GL34340124, GL32745105, GL32736878, GL34156405, GL25839738, GL34077787, GL34131558, GL33786213, GL25087081, GL34236867, GL34297108, GL34318408.

**शाखेचे नांव: औरंगाबाद–शिवाजीनगर, तालुका – छत्रपती संभाजी नगर.**

**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL33419837, GL33528902.

**शाखेचे नांव: विवेकानंद–नगर औरंगाबाद, तालुका – छत्रपती संभाजी नगर.**

**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL33421854, GL34258253, GL34378406, GL33077162, GL34070769, GL33186224, GL32339641, GL32333703, GL32130997, GL32871210, GL32892086, GL32052945, GL33935740, GL31990349, GL31974804.

**शाखेचे नांव: वैजापूर –स्टेशन रोड जीएल, तालुका – वैजापूर.**

**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL33502732, GL27292755, GL32861230, GL32847382, GL33418203, GL33340861, GL32132777, GL32145451.

ई–लिलाव हा ''जिथे आहे तसे'', ''जसे आहे तसे'' आणि ''जेवढे आहे तेवढे'' या तत्वावर केला जाईल आणि आयआयएफएल द्वारे कोणत्याही प्रकारे सोन्याच्या दागिन्यांची गुणवत्ता, शुद्धता, कॅरेट, वजन किंवा मूल्यांकनाचे प्रतिनिधीत्वं केले जाणार नाही. ई–लिलाव प्रक्रिया आणि विक्री (झाल्यास) ई–लिलावाकरिता असलेल्या अटी आणि नियम या संपूर्णपणे आयआयएफएलच्या अनुसार किंवा लागू करतांना त्यांना अनुरूप वाटतील त्या पद्धतीच्या असतील. आयआयएफएल स्वत:हून, लिलाव पुढे ढकलू किंवा रद्द करू शकेल, लिलावाच्या यादी मधून एखाद्या खात्याचे नाव वगळण्याचा अधिकार देखील आयआयएफएल कडेच असेल आणि हे करताना त्याकरिताची पुर्व सूचना, करण्यामागची कारणे, एखाद्या बोलीचा स्वीकार किंवा रद्दीकरण केल्याची कारणे देण्याची कोणतीही आवश्यकता नसेल. थकबाकी असलेल्या ऋणकोंची यादी, त्यांनी जमा केलेले दागिने आणि इतर तपशील हा संबंधित शाखांमध्ये दिलेला असेल. अयशस्वी कर्जदारांकडे हा पर्याय आहे की त्यांनी अद्ययावत व्याज आणि सर्व लागू शुल्कांसह संपूर्ण थकबाकीची परतफेड करावी जेणेकरुन ही नोटीस प्रकाशित झाल्यानंतरही त्यांचे कर्ज खाते बंद करण्याचा किंवा नियमित करण्याचा पर्याय असतो परंतु कोणत्याही परिस्थितीत लिलावाच्या तारखेपर्यंतच हे शक्य आहे, यात ते अयशस्वी झाल्यास सोन्याचे दागिने विकले जातील आणि थकबाकी (असल्यास) व्याज आणि खर्चासह वसूल केली जाईल. ही सूचना छापून आल्यानंतर जर एखाद्या ऋणकोने आपल्या कर्जाचा व्यवहार पूर्ण केला किंवा आपली थकबाकी भरून कर्ज खाते बंद केले, तर त्याला या सूचनेच्या छपाईचा संपूर्ण खर्च मात्र उचलावा लागेल. ऋणकोंना आपल्या बँक खात्यांचा तपशील शाखेकडे जमा/अद्ययावत करण्याची विनंती केली जाते आहे जेणेकरून लिलाव प्रक्रियेमधून निघालेला परतावा असल्यास तो जमा करता येऊ शकेल.

**तपशीलवार माहिती, अटी आणि नियम जाणून घेण्याकरिता कृपया आयआयएफएल फायनान्स लिमिटेडच्या नजिकच्या शाखेशी संपर्क साधा.**

तारीख : **23.04.2025**
स्थळ: छत्रपती संभाजी नगर

स्वाक्षरीकर्ता/–
अधिकृत स्वाक्षरीकर्ता
आयआयएफएल फायनान्स लिमिटेड

## अग्रलेख...

# भगीरथाचे आम्ही वंशज...

उन्हाळा सुरू झाला की देशात तसेच राज्यातही पाणीटंचाईची समस्या उग्र रूप धारण करते. पाण्यासाठी लोकांची विशेषतः महिलांची पायपीट सुरू होते. दुर्गम आणि ग्रामीण भागात पाणीटंचाईची समस्या तशीही तीव्र असते. गेल्या काही वर्षांत त्याची झळ शहरी भागांतही बसू लागली आहे. यावर्षी संपूर्ण राज्याला पाणीटंचाईच्या समस्येला सामोर जावे लागेल, असे दिसते आहे. एप्रिल महिनाही संपला नसताना राज्यातील धरणातील पाणीसाठा ३८ टक्क्यांवर आला आहे. पूर्ण मे महिना अजून बाकी आहे. त्यामुळे मे महिन्याच्या भर उन्हाळ्यात काय होणार याचा विचार अंगावर काटा आणतो आहे.

विदर्भात तर सूर्य आग ओकू लागला आहे. आताच विदर्भातील अनेक शहरांतील तापमान ४५ अंशांवर गेले आहे. सूर्य हा आगीचा गोळा झाला आहे. मे महिन्यात तापमान ५० अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. उन्ह जेवढे तापेल, तेवढी सर्वच क्षेत्रांत पाण्याची गरज वाढत असते. एरवी एक वेळा अंघोळ करणाऱ्याला उन्हाळ्यात दोन वेळा अंघोळ करायची इच्छा असते, नव्हे परिस्थितीचीच तशी गरज असते. उन्हाळ्यात आगी लागण्याच्या घटनाही वाढत असतात, आग विझवण्यासाठी मोठ्या प्रमाणात पाण्याची गरज भासत असते. पण नेमका उन्हाळ्यातच जनतेला पाणीटंचाईचा सामना करावा लागतो. वाढती उष्णता आणि पाणीटंचाईमुळे जनतेच्या तोंडचे पाणीही पळून जाते. पाण्याचे महत्त्व उन्हाळ्यातच आमच्या लक्षात येते, पण तोपर्यंत वेळ निघून गेली असते. महाराष्ट्रात सहा महसूल विभाग आहेत. त्यापैकी पुणे, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर या तीन महसूल विभागांत धरणातील पाणीसाठा आताच ४० टक्क्यांपेक्षा कमी झाला आहे. पुणे विभागातील पाणीसाठा तर राज्यात सर्वांत कमी आहे. पाण्याच्या टंचाईमुळे दैनंदिन जीवनात लोकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. मराठवाड्यात तर दहा-बारा दिवसांत एकदा नळ येतो, अकोल्यात पाणी चोरी जाऊ नये म्हणून लोकांनी टाक्याला कुलपेही लावली आहेत, असे म्हणतात. माणसालाच जर प्यायला पाणी मिळत नसेल तर पशुपक्ष्यांचे काय हाल होत असतील, याची आपण कल्पनाही करू शकत नाही. विशेष म्हणजे पाणीटंचाईची समस्या ही फक्त महाराष्ट्रात आणि भारतातच नाही तर संपूर्ण जगात आहे. म्हणजे ही जागतिक समस्या झाली आहे. तिसरे महायुद्ध झाले तर ते पाण्यासाठी होईल, असे म्हटले जाते. ही अतिशयोक्ती नाही तर वस्तुस्थिती आहे. पाण्याचे महत्त्व आम्ही आताच ओळखले नाही आणि पाणी वाचवणे तसेच त्याचा जपून आणि काटकसरीने वापर करणे सुरू केले नाही, तर पाण्यासाठी होणारे तिसरे महायुद्ध आमच्या घराच्या उंबरठ्यापर्यंत यायला फारसा वेळ लागणार नाही.

जगातील तापमान दिवसेंदिवस वाढत आहे. जगाच्या अनेक भागांत उष्णतेच्या लाटा सुरू झाल्या आहे. याचे कारण पृथ्वीचे तापमान वाढत आहे. पृथ्वीचे तापमान वाढल्यामुळे अंटार्टिकावरील बर्फ वितळू लागला आहे. यामुळे दुहेरी समस्या उदभवत आहे. पहिली म्हणजे तापमान वाढल्यामुळे त्याचा प्रतिकूल परिणाम जसा होत आहे, तसेच अंटार्टिकावरील बर्फ वितळू लागल्यामुळे समुद्रातील पाण्याची पातळीही वाढत आहे. त्यामुळे समुद्र किनाऱ्यावरच्या शहरांना असलेला धोका वाढला आहे. येत्या पन्नास-शंभर वर्षांत समुद्र किनाऱ्यावरील अनेक शहरांना जलसमाधी मिळण्याची भीती व्यक्त केली जात आहे, ती उगीच नाही.

पाणीटंचाईच्या समस्येचा आम्हाला समग्र आणि व्यापक विचार करावा लागणार आहे. आजच आमचे डोळे उघडले नाही तर येणारा काळ आमच्यासाठी मोठे संकट घेऊन येणार आहे, आमचे भविष्य अंधकारमय करणार आहे. पाणी वाचवा आणि पाण्याचा जपून वापर करा, असे अभियान आम्हाला राबवावे लागणार आहे. पाणी मुबलक आहे, म्हणून लोक पाण्याचा अपव्यय करतात, नको त्या गोष्टीसाठी पाण्याचा दुरुपयोग केला जातो. त्यामुळे पाण्याची उधळपट्टी आम्ही टाळली पाहिजे. पाणी वाचवा अभियान फक्त दैनिकातील छायाचित्रासाठी म्हणजे प्रसिद्धीसाठी राहणार नाही, याची काळजीही आम्हाला घ्यावी लागेल. आम्ही पाणी वाचवले नाही तर पाणी आम्हाला वाचवणार नाही, हे आम्ही लक्षात ठेवले पाहिजे. कारण पाणी आमचे भविष्य आहे. पाणी नसले तर जगात काहीच होऊ शकणार नाही. देशातील असो वा जगातील कोणताही विकास हा पाण्यावर अवलबूंन असतो.

पाऊस आला नाही तर आम्हाला प्यायला पाणी मिळणार नाही, शेतीत अन्नधान्य, भाजी फळफळावळे पिकू शकणार नाहीत. म्हणजे आम्हाला प्यायला पाणी तसेच खायला अन्नही मिळणार नाही. पाणी आणि अन्न मिळाले नाही तर आम्ही जगू तरी कसे. माणूस जगला तरच विकासाचा मुद्दा उद्भवेल, माणूसच नसेल तर विकासाचा मुद्दाच उद्भवणार नाही. ही थोडी अतिशयोक्ती वाटत असली तरी ती वस्तुस्थिती आहे. जगातील तापमान हळूहळू वाढत आहे. पंचवीस तीस वर्षांपूर्वी आजच्या एवढे तापत नव्हते. तापमान ३५ अंशांच्या वर जात नव्हते. आता मात्र तापमान पन्नाशी ओलांडत आहे. गेल्या काही वर्षांत जगातील उष्ण दिवसांची संख्या वाढत आहे, उष्णतेच्या लाटांचे (हिट वेव्ह) प्रमाण वाढले आहे. सरासरीपेक्षा तापमान ४ अंशांनी वाढले आणि हे तापमान सलग तीन दिवस कायम राहिले तर त्याला उष्णतेची लाट मानले जाते. अशा उष्णतेच्या लाटांचे प्रमाण गेल्या वर्षांत धोकादायकपणे वाढले आहे. गेल्या काही वर्षांत वातावरणातील हा बदल कशामुळे झाला, याचा विचार आम्हाला करावा लागणार आहे. पाण्याचे महत्त्व लोकांना पटवून द्यावे लागणार आहे.

राजकीय पक्षांनीही याचा गंभीरपणे विचार केला पाहिजे. पाणीटंचाईमुळे महानगरपालिकांसमोर माठ फोडले आणि दैनिकात छापून आलेले आपले छायाचित्र पाहिले म्हणजे राजकीय नेत्यांना आपले जीवन कृतार्थ झाल्यासारखे वाटते. पण त्याने मूळ समस्या सुटत नाही, लोकांनाही न्याय मिळत नाही. राज्याच्या अनेक भागांत पाणीटंचाईची समस्या हे टँकरलॉबीसाठी मोठे कुरण आहे. पाणीटंचाईची समस्या जेवढी मोठी तेवढी टँकरवाल्यांची चांदी असते. पाणीटंचाईमुळे त्याच्या घरात पाणी धो धो येत नसले तरी पैसा मात्र धो धो येत असतो. त्यामुळे काही मूठभर टँकरचालक, सरकारी अधिकारी आणि राजकीय नेत्यांसाठी पाणीटंचाई ही हवीहवीशी आहे. मात्र सर्वसामान्य जनतेच्या तसेच शेतकऱ्यांच्या व्यापक हितासाठी पाणीटंचाईच्या कारणांचा शोध घेत त्या कारणांचे कायमस्वरूपी निराकरण करण्याची गरज आहे. त्यासाठी पावसाचे प्रमाण वाढवावे लागणार आहे. विकासाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात होणारी वृक्षतोड हे पाऊस कमी पडण्याचे एक कारण आहे. पाऊस पडला तर त्याचे पाणी वाहात जाते, पावसाचे पाणी जमिनीत जिरवण्याची गरज आहे. मध्यंतरी शासनाची पाणी अडवा पाणी जिरवा अशी मोहीम होती. पण या मोहिमेने पाणी किती अडले आणि जिरले हे माहिती नाही, पण शासनाचा पैसा काही मूठभर नेत्यांच्या आणि ठेकेदारांच्या घरात नक्की जिरला होता.

आमच्या देशात जेवढा पाऊस पडतो, त्याच्या काही टक्केच पाऊस इस्रायलसारख्या देशात पडतो. पण त्या देशाने पडणाऱ्या पावसाचा प्रत्येक थेंब वाचवला आहे. कमीतकमी पाण्याचा वापर करत इस्त्रायलला नंदनवन बनवले आहे. आमच्यापेक्षा त्यांच्याकडची शेती आणि बगिचे अतिशय देखणे आहेत. डोळ्यांचे पारणे फेडणारे आहे. कारण त्या देशातील जनतेला पाण्याचे महत्त्व कळले आहे. आमच्या देशात अति तेथे मातीची लोकांची मानसिकता झाली आहे. अजूनही वेळ गेली नाही. पाणीटंचाईच्या या संकटाचा आम्ही सामना करू शकतो, या संकटावर मात करू शकतो. आम्ही आजपासून कामाला लागलो तर धरणातील पाणीसाठा उद्यापर्यंत निश्चित वाढवू शकतो. पण त्यासाठी प्रामाणिक आणि दृढ इच्छाशक्तीची गरज आहे. मनात आणले तर आमच्यासाठी अशक्य असे काही काही नाही. गंगेचा प्रवाह अथक प्रयत्नाने वळवून भारतात आणणाऱ्या भगीरथाचेच आम्ही वंशज आहोत, याचा विसर कोणी पडू देऊ नये. ▮

## आंतरराष्ट्रीय

# बांगलादेश-पाकमध्ये भरपाईचा मुद्दा कळीचा

प्रा. जयसिंग यादव

बांगलादेश आणि पाकिस्तानमध्ये परराष्ट्र सचिव स्तरावरील बैठका नियमितपणे होत होत्या; मात्र या वेळी तब्बल १५ वर्षांनी ही बैठक झाली. पाकिस्तानच्या परराष्ट्र सचिव आमना बलोच यांनी बांगलादेशची राजधानी ढाका येथे बांगलादेशचे परराष्ट्र सचिव मोहम्मद जशीमुद्दीन यांच्याशी औपचारिक बैठक घेतली. याशिवाय त्यांनी परराष्ट्र व्यवहार सल्लागार आणि मुख्य सल्लागार यांच्याही स्वतंत्र बैठका घेतल्या. उभय देशांमधील संबंधांचा नवा अध्याय सुरू झाल्यानंतर पहिल्या औपचारिक चर्चेत त्यांच्यातील न सोडवलेल्या ऐतिहासिक मुद्द्यांवर चर्चा झाली, तर परस्परसंबंध दृढ करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांवरही चर्चा झाली. बांगलादेशचे परराष्ट्र सचिव जशीमुद्दीन यांनी सांगितले की, बांगलादेशने स्वातंत्र्यपूर्व काळातील कृत्यांची भरपाई म्हणून पाकिस्तानकडून ४.३२ अब्ज डॉलर्स म्हणजेच ३६ हजार कोटी रुपयांची मागणी केली आहे. आमना बलोचसोबतची बैठक आटोपल्यानंतर त्यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. १९७१ मध्ये दोन्ही देश एक असतानाच्या संयुक्त मालमत्तेतून पाकिस्तानने बांगलादेशला ही रक्कम दिली पाहिजे, असे बांगलादेशने या बैठकीमध्ये सांगितले. यासोबतच ते म्हणाले की, १९७० मध्ये आलेल्या चक्रीवादळाच्या वेळी बांगलादेशला (तत्कालीन पूर्व पाकिस्तान) मदत करण्यासाठी मिळालेले २०० दशलक्ष डॉलर (सुमारे २४०० कोटी रुपये) पाकिस्तानने द्यावेत. दुसरीकडे, स्टेट बँक ऑफ पाकिस्तानच्या आकडेवारीनुसार या महिन्याच्या चार तारखेला पाकिस्तानचा परकीय चलन साठा १५.७५ अब्ज होता. याचा अर्थ बांगलादेशची मागणी पूर्ण करण्यासाठी पाकिस्तानला आपल्या परकीय चलनाच्या गंगाजळीच्या एक चतुर्थांशपेक्षा जास्त रक्कम खर्च करावी लागेल.

याशिवाय बांगलादेशने १९७१ च्या मुक्तिसंग्रामात पाकिस्तानने केलेल्या अत्याचाराबद्दल औपचारिक माफी मागण्याचा मुद्दाही बैठकीत उपस्थित केला; मात्र पाकिस्तानने या मुद्द्यावर जाहीरपणे काहीही सांगितले नाही. जवळपास दीड दशकानंतर परराष्ट्र सचिव स्तरावर होणाऱ्या या बैठकीकडे अनेकांच्या नजरा खिळल्या होत्या; मात्र बांगलादेश आणि पाकिस्तानचे संबंध कधीच थेट राहिले नाहीत. अवामी लीग सरकारच्या गेल्या तीन टर्ममध्ये ते रसातळाला पोहोचले होते. गेल्या वर्षी ५ ऑगस्ट रोजी अवामी लीग सरकारला सत्तेतून काढून टाकल्यानंतर बांगलादेश आणि पाकिस्तानमधील राजनैतिक संबंधांचे नूतनीकरण करण्याचे प्रयत्न दिसून आले. ही प्रक्रिया पुढे नेण्यासाठी पाकिस्तानच्या परराष्ट्र सचिव आमना बलोच यांनी ढाका गाठले होते. बांगलादेशच्या स्वातंत्र्याचा इतिहास पूर्व पाकिस्तान काळापासून बांगलादेश आणि पाकिस्तान यांच्यातील संबंधांशी अतूट जोडलेला आहे. बांगलादेशच्या स्वातंत्र्यानंतरही दोन्ही देशांच्या अंतर्गत राजकारणात आणि



द्विपक्षीय मुत्सद्देगिरीमध्ये हा इतिहास वारंवार चर्चिला गेला आहे. परराष्ट्र सचिव स्तरावरील ताज्या बैठकीत बांगलादेशने उभय देशांमधील परस्परसंबंध अधिक दृढ करण्यासाठी न सुटलेले प्रश्न सोडवण्याची मागणी केली आहे.

यावेळी बांगलादेशचे परराष्ट्र सचिव मोहम्मद जशीमुद्दीन म्हणाले की, बैठकीदरम्यान अविभक्त मालमत्तेचे समान विभाजन, येथे अडकलेल्या पाकिस्तानींचे प्रत्यार्पण, १९७० च्या चक्रीवादळामुळे प्रभावित झालेल्या लोकांना मदत करण्यासाठी परदेशातून आलेल्या मदतीचे पैसे देणे आणि १९७१ मध्ये तत्कालीन पाकिस्तानी सैन्याने केलेल्या सामूहिक हत्याकांडासाठी जाहीर माफी या मुद्द्यांवर चर्चा झाली. मोहम्मद जशीमुद्दीन पुढे म्हणाले, मी परराष्ट्र सचिवांसोबतच्या बैठकीत या आकडेवारीचा उल्लेख केला. बांगलादेशमध्ये अडकलेल्या पाकिस्तानी नागरिकांना पर्याय दिल्यास काहींना बांगलादेशमध्ये राहायचे आहे तर काहींना पाकिस्तानमध्ये परतायचे आहे. अशा प्रकारे देशात अडकलेल्या पाकिस्तानी नागरिकांची संख्या सुमारे ३.२५ लाख आहे. जशीमुद्दीन यांच्या म्हणण्यानुसार, या न सुटलेल्या मुद्द्यांवर चर्चा सुरू ठेवण्याचे आश्वासन पाकिस्तानने दिले आहे. बांगलादेश आता भारताऐवजी पाकिस्तानकडे झुकत आहे का, या प्रश्नाचे उत्तर देताना ते म्हणाले की, सद्यःस्थितीमध्ये पाकिस्तानसोबतच्या बांगलादेशच्या संबंधांचा पाया मजबूत करण्यासाठी न सुटलेले प्रश्न सोडवणे आवश्यक आहे. पाकिस्तान आणि बांगलादेशदरम्यान थेट विमानसेवा सुरू झाल्याचा उल्लेख करताना ते म्हणाले की, एका देशातील लोक दुसऱ्या देशात गेले तर त्याला सबमिशन म्हणता येणार नाही. एकमेकांचा आदर आणि परस्परहित हाच पाकिस्तानसोबतच्या आमच्या संबंधांचा आधार आहे. आम्ही यामध्ये आमचे फायदेशीर पैलू पाहात आहोत. आपली भूमिका स्पष्ट करणे आणि त्यासोबत पुढे जाणे हे मुत्सद्देगिरीचे काम आहे. या मुद्द्यांवर भविष्यात चर्चा सुरू ठेवू इच्छित असल्याचे पाकिस्तानने म्हटले आहे.

बांगलादेशच्या अंतरिम सरकारचे मुख्य सल्लागार मोहम्मद युनूस यांनी व्यापाराच्या शक्यतांचा शोध घेण्यासाठी पाकिस्तानशी संबंध अधिक दृढ करण्याच्या गरजेवर भर दिला आहे. युनूस यांनी 'नॅशनल गेस्ट हाऊस'मध्ये पाकिस्तानच्या परराष्ट्र सचिव आमना बलोच यांच्याशी झालेल्या भेटीदरम्यान हे आवाहन केले. युनूस म्हणाले, काही अडथळे नक्कीच आहेत; पण आम्हाला त्यावर मात करून पुढे जाण्याचे मार्ग शोधावे लागतील. दुसरीकडे आमना बलोच म्हणाल्या, बांगलादेश आणि पाकिस्तान यांच्यातील व्यवहारांच्या शक्यतांचा फायदा घेण्यासाठी मार्ग शोधावे लागतील. आमच्याकडे खूप मोठी प्रादेशिक बाजारपेठ आहे. आम्ही त्याचा पुरेपूर वापर केला पाहिजे. आम्ही प्रत्येक वेळी ही संधी सोडू शकत नाही. बांगलादेश आणि पाकिस्तानच्या परराष्ट्र सचिवांची बैठक ढाका येथे झाली. ही बैठक १५ वर्षांनी झाली. बांगलादेश आणि पाकिस्तान या दोन्ही देशांच्या माध्यमांमध्ये या भेटीबाबत बरेच काही बोलले जात आहे. बहुतांश बांगलादेशी वृत्तपत्रांनी याबाबतच्या बातम्यांना प्रसिद्धी दिली आहे.

पाकिस्तानमधील प्रमुख वृत्तपत्र असलेल्या 'द डेली स्टार'ने लिहिले आहे की, १९७१ पूर्वीची पाकिस्तानची भूमिका बांगलादेशींसाठी वेदनादायक होती. दोन्ही देशांमध्ये वास्तविक आणि प्रभावी नातेसंबंध निर्माण करण्यात हा अडथळा आहे. पाकिस्तानी सैन्याने मारलेले नागरिक आणि बांगलादेशच्या स्वातंत्र्याच्या लढ्यात कराव्या लागलेल्या दडपशाही आणि क्रूरतेचा सामना ही ऐतिहासिक नोंद आहे. बांगलादेशसाठी औपचारिक माफी किंवा नुकसानभरपाई हा बदला नाही, तर ऐतिहासिक शोकांतिका आहे, हे मान्य करून खऱ्या सलोख्याच्या दिशेने वाटचाल करणे गरजेचे आहे. यात गुंतागुंत आहे आणि त्यासाठी विचारपूर्वक पावले उचलली पाहिजेत. या वृत्तपत्राने पाकिस्तानने माफी मागावी या मागणीचे समर्थन केले असून अशा समस्या असतानाही बांगलादेशने पाकिस्तानसोबतचे संबंध सुधारण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे म्हटले आहे.

'डेली सन'च्या वृत्तानुसार, दोन नेत्यांच्या भेटीनंतरच्या संयुक्त निवेदनात, काश्मीरचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला. यामध्ये पाकिस्तानने संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या ठरावांच्या आधारे काश्मीर प्रश्न सोडवण्याबाबत भाष्य केले. बांगलादेशने १९७१ च्या मुक्तिसंग्रामात पाकिस्तानने केलेल्या अत्याचाराबद्दल औपचारिक माफी मागण्याचा मुद्दाही बैठकीत उपस्थित केला गेला; मात्र पाकिस्तानने या मुद्द्यावर जाहीरपणे काहीही सांगितले नाही. ▮

(लेखक राज्यशास्त्राचे प्राध्यापक आहेत.)

## वेध

# जीवनशैली बदला, वसुंधरेला वाचवा

नितीन शिरसाट

बदलत्या जीवनशैलीमुळे संपूर्ण वसुंधरेची प्रकृती ढासळत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून अमर्याद प्लॅस्टिकचा वापर, कचरा, घाणीचे साम्राज्य या कारणांनी वसुंधरेचा श्वास गुदमरला आहे. पर्यावरणाचे संवर्धन करणे ही आपली प्रत्येकाची जबाबदारी आणि संस्कृती आहे. सध्या दररोजच्या वापरात प्लॅस्टिक पिशव्यांचा वापर वाढला आहे. दुधाची पिशवी, किराणा, फळभाजी विक्रेते, प्रत्येक लहान मोठे व्यापारी सर्रासपणे प्लॅस्टिकचा वापर करीत असतात. या पिशव्या सांडपाण्याच्या नाल्यात अडकल्याने पाण्याचा निचरा होत नाही. परिणामी डास व दुर्गंधीने मलेरिया, डेंग्यूसारखे आजार होऊन नागरिकांचे आरोग्य धोक्यात येते. आर्थिक, शारीरिक नुकसान होऊन शासनाचा दरवर्षी स्वच्छता अभियानावर फार मोठा खर्च होतो. प्लॅस्टिकवर बंदी असताना सुद्धा प्रत्येक जण बाजारात जाताना आपल्याजवळ कापडी पिशवी न ठेवता विक्रेत्याकडून प्लॅस्टिक पिशवी घेतात. पूर्वी दूध, दही, ताकासाठी स्टीलचे भांडे सोबत घेऊन जाणारे, हातात कापडी पिशवी घेऊन जाणाऱ्यांची संख्या मोठी होती. आता आधुनिक युगात सर्वत्र झटपट झाल्याने त्याचा समाजजीवनावर दुष्परिणाम झालेला दिसतो. प्रत्येक जण आपल्या सोयीनुसार वागतो व आपल्या परिवाराला संकटात टाकतो. संशोधनाच्या मते, मानवाला होणाऱ्या वेगवेगळ्या आजारांना प्लॅस्टिक दुर्गंधी कारणीभूत ठरत आहे. वृक्षतोडीने पर्यावरण संवर्धनाचा मोठा ऱ्हास होत आहे. शहर व ग्रामीण भागांना जोडणारे दुपदरी, चारपदरी रस्ते, धरण प्रकल्पाच्या बांधकामात अडथळे निर्माण करणाऱ्या वृक्षांची कटाई झाल्यानंतर त्या ठिकाणी वृक्षारोपणाची तात्पुरती कामे होतात. परंतु भविष्यात या वृक्षाची वाढ होते की नाही, निसर्गाचा समतोल राखला जातो की नाही याची जबाबदारी कोण घेणार, या प्रश्नाचे कोणीही उत्तर देत नाही. विकास कामासाठी वृक्षतोड केल्याने जंगल नष्ट होत चालले आहे. त्यामुळे तापमानात कमालीची वाढ होऊन त्याचे चटके सर्वांना बसू लागले आहेत. जितकी झाडे तोडली जातात, त्याच प्रमाणात वृक्षलागवड होत नाही. सामाजिक वनीकरण विभाग, राष्ट्रीय हरित सेना, पर्यावरणप्रेमी, माझी वसुंधरा या शासकीय व सेवाभावी संघटना सातत्याने वृक्ष संवर्धनाच्या कामात सक्रिय सहभाग घेत असतात, सातत्याने जनजागृती अभियान राबवितात. या कार्यात टाटा समूह आणि भारतीय क्रिकेट निमायक मंडळाने पुढाकार घेतला आहे.

सध्या देशभरात क्रिकेट सामने सुरू आहेत. कोट्यवधी क्रिकेटप्रेमी खेळाचा आनंद लुटताना दिसतात. हेच निमित्त साधून प्रत्येक निर्धाव चेंडू मागे देशात ५०० झाडे लावण्याचा अनोखा प्रयोग टाटा समूह सेवाभावी संस्था संघटनेच्या मदतीने बीसीसीआय राबविणार आहे. गेल्या वर्षी या वृक्षसंवर्धनाच्या उपक्रमात चार क्रिकेट संघांत झालेल्या सामन्यात निर्धाव चेंडूवर दीड लाखांवर वृक्षारोपण करण्याचा हा उपक्रम यशस्वी झाला होता. सध्या सुरू असलेल्या क्रिकेट सामन्यातील निर्धाव चेंडूंची संख्या लक्षात घेता साडेसोळा लाखांवर विविध झाडे लावण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. महाराष्ट्र, राजस्थान व कर्नाटक या तीन राज्यांत सर्वाधिक वृक्षारोपण या माध्यमातून होणार आहे. टाटा समूह वृक्षवाढीसाठी काम करणाऱ्या सेवाभावी संस्थांकडे ही जबाबदारी सोपविणार आहे. देशात सर्वाधिक वृक्षतोड तेलंगणा राज्यात झाली आहे. गेल्या चार-पाच वर्षांत बारा लाखांवर झाडे तोडल्याचे खुद्द वन विभागाने मान्य केले आहे. हैदराबादजवळ शंभर एकर जमिनीवर गच्चीबावली भागात झाडे बुलडोजरने तोडल्याने न्यायालयाने या प्रकरणी ताशेरे ओढले आहेत. रक्तचंदन या झाडाची अवैध कत्तल व तस्करी आंध्र प्रदेशात शेषाचलम भागात मोठ्या प्रमाणात होते. सुगंधी, वनौषधी गुणधर्म व लाकूड टिकाऊ असल्याने त्याची किंमत एक ते पाच कोटींपर्यंत जाते. सिंचन, रेल्वे, रस्ते प्रकल्प बांधकामात अनेक वृक्षांची कटाई होते. शेतकऱ्यांना भूसंपादन कायद्यानुसार जमिनीचा व वृक्षाचा मोबदला शासकीय नियमाने दिला जातो. यवतमाळ जिल्ह्यातील खर्शी गावचे शेतकरी केशव शिंदे यांची शेतजमीन वर्धा-नांदेड रेल्वे प्रकल्पासाठी संपादित करण्यात आली. त्यांना जमिनीचा व विहिरीचा मोबदला मिळाला. परंतु शेतातील शंभर वर्षे जुने रक्तचंदन व इतर झाडांचा मोबदला नाकारण्यात आला. त्यांनी अन्यायाविरुद्ध २०१४ पासून मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात याचिका दाखल केली. यावर्षी रेल्वे मंडळाने त्यांना एक कोटी रुपये अंतरिम मोबदला जमा करण्याचा आदेश दिला. हा वृक्षतोडीचा संघर्ष न्यायालयीन लढ्यातून यशस्वी झाला आहे. २२ एप्रिल या जागतिक वसुंधरा दिनाला संपूर्ण देशात सेवाभावी संस्था, शाळांमधून वृक्षसंवर्धन जनजागृती, प्लॅस्टिकमुक्त भारत अभियान राबविण्यात येणार आहे. आधुनिकीकरणामुळे आपल्याला नैसर्गिक संपत्तीचा विसर पडला आहे. वसुंधरा म्हणजे आपली आई, तिला वाचविण्यासाठी सर्वांनी वृक्षारोपण करण्याचा संकल्प करूया. ▮

९८८१७१७८२८

## इतस्ततः

# मरावे परी कीर्तिरूपे उरावे...

दत्तात्रेय आंबुलकर

भारताचे सुपुत्र उद्योगपती रतन टाटा यांच्या निधनानंतर नुकतेच त्यांचे इच्छापत्रही समोर आले. टाटांनी आपल्या इच्छापत्रातून त्यांची सर्वोपरी सेवा केलेल्या अगदी छोट्यातल्या छोट्या व्यक्तीला आर्थिक राशी देऊन, कर्जमाफी करून त्यांच्याप्रति कृतज्ञता व्यक्त केली. त्यामुळे 'मरावे परी कीर्तिरूपे उरावे' या उक्तीचे वास्तववादी दर्शन घडविणाऱ्या रतन टाटा यांच्या इच्छापत्राच्या निमित्ताने...

प्रसिद्ध उद्योगपती रतन टाटा यांचे अवघे जीवनकार्य सुपरिचित. सध्या त्यांच्या मरणोत्तर इच्छापत्राची चर्चा विविध माध्यमांत रंगली आहे. यामध्ये त्यांच्या विशाल औद्योगिक-व्यावसायिक साम्राज्याचा व्याप, वैयक्तिक संपत्ती व मालमत्ता यांची विचारपूर्वक व नियोजनपूर्ण वितरण-विभागणी टाटांनी केली. आयुष्यात खऱ्या अर्थाने साथसंगत देणाऱ्या सहकारी-सेवकांबद्दल जाण ठेवून, जी मानवीय भावना त्यांनी इच्छापत्रांतून व्यक्त केली, ती अनेक कार्यांनी बेजोड व अनुकरणीय ठरावी. नुकत्याच जाहीर झालेल्या रतन टाटा यांच्या इच्छापत्राचा मागोवा घेणे म्हणूनच क्रमप्राप्त ठरावे. प्रसिद्ध झालेल्या माहितीनुसार, रतन टाटा यांनी त्यांचे इच्छापत्र सर्वप्रथम लिहिले होते ते १८ एप्रिल १९९६ रोजी. त्यानंतर सुमारे पाच वर्षांनी म्हणजेच टाटा उद्योग समूहाचे अध्यक्ष झाल्यावर या इच्छापत्रात काही बदल व सुधारणा त्यांनी केल्या. त्यानंतर या दोन्ही इच्छापत्रांना संयुक्त स्वरूप देऊन रतन टाटा यांनी आपले अंतिम इच्छापत्र तयार केले ते २३ फेब्रुवारी २०२२ रोजी व त्याचाच तपशील आता जाहीर करण्यात आला आहे.

यासंदर्भात थोडक्यात व महत्त्वाचे म्हणजे, रतन टाटा यांनी आपल्या एकूण संपत्तीच्या रकमेपैकी साडेतीन कोटी रुपये त्यांच्या कार्यालयीन कर्मचारी व वैयक्तिक, घरगुती कामे करणाऱ्या कर्मचाऱ्यांना देण्यासाठी आवर्जून राखून ठेवले. यामध्ये रतन टाटा यांनी त्यांच्या वाहनाची साफसफाई करणारे, कार्यालयीन कामकाज करणारे सहायक, शिपाई इत्यादी सर्व स्तरांवरील कर्मचाऱ्यांचा आवर्जून समावेश तर केलाच; त्याशिवाय या मंडळींना त्यांनी दिलेल्या कर्जाऊ, उसन्या रकमेची संपूर्णपणे माफीसुद्धा दिली, हे विशेष! रतन टाटा यांनी त्यांच्या इच्छापत्रात नमूद केल्यानुसार, त्यांच्याकडे घरगुती स्वरूपाची कामे करणाऱ्या कर्मचाऱ्यांना १५ लाख रुपये देण्याचे निर्देश दिले आहेत. यामध्ये या घरगुती कर्मचाऱ्यांच्या सेवा कालावधीचा विचार करण्याची सूचना देण्यात आली आहे. याशिवाय त्यांच्या घरी विविध प्रकारची आपत्कालीन सेवा देणाऱ्या कामगारांना एक लाख रुपये मिळणार आहेत. इच्छापत्रात नमूद केल्यानुसार, रतन टाटा यांच्याकडे असणाऱ्या व ते वापरात असणाऱ्या विशेष दर्जाच्या व महागड्या कपड्यांसह नित्योपयोगातील वापरत्या येण्याजोग्या वस्तू व उपकरणे गरीब व गरजू लोकांमध्ये संबंधित समाजसेवी संस्थेच्या माध्यमातून वितरित केली जाणार आहेत. रतन टाटा यांनी त्यांच्या घरी स्वयंपाकी म्हणून काम करणाऱ्या राजन शौ याला एक कोटी रुपये देण्याची तरतूद केली असून यामध्ये त्यांना टाटा यांनी दिलेल्या ५१ लाख रुपयांच्या कर्जमाफीचा समावेश आहे. याशिवाय त्यांना भोजनसेवा देणाऱ्या सुभाशीष कोनार यांना ३६ लाखांच्या कर्जमाफीसह ६६ लाख रुपये देण्याची तरतूद रतन टाटांनी आपल्या इच्छापत्रात व्यक्त केली आहे. यावरून रतन टाटांची त्यांच्या घरी व त्यांच्यासाठी काम करणाऱ्या प्रत्येकाबद्दल आपल्या मरणोत्तर असणारी कणव आणि जाणीव स्पष्ट होते. कार्यालयीन सहकाऱ्यांच्या संदर्भात सांगायचे झाल्यास, रतन टाटांनी त्यांच्या इच्छापत्रात सचिव दिलनाझ ग्लेझर यांच्यासाठी १० लाख लिहून ठेवले. त्यांचे विशेष सहायक शंतनू नायडू यांना कॉर्नेल विद्यापीठातून एमबीएचे उच्च शिक्षण घेण्यासाठी दिलेली एक कोटींची रक्कमही माफ केली आहे. याशिवाय रतन टाटा यांनी त्यांचा वाहनचालक असणाऱ्या राजू लिऑन यांची १८ लाख रुपयांची कर्जमाफी करून, त्याशिवाय आपल्या वाहनचालकाला १५ लाख रुपये देऊ केले आहेत.

वरील रकमा व विशेषतः त्यातील कर्जमाफीच्या संदर्भात आपल्या २३ फेब्रुवारी २०२२ रोजीच्या इच्छापत्रानुसार, आपल्या इच्छापत्राची अंमलबजावणी करणाऱ्या विश्वस्त व विश्वासू संबंधितांना स्पष्टपणे निर्देश दिले आहेत की, त्यांच्या अंतिम इच्छांप्रमाणेच विशेषतः त्यांनी नमूद केलेल्या सहकाऱ्यांच्या कर्जमाफीच्या निर्देशांची कसोशीने अंमलबजावणी केली जावी. एवढेच नव्हे, तर, ''माझ्या सहकाऱ्यांसाठी मी प्रस्तावित केलेली कर्जमाफी ही कुठल्याही प्रकारे मेहेरबानी न समजता, माझ्यातर्फे माझ्या या सहकाऱ्यांसाठी देण्यात आलेली माझी सदिच्छा भेटच समजावी,'' असे स्पष्ट निर्देश रतन टाटा यांनी दिले आहेत, हे महत्त्वाचे.

अन्य व्यक्तींच्या स्वरूपात उल्लेखनीय बाब म्हणजे, रतन टाटा यांनी 'टाटा ट्रस्ट'मध्ये सल्लागार म्हणून काम करणाऱ्या होशी मलेसरा यांच्यासाठी पाच लाख रुपयांची, तर अलिबाग येथील बंगल्याची काळजी घेणाऱ्या देवेंद्र कटामोलू यांच्यासाठी दोन लाख रुपयांची तरतूद आपल्या इच्छापत्रात नमूद केली आहे. याशिवाय त्यांनी आपल्या खाजगी सचिव दीप्ती दिवाकरन यांना दीड लाख, तर कार्यालयीन शिपाई म्हणून काम करणाऱ्या गोपालसिंह व पांडुरंग गुरव या उभयतांना प्रत्येकी ५० हजार रुपये दिले असून, एक अन्य सहायक सरफर्झ देशमुख यांचे दोन लाखांचे कर्ज माफ केले आहे. यावरून आपल्यासाठी काम करणाऱ्या प्रत्येकासाठीच्या रतन टाटा यांच्या आत्मिक आपुलकीच्या भावनाच स्पष्ट होतात. उच्च शिक्षण घेणाऱ्यांना रतन टाटा नेहमीच वैयक्तिक स्तरावर प्रोत्साहन देत असत. त्यामुळेच त्यांच्या शेजारी राहणाऱ्या जॅक मिलाईट यांना इंग्लंडमधील वॉरविक बिझनेस स्कूलमधून एमबीए करण्यासाठी दिलेले २३.७ लाख रुपयांचे कर्ज माफ करण्याचे निर्देश दिले आहेत.

रतन टाटा यांनी आपल्या मरणोत्तर इच्छापत्राचे सारासार व संपूर्णपणे क्रियान्वयन करण्यासाठी आपल्या ज्या नातेवाईक, मित्र व सहकाऱ्यांची निवड केली, त्यामध्ये योजनापूर्वक शिरीन जिजीभॉय व दीना जिजीभॉय या भगिनी, मित्र मिहिल मिस्त्री, 'टाटा ट्रस्ट'चे विश्वस्त दारियस खंबाटा यांची निवड केली. रतन टाटा यांनीच दिलेल्या निर्देशानुसार, त्यांच्या इच्छापत्राची अंमलबजावणी करताना वरीलपैकी कुणी वाद वा मतभेद निर्माण केले, तर त्यांचा रतन टाटांच्या संपत्तीत कुठलाही वाटा राहणार नाही, हे देखील स्पष्ट केले आहे. टाटांच्या मनाचे मोठेपण प्रकर्षाने जाणवते, ते त्यांनी आपल्याला प्रिय असणाऱ्या 'टिटो' या कुत्र्यासाठी आवर्जून राखून ठेवलेल्या १२ लाखांच्या तरतुदीमुळे. एकूणच काय तर रतन टाटा यांचे मोठेपण त्यांच्या मरणांती अधिक भावते. ▮

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

## जागतिक वसुंधरा दिवस!

जागतिक वसुंधरा दिवस दरवर्षी २२ एप्रिल रोजी साजरा केला जातो. १९७० मध्ये अमेरिकेतील पर्यावरणप्रेमी गेलॉर्ड नेल्सन यांच्या पुढाकाराने पहिल्यांदा हा दिवस साजरा करण्यात आला. पृथ्वीच्या संरक्षणासाठी, पर्यावरण संवर्धनासाठी लोकांमध्ये जागरूकता निर्माण व्हावी याकरिता विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. आपण जर पूर्वीचा काळ बघितला तर लक्षात येते की, पूर्वी पृथ्वीची स्थिती नैसर्गिकदृष्ट्या अत्यंत समतोल होती. वने, नद्या, पर्वत, समुद्र आणि हवामान यांचे नैसर्गिक चक्र सुरळीत चालत होते. त्यामुळे प्रदूषण नव्हते.

कालांतराने जंगलतोड, खनिज संपत्तीचा अतिवापर, शहरीकरण, औद्योगिकीकरण यामुळे नैसर्गिक समतोल बिघडला. वाहने, कारखाने आणि प्लॅस्टिकच्या वापरामुळे हवा, पाणी आणि माती यांचे प्रदूषण वाढले. त्याचाच परिणाम म्हणजे पृथ्वीचे तापमान वाढून ग्लोबल वॉर्मिंग निर्माण झाली आहे. यावर नियंत्रण ठेवण्यासाठी झाडे लावणे, जंगलतोड थांबवणे, प्रदूषण नियंत्रण, नैसर्गिक पद्धतीने शेती करणे या उपाययोजना आहेत. तसेच पूर्वी ऋषिमुनी त्यांच्या साध्या जीवनशैलीमुळे निसर्गाशी जुळवून घेत होते. त्यांनी सदैव निसर्गाचा आदर केला. आजच्या यंत्रयुगात जर आपण ऋषिमुनींचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून संयमी जीवनपद्धती अंगीकारली, तर वसुंधरेचं रक्षण नक्कीच होऊ शकेल.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

●● ●●

## वाचक पत्रे

### गरज आहे विज्ञानासोबत अध्यात्म जगण्याची

सहज समाज माध्यम चाळताना 'सनातन शंखनाद महोत्सव' या विषयावर वाचनात आले. त्यामध्ये १७ ते १९ मे २०२५ दरम्यान गोवा येथे शंखनाद महोत्सव साजरा होणार असल्याचे लक्षात आले. त्या संदर्भात सनातन शंखनाद महोत्सव वेबसाईटचे उद्घाटन गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्या हस्ते झाल्याचे वाचण्यात आले. जगात अशी पण आध्यात्मिक संस्था आहे की, जी सर्वांच्या आध्यात्मिक प्रगतीसाठी सतत कार्यरत आहे याचा आनंद झाला. सर्वत्र पुन्हा एकदा रामराज्य यावे यासाठी प्रयत्नशील असल्याचे वाचून अभिमान वाटला.

त्यांनी असेच लोकांपर्यंत वेगवेगळ्या माध्यमातून आध्यात्मिक विषय पोहोचवावे आणि सध्याच्या स्थितीत थोडासा ताण आला की आत्महत्या करणे, मनासारखं नाही झालं तर नैराश्यात जाणे किंवा व्यभिचार करून आपल्याच पतीला प्रेमीच्या साह्याने मारणे असे जे कुकृत्य होत आहेत, ते जर आपल्याला थांबवायचे असेल तर आज विज्ञानासोबतच गरज आहे ती अध्यात्म शिकण्याची. म्हणून आपले संत, महात्मे यासाठी सतत कार्यरत असतात. त्यांच्या ज्ञानाचा सर्वसामान्य जनतेने नक्कीच उपयोग करून घ्यावा आणि जीवनात यशासोबतच, ते यश कसे टिकवून ठेवायचे, अपयशाला कसे सामोरे जायचे याचा जो मूलमंत्र आहे तो तुम्हाला कुठेही विज्ञानात नव्हे, तर तो आपल्या अध्यात्मातच गवसेल. तेव्हा मी भारताचा एक जागृत नागरिक म्हणून सर्वांना आवाहन करते की, वरील संकेतस्थळाला भेट देऊन सर्वांनी त्याचा आध्यात्मिक लाभ घ्यावा.

**- डॉ. भारती अनिल हेडाऊ**/९४२१७७३९९९

●● ●●

### व्यसनाधीनता एक सामाजिक समस्या

व्यसनाधीनता ही एक गंभीर सामाजिक समस्या आहे. लोकांमध्ये याविषयी जागरूकता वाढविणे आवश्यक आहे. त्यासाठी कुटुंब आणि मित्रांचे सामूहिक समर्थन खूप महत्त्वाचे आहे, जे त्या व्यक्तीस व्यसनातून बाहेर पडण्यास मदत करू शकते. शरीराची प्रतिकारशक्ती कमी झाल्याने व्यसनाधीन व्यक्ती विविध आजारांना बळी पडते. कौटुंबिक कलह वाढतात. शिवाय भांडणे, कलह होतात. शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम होतात. कळतंय पण वळत नाही या उक्तीप्रमाणे, लोकांना याचे परिणाम समजत असूनही, त्याच्यापासून दूर राहणे गृहीत आहे. विशेषतः तरुण पिढी या विषारी विळख्यात वेगाने सामावली जात आहे. आजची तरुण पिढी काहीतरी जगावेगळं करण्याच्या चुकीच्या संगतीमुळे मोठ्या प्रमाणात व्यसनाधीन होत चालली आहे.

शालेय आणि कौटुंबिक अपेक्षा, करीअरच्या दबावामुळे अनेक तरुण ताणतणावात राहतात. या ताणातून सुटण्यासाठी ते व्यसनांकडे वळतात. समाज माध्यम आणि ऑनलाईन गेमिंगमुळे अनेक तरुण व्यसनाधीन होतात. समाजाच्या अपेक्षा अनेक वेळा त्यांना अधिक त्रस्त करतात. अनेक ठिकाणी व्यसनकारक पदार्थांची सहज उपलब्धता असते, ज्यामुळे तरुणांना त्यांना चुकविणे कठीण होते. या समस्यांचा सामना करण्यासाठी, तरुणांमध्ये जागरूकता वाढवणे, मानसिक आरोग्याबद्दल चर्चा, मार्गदर्शन करणे महत्त्वाचे आहे. ▮

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अॅड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स अॅप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# उष्मघातापासून बचाव लक्षणे आणि उपाययोजना



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ एप्रिल**

येणाऱ्या काही दिवसामध्ये आपल्या भागात उष्णतेची लाट जाणवू शकते, उष्मघात होऊ नये यासाठी नागरिकांनी प्रतिबंधात्मक उपायांवर भर द्यावा उष्माघाताची लक्षणे आढळून इाल्यास तातडीने रुग्णाच्या शरीराचे तापमान खाली आणण्यासाठी जवळच्या रुग्णालयात उपचार करुन घ्यावा.

या उष्णतेच्या काळात उष्माघात होऊ नये. यासाठी नागरिकांनी प्रतिबंधात्मक उपायांवर भर देणे गरजेचे आहे.उष्मघात उपचारासाठी शासकीय रुग्णालयांत सज्जता ठेवण्यात यावी अशा सूचना जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी दिल्या आहेत.

उष्मघात होण्याची कारणे साधारणत: पुढील आहेत.

यात उन्हामध्ये शारिरीक श्रमाचे, मजूरीचे कामे फार वेळ करणे,

कारखान्याचे बॉयलर रुममध्ये काम करणे,

काच कारखान्यातील काम करणे, जास्त तापमानाच्या खोलीत काम करणे, घट्ट कपड्यांचा वापर करणे, उष्णतेशी अथवा तापमानातील वाढत्या परिस्थितीशी सतत संबध येणे. उष्मघाताची लक्षणे जाणवू लागल्यास तातडीने रुग्णाच्या शरीराचे तापमान खाली आणण्यासाठी जवळच्या रुग्णालयात उपचार करुन घ्यावेत. यासाठी उष्माघात उपचारांसाठी शासकीय रुग्णालयात सज्जता ठेवण्यात यावी.

उष्मघाताची लक्षणे

शरीरास घाम सुटणे,

तहान लागणे,

शरीर शुष्क होणे,

ताप येणे (१०२) पेक्षा जास्त

त्वचा कोरडी पडणे,

भुक न लागणे,

चक्कर येणे,

निरुत्साही होणे,

डोके दुखणे,

रक्तदाब वाढणे,

मानसिक बेचैन, अस्वस्थ, बेशुध्द अवस्था उलटी इत्यादी होणे.

जोखमीचे गट

वय ५ वर्षापेक्षा कमी व ६५ वर्षापेक्षा जास्त, कष्टाची सवय नसणारे लोक, धुम्रपान, मद्यपान करणारे आणि कॉफी पिणारे व्यक्ती, मुत्रपिंड,-हृदयरोग,यकृत, त्वचा विकार लठ्ठपणा, मधूमेह, उच्च रक्तदाब इत्यादी रुग्ण. Diuretice anti allergie trangilzers stimulants ete या औषधाचे सेवन सुरु असलेले रुग्ण, जास्त तापमान, अति आद्रता, वातानुकुलनाचा अभाव, तंग कपडे, शेत काम, कारखान्यातील काम ऊन आणि उष्णतेशी संबधीत व्यवसाय करणाऱ्या व्यक्ती.

प्रतिबंधात्मक उपाय

वाढत्या तापमानाच्या वेळेत कष्टाची कामे टाळणे, कष्टाची कामे सकाळी लवकर अथवा संध्याकाळी कमी तापमान असताना करावी, उष्णता शोषुन घेणारे कपडे उदा. काळया किंवा भडक रंगाचे कपडे वापरु नयेत. सैल व उष्णता परावर्तित करणारे पांढऱ्या रंगाचे कपडे वापरावेत. जल संजीवनीचा वापर करावा, पाणी भरपूर प्यावे. सरबत प्यावे, उन्हामध्ये काम टाळावे व सावलीत विश्रांती घ्यावी. शक्यतो उन्हात फिरण्याचे टाळावे. आवश्यकता असल्यास उन्हात जाण्यापूर्वी भरपूर पाणी प्यावे. किंवा लिंबू शरबत प्यावे. उन्हात जाण्या आगोदर जेवन करावे, रिकाम्या पोटी उन्हात जाऊ नये. कान व डोक्याचा उन्हापासून बचाव करणे आवश्यक आहे. डोक्याभोवती पांढरा रुमाल गुंडाळावा. गॉगल्स व हेलमेट वापरावी. वृध्दांना व बालकांना उन्हात फिरु देऊ नये.

उपचार

रुग्णास हवेशीर खोलीत ठेवावे, खोलीत पंखे, कुलर ठेवावीत शक्यतो वातानकुलीत खोलीत ठेवावेत. रुग्णाच्या शरिराचे तापमान खाली आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत. रुग्णाला बर्फाच्या पाण्याने अंघोळ घालावी. रुग्णाच्या कपाळावर थंड पाण्याच्या पट्टया ठेवाव्या. आईसपॅक लावावेत, ओआरएस सोल्युशन द्यावे. उन्हाळ्यामुळे उष्माघाताचे रुग्णावर उपाययोजना करण्यासाठी व मृत्यू टाळण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रांनी, कुटीर रुग्णालय व ग्रामीण रुग्णालयांनी आवश्यक ती सर्व तयारी ठेवण्याबाबत कळविण्यात आले आहे. उदा. हवेशीर खोली, पुरेशी औषधी, सलाईनचा साठा, खोलीत पंखे, कुलर इत्यादी सुस्थितीत ठेवावी. बर्फाच्या उपलब्धतेसाठी फ्रिज सुस्थितीत असणे आवश्यक आहे. उष्मघाताची कारणे लक्षणे प्राथमिक उपचार त्याचप्रमाणे उष्मघात होऊ नये म्हणून घ्यवयाची काळजी याची माहिती आरोग्य शिक्षणाव्दारे प्रचार माध्यमातुन द्यावी.

काय करावे: तहान नसली तरी भरपूर पाणी,सरबत प्यावे, हवा खेळती राहण्यासाठी पंख्याचा वापर करावा, सैल व सौम्य रंगाचे सुती कपडे वापरावेत, सावलीत थांबणे, हळुवार चालावे, टोपी, फेटा चष्मा वापरणे, मजूर वर्गास वारंवार विश्रांती घेवु द्यावी, उन्हातुन आल्यावर चेह-यावर ओले कापड ठेवावे,

काय करावे काय टाळावे

काय करावे:- तहान नसली तरी भरपूर पाणी सरबत प्यावे हवा खेळती राहध्यासाठी पख्यांचा वापर करावा. सैल व सौम्य रंगाचे सुती कपडे वापरावेत. सावलीत थांबणे, हळुवार चालावे, टोपी,फेटा, चष्मा वापरणे, मजूर वर्गास वारंवार विश्रांती घेऊ द्यावी. उन्हातुन आल्यानंतर चेह-यावर ओला कपडा ठेवावा.काय टाळावे:-मद्य, सोडा, कॉफी, अती गार पाणी आदी पिणे टाळावे, गरज नसतांना उन्हात फिरणे, तंग व गडद कपडे वापरणे, सवय आहे. म्हणून उन्हात निघणे, अति व्यायाम करणे, बंद कारमध्ये राहणे, अति शारिरीक कष्टाचे कामे करणे. लहान मुले किंवा पाळीव प्राण्यांना बंद असलेल्या व पार्क केलेल्या वाहनात ठेऊ नये. दुपारी १२. ०० ते ३.३० या कालावधीत उन्हात बाहेर जाणे टाळावे. उन्हाच्या कालावधीत स्वयंपाक करण्याचे टाळावे. तसेच मोकळया हवेसाठी स्वयंपाक घराची दारे व खिडक्या उघडी ठेवण्यात यावी. अगदी साध्या व सोप्या उपाययोजनांव्दारे आपण उष्माघातापासून आपले संरक्षण करु शकतो असे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी यांनी केले आहे.

अगदी साध्या आणि सोप्या उपाययोजनाव्दारे आपण उष्मघातापासून आपले संरक्षण करु शकतो.चला तर मग प्रशासनाच्या या आवाहनानुसार काळजी घेऊया. उष्मघातापासून आपले आपण संरक्षण करुया.

## उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांनी बीड येथील साक्षी कांबळे आत्महत्या प्रकरणी पीडित कुटुंबियांची घेतली भेट

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ एप्रिल**



धाराशिव येथे मामाच्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केलेल्या साक्षी कांबळे प्रकरणात विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आज बीडमध्ये पीडित कुटुंबीयांची भेट घेतली. या भेटीदरम्यान डॉ. गोऱ्हे यांनी कुटुंबीयांच्या मागण्या ऐकून घेत त्यांना मानसिक आधार दिला, तसेच दोषींवर कठोर कारवाई करण्याचा विश्वास दिला.

या प्रकरणातील आरोपीस जामीन मिळाल्याने कुटुंबात संतापाची लाट उसळली आहे. धाराशिव पोलीस न्यायालयात आरोपीचा जामीन रद्द करण्यासाठी अपील दाखल करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. डॉ. गोऱ्हे म्हणाल्या की, एफआयआर आधीच नोंदवण्यात आला असून, आता पूरक जबाब घेतला जाणार आहे. याप्रकरणात दोषींना पाठीशी घालणाऱ्यांवरही कारवाई केली जाईल.

महाविद्यालयीन आणि शालेय विद्यार्थिनींना त्रास देणाऱ्यांबाबत त्यांनी स्पष्ट इशारा दिला की, अशा त्रासदायक प्रकारांची गाठ थेट महाराष्ट्र पोलिसांशी आहे. कोणी त्रास देत असेल, छेडछाड करत असेल तर मुलींनी तात्काळ पोलिसांकडे किंवा विश्वासू कार्यकर्त्यांकडे तक्रार करावी.

कुटुंबीयांनी मांडलेल्या मागण्यांमध्ये संबंधित पोलीस अधिकाऱ्यांचे वर्तन, जातीय भेदभावाचे आरोप आणि कारवाईत दिरंगाईचे मुद्दे उपस्थित करण्यात आले. डॉ. गोऱ्हे यांनी हे सर्व मुद्दे राज्याच्या वरिष्ठ नेतृत्वापर्यंत पोहोचवले असल्याचे सांगत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाही मी ही माहिती कळवली आहे. संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष या प्रकरणाकडे लागले आहे.

डॉ. गोऱ्हे यांनी यावेळी सांगितले की, साक्षीचा विवाह ठरलेला होता, ती आनंदात होती. तरीही कॉलेजमधील त्रासामुळे तिचा जीव गेला. अशा 'टारगट मुलां'वर कठोर कारवाई व्हावी यासाठी मी स्वतः पोलिसांशी चर्चा केली आहे. कोणी आरोपीला संरक्षण देत असेल तर त्यांच्या विरोधातही कारवाई करण्यात येईल.

शेवटी, त्यांनी राज्यातील सर्व मुलींना आवाहन करत सांगितले की, कोणी तुम्हाला त्रास देत असेल, तुमचे फोटो, व्हिडिओ चुकीच्या पद्धतीने वापरत असेल, तर भयभीत न होता पोलिसांशी संपर्क साधा. सायबर गुन्ह्यांची सुद्धा तक्रार करा. संपूर्ण यंत्रणा तुमच्या पाठिशी आहे.

या भेटीदरम्यान बीडचे जिल्हाधिकारी श्री. अविनाश पाठक, पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कावत, शिवसेना मराठवाडा सचिव श्री. अशोक पटवर्धन, महाराष्ट्र राज्य महिला आयोग सदस्य, शिवसेना संपर्कप्रमुख ॲड. संगीता चव्हाण, जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक, स्वप्नील गलदर, महिला जिल्हाप्रमुख रत्नमाला आंधळे, युवासेना रविराज बडे आणि अन्य कार्यकर्ते उपस्थित होते. साक्षीच्या आत्महत्येप्रकरणी सरकार आणि पोलीस प्रशासन ठोस पावले उचलत असल्याचे उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी यावेळी म्हटले.

## आ.विजयसिंह पंडित यांच्या प्रयत्नांमुळे पोईतांडा येथे स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२२ एप्रिल**

तालुक्यातील तलवाडा ग्रामपंचायतीचे विभक्तीकरण करून पोईतांडा या स्वतंत्र ग्रामपंचायतीची स्थापना करणे बाबतचे अधिकृत अधिसूचना शासन राजपत्रात प्रकाशित झाली आहे. त्यामुळे आनंदवाडी, पवारमळा, चाहूर तांडा आणि देवीतांडा यांची एकत्रित पोईतांडा ही नवीन ग्रामपंचायत अस्तित्वात आली आहे. याबाबत माजी आ. अमरसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली आ. विजयसिंह पंडित यांनी प्रशासकीय पातळीवर पाठपुरावा केला होता. बंजारा तांड्यांना स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करून त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे आश्वासन आ. विजयसिंह पंडित यांनी निवडणुकीत दिले होते. आश्वासपूर्ती केल्याबद्दल पोईतांडा ग्रामस्थांनी त्यांचे आभार मानले आहेत.

जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांनी गेवराई विधानसभा मतदार संघातील बंजारा तांड्यांना स्वतंत्र ग्रामपंचायत मिळवून देण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले आहेत. त्यांच्या प्रयत्नांमुळे आजवर बालानाईक तांडा, गैबीनगर तांडा, जयराम तांडा, वसंतनगर तांडा आणि बाराभाई तांडा या तांड्यांना यापूर्वी स्वतंत्र ग्रामपंचायत मिळालेली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आ. विजयसिंह पंडित यांना आमदार होताच पहिल्या शंभर दिवसांत तलवाडा ग्रामपंचायतीचे विभक्तीकरण करून पोईतांडा येथे स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्यात यश आले आहे. विधानसभा निवडणुकीच्या जाहिरनाम्यात आ. विजयसिंह पंडित यांनी बंजारा तांड्यांना स्वतंत्र ग्रामपंचायत देऊन लमाण समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे आश्वासन दिले होते. आमदार झाल्यानंतर पहिल्या शंभर दिवसांत आ. विजयसिंह पंडित यांच्या पाठपुराव्यामुळे पोईतांडा येथे नवीन स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन झाली आहे. त्यांच्या आश्वासनपुर्ती मुळे ग्रामस्थांनी त्यांचे आभार मानले.

## उसतोड कामगार नोंदणी वाढ होण्यासाठी प्रयत्न करण्याचे निर्देश

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ एप्रिल**

जिल्हयात उसतोड कामगारांची संख्या खूप मोठी आहे. मात्र याबाबतची नोंदणी कमी आहे त्यामुळे या कामगारांच्या नोंदणीसह प्रधान्य द्यावे त्यासोबत या कामगारांच्या घरातील महिला आणि मुलींच्या आरोग्याची तपासणी होईल याचीही व्यवस्था करा असे निर्देश राज्य विधानसभा उपसभापती निलम गोऱ्हे यांनी येथे दिले.


जिल्हयातील दौऱ्यात विविध विभागाच्या कामांचा आढावा त्यांनी आज घेतला यावेळी जिल्हाधिकारी अविनाश पाठक, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जिवने यांच्यासह विविध विभागाच्या प्रमुख अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

यापूर्वी त्यांनी जिल्हा पोलिस अधिक्षक नवनीत कॉवत यांच्याकडून महिला सुरक्षाविषयक बाबींचा एका बैठकित आढावा घेतला. मुली विशेषत: शालेय व महाविद्यालयीन मुलींना छेडछाड करण्याचे प्रमाण वाढले आहे यातच येथील एका मुलीने धाराशिव येथे आत्महत्या केली तिच्या कुंटुंबियांशी भेट घेऊन श्रीमती गोऱ्हे यांनी या प्रकरणी न्याय मिळवून देऊअसे तिच्या कुंटुंबियास सांगितले. सदर मुलीच्या आईने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मदतीसाठी आवाहन केले होते.त्या कुटुंबाला सांत्वनासह मदतीचे पूर्ण आश्वासन श्रीमती गोऱ्हे यांनी दिले.

## अंबाजोगाईत २८ एप्रिल रोजी सप्तखंजरीवादक, राष्ट्रीय प्रबोधनकार तुषार सूर्यवंशी यांच्या समाज प्रबोधनपर कार्यक्रमाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२२ एप्रिल**

संपूर्ण महाराष्ट्रात गाजत असलेले सत्यपाल महाराज यांचे शिष्य सप्तखंजरीवादक, राष्ट्रीय प्रबोधनकार तुषार सूर्यवंशी, नागपुर (दुरदर्शन, झी मराठी कलाकार) यांचा समाज प्रबोधनात्मक कार्यक्रम ज्ञानरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त सोमवार, दि.२८ एप्रिल २०२५, सायंकाळी ६ वाजता मुकुंदराज सांस्कृतिक सभागृह, अंबाजोगाई (जि.बीड) या ठिकाणी आयोजित केला आहे. अशी माहिती आयोजक अतुल कसबे (अध्यक्ष, माय सेवा प्रतिष्ठाण) यांनी दिली आहे.



तुषार सूर्यवंशी

माय सेवा प्रतिष्ठाणचे अध्यक्ष अतुल कसबे हे ज्ञानरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त उपक्रम दरवर्षी विविध सामाजिक उपक्रम आयोजित करतात. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून या वर्षी केज विधानसभा मतदारसंघाच्या कार्यसम्राट आमदार सौ.नमिताताई अक्षय मुंदडा यांच्या नेतृत्वाखाली तसेच ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा (काकाजी) व युवा नेते अक्षय मुंदडा यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण महाराष्ट्रात गाजत असलेले सत्यपाल महाराज यांचे शिष्य सप्तखंजरीवादक, राष्ट्रीय प्रबोधनकार तुषार सूर्यवंशी, नागपुर (दुरदर्शन, झी मराठी कलाकार) यांचा समाज प्रबोधनात्मक कार्यक्रम ज्ञानरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त सोमवार, दि.२८ एप्रिल २०२५, सायंकाळी ६ वाजता मुकुंदराज सांस्कृतिक सभागृह, अंबाजोगाई (जि.बीड) या ठिकाणी आयोजित केला आहे. तरी या कार्यक्रमास अंबाजोगाई शहर व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आयोजक अतुल कसबे (अध्यक्ष, माय सेवा प्रतिष्ठाण) व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले आहे.

## जीवनात यशस्वी होण्यासाठी विजेत्यांसारखी मानसिकता हवी – सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२२ एप्रिल**



विजेत्याची मानसिकता विकसित करणे ही एक प्रक्रिया आहे, जी अवघड नाही. पण, नियमित प्रयत्नांनी आणि सकारात्मक विचारांनी ती नक्कीच साध्य करता येते. आपण जर या मानसिकतेवर काम केले, तर आपण आपल्या जीवनात कोणत्याही क्षेत्रात यश मिळवू शकतो असे प्रतिपादन सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ तथा व्याख्याते डॉ.राजेश इंगोले यांनी व्यक्त केले.

स्व.प्रकाश सुरजमल मूथा यांच्या स्मरणार्थ आयोजित शुमा कप – २०२५ लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेच्या बक्षीस वितरण सोहळ्यात ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. यावेळी विचारमंचावर स्वारातीचे विभागप्रमुख डॉ.सिद्धेश्वर बिराजदार, डॉ.राजेश इंगोले, सौ.सुरेखा सिरसाट, सौ.देशमुख, श्रीमती प्रेमा मुथा, सौ. विजया मुथा, प्रा.भूषण गवली, सौ. उज्वला मुथा, सौ.संगीता मुथा, निलेश मुथा, समीर लाटा, प्रतीक बोथरा, हर्ष मुथा यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ.राजेश इंगोले यांनी विजेत्याची मानसिकता ही मनाची एक सकारात्मक अवस्था आहे जी आत्मविश्वास, प्रेरणा, दृढनिश्चय, लवचिकता आणि मानसिक कणखरता या सारख्या गुणांनी वैशिष्ट्यीकृत आहे. त्यामुळे खेळाडूंनी आपल्या खेळाच्या कौशल्यासोबतच विजेता मानसिकता आपल्या अंगी विकसित करण्यावर भर द्यावा असे मार्गदर्शन खेळाडूंना केले. संघर्षाशिवाय यश नाही आणि परिश्रमाला पर्याय नाही असे सांगत विजेते एका रात्रीत घडत नाहीत तर त्यासाठी त्यांनी वर्षानुवर्षे केलेली तपस्या त्यांना विजेते घडविते असे डॉ.राजेश इंगोले यांनी सांगितले. अंबाजोगाई मध्ये क्रिकेट खेळ हे एक करीयर असू शकते हा विचार रूजवणारे अंबाजोगाई क्रिकेट अकादमी आणि शुमा क्रिकेट अकादमीचे मोहित परमार आणि माही परमार हे ग्रामीण भागातील खेळाडूंना राज्यस्तरीय, राष्ट्रस्तरीय संधी प्राप्त करून देत असल्याबद्दल डॉ.राजेश इंगोले यांनी त्यांचे कौतुक केले.



बीड : उन्हाचा पारा वाढल्याने फळविक्रेत्यांनी सावलीसाठी हातगाड्यांना अशी छत्री लावली आहे.

## पर्यावरण रक्षणासाठी ना. पंकजाताई मुंडे सरसावल्या पवई तलावाच्या स्वच्छता उपक्रमाने सुरू केली लोकचळवळ



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ एप्रिल**

पर्यावरण संवर्धनाचं वेड लागायला हवं, कारण त्यातून निर्माण होणारा ध्यास हा सभोवतालच्या पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी महत्वाची भूमिका बजावेल. वसुंधरेच्या रक्षणासाठी सर्वांनी एकत्रितपणे पुढाकार घ्यावा, असे आवाहन पर्यावरण व वातावरणीय विभागाच्या मंत्री पंकजा मुंडे यांनी केले.

पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, बृहन्मुंबई महानगरपालिका आणि पर्यावरण क्षेत्रातील विविध सामाजिक संस्थांच्या सहयोगाने २२ एप्रिल, २०२५ जागतिक वसुंधरा दिनानिमित्त मुंबई येथील पवई तलाव स्वच्छता व संवर्धन अभियानाचा शुभारंभ सोहळ्याचे आयोजन गणेश घाट पवई येथे करण्यात आले होते. यावेळी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम, आमदार दिलीप लांडे, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज, महाराष्ट्र प्रदूषण मंडळाचे सदस्य सचिव डॉ. अविनाश ढाकणे, महानगरपालिका उपायुक्त श्री.संतोष दौड आदी उपस्थित होते.

यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून पंकजा मुंडे यांनी पर्यावरण रक्षणात कर्तव्य आणि हक्क या दोन्ही गोष्टींची जोड देण्याची गरज व्यक्त केली. निसर्गाने मानवाला भरभरून सर्व काही दिले, पण माणसाने मात्र अतिहव्यासाने सभोवतालच्या निसर्गाचे नुकसान केले. निसर्गाचे संवर्धन करण्यासाठी शासनाबरोबरच लोकसहभाग आवश्यक आहे. यासाठी आपण वेळीच जागृत होऊन पर्यावरण संवर्धनाचे कर्तव्य बजावण्याची नितांत गरज असून सर्वांनी एकत्र येऊन काम केले तर महाराष्ट्राला प्रदुषणुक्त होण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही, असे त्यांनी सांगितले.

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महाराष्ट्र नर्सिंग महाविद्यालयाचा निकाल १०० टक्के

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ एप्रिल -** नाशिकच्या महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठाने घेतलेल्या परीक्षेत येथील महाराष्ट्र नर्सिंग महाविद्यालयाचा निकाल १०० टक्के लागला आहे. गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक संस्थेचे उपाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर कार्यकारी संचालक रणजित पाटील कव्हेकर यांच्यासह इतरांनी केले.



बीएस्सी नर्सिंग प्रथम सेमिस्टारमध्ये सेजल डोले ७३ टक्के गुण घेऊन प्रथम, कृष्णा केंद्रे ७२ टक्के गुणाने द्वितीय तर स्वप्नील टंडले हा ७२ टक्के गुण घेऊन तृतीय आला आहे. नर्सिंग सेकंड सेमिस्टारमध्ये शबनम पठाण ७७.४ टक्के गुण घेत प्रथम, सानिका सय्यद ७६.८५ टक्के गुण घेत द्वितीय तर मुयरी काळे ७४.८५ टक्के गुण घेऊन तृतीय आली आहे. बीएस्सी नर्सिंग चौथ्या सेमिस्टारमध्ये शामल गुट्टे ७७ टक्के गुण घेत प्रथम, शंभूराजे खराटे ७५ टक्के घेऊन द्वितीय तर ओमकार सोनटक्के ७४ टक्के गुण घेत तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाला आहे. विद्यार्थ्यांना समन्वयक डॉ. शैलेश कचरे, सहसमन्वयक अनिरूध्द पाटील, प्राचार्य शिरीन सॅमसन, उपप्राचार्य एजाज शेख, डॉ. अजहर शेख, नसरीन बानो, जन्सन राजपेठे, रेखा सूर्यवंशी यांचे मार्गदर्शन लाभले.



### संक्षिप्त वृत्त...

## लग्न सराईमुळे बाजारात गर्दी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ एप्रिल -** विवाह सोहळ्याचा माहोल सुरू झाला असून लग्न सराईमुळे बाजारात खरदीसाठी सध्या गर्दी वाढत आहे.

मंगल कार्यालयाच्या तारखा देखील फुल्ल असल्याचे फलक डकवले जात आहेत. लातूर शहरातील कपड्याचे, सोन्या-चांदीचे दुकानांमध्ये गर्दी होत असल्याचे चित्र असून, या लग्नसराईमुळे सोन्याचा भाव दिवसेंदिवस वाढत आहे. एक तोळ्याचा दर पार ९० हजार रूपयांच्या पुढे सरकत आहे. दरम्यान मंगळवारी सोन्याच्या दराने लाखाचा टप्पा पार केला आहे.

## राष्ट्रवादी युवक काँग्रेसचा शहरात मेळावा उत्साहात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ एप्रिल -** राष्ट्रवादी युवक काँग्रेसचा (अजित पवार) युवक मेळावा लातूर येथे



शनिवारी झाला. यावेळी पक्षाचे युवक प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती.

मंचावर माजी मंत्री आमदार संजय बनसोडे, आमदार विक्रम काळे, शहराध्यक्ष मकरंद सावे, नांदेड शहराध्यक्ष जीवन घोगरे, प्रदेश सरचिटणीस ॲड. व्यंकट बेद्रे, शहर कार्याध्यक्ष प्रशांत पाटील, माजी नगरसेवक नवनाथ आल्टे, लाला सुरवसे, इर्शाद सय्यद, अमर पाटील, विशाल आवाडे, अभिजित सगरे, प्रवीण पाटील, अनिल नल्ले, कबीर शेख, मयूर जाधव, खमर काझी, सचिन चव्हाण, किशोर सवंडकर, राजकिरण सूर्यवंशी, सोहम गायकवाड, प्रवीण थोरात, जहांगीर शेख, राजेश खटके यांच्यासह कार्यकर्ते, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी युवक प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांनी युवक कार्यकर्त्यांशी संवाद साधला.

## श्रावस्ती बुध्दविहारात डॉ. आंबेडकर जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ एप्रिल -** श्रावस्तीनगरातील श्रावस्ती बुद्ध विहारात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. प्रारंभी बुद्ध-भीमांच्या प्रतिमांचे धुप, दिप, पुष्पाने वंदन केले. प्रतिभा सावळेंच्या हस्ते धम्म ध्वजारोहण करुन बुद्ध वंदना घेतली.

यावेळी संजीवनी गडेराव, मंगल धायगुडे, कुसूम बानाटे, उदय गडेराव, प्रा. विलास घारगावकर, हिराचंद धायगुडें, विजयमाला सरवदे, पुष्पा शिंदे, सुमित्रा कांबळे, अनुसया कांबळे, सुकुमार गोरे, शिवकांता सवई, संजीवनी गुंजूरगे, महादेवी वाघमारे, वत्सला जाधव, सुशीला डोणेराव, अर्चना माने, अल्का कांबळे उपस्थित होते.

## गल्लीत राहायचे नाही म्हणत मारहाण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ एप्रिल -** तू आमच्या गल्लीत राहायचे नाही, मी इथला दादा आहे. आताच्या आत्ता इथून रुम खाली कर म्हणत एकास मारहाण करण्यात आल्याची घटना लातूर शहरातील खाडगाव रोड भागात घडली. या प्रकरणी एमआयडीसी पोलिस ठाण्यात रविवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी सांगितले, फिर्यादी राम मारोती शिंदे यांना सूरज आडसुळे याने कॉलरला धरून शिविगाळ करून तू आमच्या गल्लीत राहायचे नाही. मी इथला दादा आहे. तू तिथून आत्ताच्या आत्ता रुम खाली कर म्हणून सांगितले. मी रुम खाली करणार नाही, असे म्हटल्यावर आरोपी सूरज आडसुळे याने हातातील लाकडी फळीने डोक्यात, पाठीत मारून जखमी केले. तसेच तू इथून रुम खाली केली नाहीस तर तुला खल्लास करून टाकतो म्हणत जिवे मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

# जिल्ह्यातील शेतकरी मशागतीच्या कामात शेतकरी व्यस्त



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २१ एप्रिल -** पावसाळा एक महिन्यावर येऊन ठेपला असून सध्या जिल्ह्यात कडक उन्हाळा जाणवत आहे.अशा स्थितीत खरीप हंगामापूर्वी शेतीची मशागत करण्याच्या कामाला सुरूवात झाली आहे. मागील वर्षी पावसाळा वेळेवर सुरू झाला होता. त्यामुळे शेतकऱ्यांनी लगेच पेरणी केली होती. यावर्षीही लवकर पावसाळा सुरू होईल व मुबलक प्रमाणात पाऊस होईल, असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. त्यामुळे शेतकरी पेरणीपूर्व मशागतीच्या कामाला लागला आहे. मशागतीची कामे वेगाने व्हावी, यासाठी बैलांऐवजी ट्रॅक्टर व इतर आधुनिक यंत्राचा वापर केला जात आहे.

एकीकडे लग्नसराईची धामधुम तर दुसरीकडे मशागतीची कामे यामुळे शेतकऱ्यांची धांदल उडत आहे. मागील वर्षी शिरूर अनंतपाळ तालुक्यातील येरोळ व परिसरात ऐन सोयाबीन काढणीच्यावेळी अतिवृष्टीने सोयाबीन व तूर पिकांचे मोठे नुकसान झाले. अतिवृष्टीचा फटका मागील वर्षी खरीप हंगामाला बसला होता. खरीपातील तोटा भरून काढण्यासाठी शेतकऱ्यांनी रब्बी हंगामात गहू, हरभरा व ज्वारीसह इतर पिकांची मोठ्या प्रमाणात पेरणी केली. मात्र, त्यावरही निसर्गाने हल्ला केल्याने रब्बी पिकांचे नुकसान झाले. रब्बीची तूट भरून काढण्यासाठी सिंचनाची सोय असलेल्या बहुतांश शेतकऱ्यांनी उन्हाळी भूईमुग पिकाची लागवड केली आहे. पावसाळा सुरू होण्यासाठी एक महिन्याचा कालावधी असला तरी भारनियमनामुळे यावर्षी शेतात पिके घेता आली नाहीत.

काळ बदलत चालला आहे आणि काळानुरुप शेतीही यांत्रिक पध्दतीने करण्यावर शेतकरी जोर देत आहेत. चाऱ्याची वाढती टंचाई लक्षात घेऊन बहुतांश शेतकरी मशागतीसाठी बैलांऐवजी ट्रॅक्टरसारख्या यंत्राचा वापर करताना दिसून येत आहेत. यंत्रामुळे अल्पावधीतच मशागत करणे शक्य असल्याने बैलजोड्याही नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. वर्षभराचा घर खर्च, घरातील मुला-मुलींचे लग्न, आजारपण व इतरही खर्च यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असला तरी त्याला पावसाळ्यात पेरणीची व्यवस्था करावीच लागणार आहे. त्यामुळे पेरणीसाठी लागणारे बी-बियाणे, खते यासाठी पैशाची जुळवा जुळव कशी करावी, या विवंचनेत शेतकरी दिसून येत आहेत. तरीही लातूर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील शेतकरी पुन्हा एकदा शेतीच्या मशागतीच्या कामाला लागला आहे.

## पशुसंवर्धन विभागात २७९५ पदे भरण्याचे आव्हान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ एप्रिल -** राज्याचा पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागात समाविष्ट करण्याच्या हालचाली शासन स्तरावर सध्या थंडच आहेत. गतवर्षी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर मंत्रिमंडळ बैठकीत या निर्णयास मंजुरी देण्यात आली होती.

राज्य आणि जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धनचा मिलाप करण्याची कल्पना तत्कालिन पशुसंवर्धनचे वरिष्ठ अधिकारी तुकाराम मुंडे यांची. दोन स्वतंत्र विभाग चालविण्याऐवजी एकत्र करून जि. प. सीईओंच्या नियंत्रणाखाली एकच पशुसंवर्धन विभाग आणला तर तो

> पुनर्रचनेप्रमाणे बदल करायचे असतील तर पशु अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या २७९५ पदवीधारकांची पदे स्पर्धा परीक्षेतून (गट अ) (एमपीएससी) भरावी लागणार आहेत. एवढी पदे राज्य शासन एकावेळी भरेल का? असा प्रश्न आहे. यामुळे शासनासमोर पुनर्रचनेचे आव्हान असू शकते, याला लातूरच्या पशुसंवर्धन विभागाने दुजोरा दिला.

प्रभावी ठरेल, अशी ती कल्पना.

या बाबीला तत्कालिन सरकारने पुनर्रचना असे नाव दिले. पुनर्रचनेत राज्याद्वारे चालविले जाणारे जिल्हा पशु चिकित्सालय, तालुकास्तरीय चिकित्सालये आणि जिल्हा परिषदेच्या नियंत्रणात येणारे पशुवैद्यकीय दवाखाने (श्रेणी एक-दोन) ही तीन प्रकारची विंग एकत्र आणण्याची कल्पना आहे. पुनर्रचनेत श्रेणी एक-दोनचे दवाखाने पशु वैद्यकीय चिकित्सालये होणार आहेत. या चिकित्सालयात पदवी व डिप्लोमाधारक दोन्ही अधिकारी असणार. सध्याच्या स्थितीत ५ हजार पशुधन घटकांमागे एक पदवीधारक

किंवा डिप्लोमाधारक नियुक्त केला जायचा; पण पुर्नरचनेत भारतीय पशुवैद्यक कायदा १९८४ नुसार पदवीधारकच नियुक्त करण्यावर भर दिला गेला. त्यामुळे डिप्लोमाधारकास पदवीधारकाच्या हाताखाली काम करावे लागेल. हा निर्णय अजून झालेला नाही. पुनर्रचनेत हा बदल केला आहे. केलेले बदल अत्यंत चांगले आहेत. शासन यावर अद्याप कार्यवाही करीत नाही. सरकार सत्तेत बसल्यापासून पुनर्रचनेबद्दल कोणत्याच हालचाली नाहीत. कारण, ही बाब खर्चिक आहे.

शासनाने निवडणुकीच्या तोंडावर कोणाचेही 'लाड' केल्याने पैशाची चणचण सर्वांच्या मूळावर उठली. पदवीधारकांची स्पर्धा परीक्षेतून निवड करायची आहे. तत्पूर्वी, वित्त विभागाकडून आर्थिक तरतूद करून घ्यावी लागते. हे सर्व धोरणात्मक निर्णय असल्याने पुनर्रचनेचा फंडा हल्ली शासनाने थंड बस्त्यातच ठेवला आहे.

## अनधिकृत बालगृहे, वसतिगृहांची माहिती देण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ एप्रिल -** पुणे आणि ठाणे जिल्ह्यात बेकायदेशीरपणे बालगृहे, वसतिगृहे आणि अनाथ आश्रम चालवले जात असल्याच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या आहेत.

वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित झालेल्या माहितीनुसार, या संस्थांमध्ये मुलांना बेकायदेशीरपणे डांबून ठेवण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे. ही बाब अत्यंत गंभीर असून, बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५, सुधारित अधिनियम २०२१ आणि महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २०१८ मधील तरतुदींचे उल्लंघन करणारी आहे.

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ आणि सुधारित अधिनियम २०२१ मधील कलम ४२ नुसार, मान्यताप्राप्त नोंदणी प्रमाणपत्र नसलेली संस्था अथवा अशी संस्था चालवणाऱ्या व्यक्तीला एक वर्षापर्यंत कारावास, एक लाख रुपयांपेक्षा कमी नसलेला दंड किंवा दोन्हीही शिक्षा होऊ शकते, अशी तरतूद आहे. तरी आपल्या परिसरात अशा अनधिकृत संस्था आढळल्यास कळविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## हजार रुपयांची लाच घेणाऱ्या लिपिकास कारावास

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ एप्रिल -** एमआयडीसीचा भाडेपट्टा करण्यासाठी स्टॅम्पड्यूटी चलनाद्वारे भरण्यात आलेली पावती जमा करून दस्त देण्याच्या कामासाठी एक हजार रुपयांची लाच घेणाऱ्या येथील सहायक दुय्यम निबंधक कार्यालयातील एका लिपिकाला तीन वर्षांच्या कारावासासह ५ हजार रुपये दंडाची शिक्षा येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश आर. बी. रोटे यांनी ठोठावली आहे. आठ वर्षांनंतर या प्रकरणाचा निकाल लागला आहे.

अहमदपूर एमआयडीसीच्या जागेचा भाडेपट्टा करण्यासाठी तक्रारदाराने मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयातून स्टॅम्प ड्यूटी चलन काढले होते. सदर चलन जमा करून दस्त देण्यासाठी येथील मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयाचा कनिष्ठ लिपिक विष्णू तुळशीदास काळे याने तक्रारदाराकडून १ हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. यावरून तक्रारदाराने लातूरच्या लाचलुचप्रत प्रतिबंध विभागाला कळविले होते. लाचेच्या एक हजार रुपयांसह आरोपी कनिष्ठ लिपिक विष्णू तुळशीदास काळे याला मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले होते. ही घटना आठ वर्षापुर्वी घडली. याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात आरोपी विष्णू काळे याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

# लातूर जिल्हा परिषदेला तीन पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ एप्रिल -** राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियानांतर्गत २०२३-२४ आणि २०२४-२५ या वर्षांसाठीचा पुरस्कार वितरण समारंभ सोमवारी मुंबईत मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पार पडला. यात लातूर जिल्ह्यातील तीन उपक्रमांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

यावेळी कौशल्य विकास, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, मुख्य सचिव सुजाता सौनिक यांची प्रमुख उपस्थिती होती. पुरस्कार निवडीसाठी कार्यालयीन व्यवस्थापनात आधुनिक संकल्पना आणि व्यवस्थापन पद्धतींचा अवलंब, सेवांची गुणवत्ता, दर्जा



यातील सुधारणा, उपक्रमांची परिणामकारकता, लोकाभिमुखता, ई-गव्हर्नन्स, संसाधनांचा कार्यक्षम वापर, तक्रारमुक्त कार्यालय, तसेच नाविन्यपूर्ण, पथदर्शी संकल्पना, प्रयोग, उपक्रमांचा विचार करण्यात आला.

निलंगा नगर परिषदेने इमारतीवर सौरऊर्जा प्रकल्प कार्यान्वित केल्याबद्दल तत्कालीन मुख्याधिकारी गजानन शिंदे यांना विभागीय स्तरावरील निवड समितीच्या प्रस्तावांतून तृतीय क्रमांकाचा पुरस्कार देण्यात आला. सर्वोत्कृष्ट कल्पना, उपक्रम संवर्गात तृतीय क्रमांकाचा पुरस्कार नगर परिषद प्रशासनाचे तत्कालीन जिल्हा सहआयुक्त रामदास कोकरे यांच्या 'सीड बँक' उपक्रमाला मिळाला. हा उपक्रम वृक्ष संगोपन, संवर्धनासाठी राबवण्यात आला होता. लातूर जिल्हा परिषदेने 'खेलो लातूर' उपक्रमांतर्गत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून जिल्हा परिषद शाळांत क्रीडांगणे तयार केली. या नाविन्यपूर्ण उपक्रमाला राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान २०२४-२५ अंतर्गत सर्वोत्कृष्ट कल्पना, उपक्रम या संवर्गात तृतीय क्रमांकाचा पुरस्कार प्राप्त झाला. हा पुरस्कार जिल्हा परिषदेचे सीईओ राहुल कुमार मीना, गटविकास अधिकारी संतोष माने यांनी स्वीकारला. फुटबॉल, हॉकी, कबड्डी, खो-खो यासारख्या खेळांसाठी नियोजित क्रीडांगणे तयार केली.

# मध्यवर्ती स्थानकातून बस वाहतूक पूर्ववत ठेवा



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ एप्रिल -** मध्यवर्ती बसस्थानकातून औसा-सोलापूर, धाराशिव, बार्शी-पुणे मार्गांवरील बस वाहतूक पूर्ववत ठेवा, अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा संघर्ष समिती आणि प्रवासी संघटनेच्यावतीने सोमवारी विभागीय नियंत्रक अश्वजीत जानराव यांना निवेदनाद्वारे देण्यात आला.

लातूर मध्यवर्ती बसस्थानकातून बस वाहतूक पूर्ववत सुरू होत आहे, अशी माहिती लातूर विभाग नियंत्रकांच्यावतीने देण्यात आली. ही माहिती जनतेची आणि एस. टी. प्रवाशांची फसवणूक व क्रूर चेष्टा करणारी आहे. मध्यवर्ती बसस्थानक पूर्ववत सुरू करण्याऐवजी ते बंद करण्याच्या दिशेने प्रशासनाने टाकलेले हे पाऊल आहे.

> **वाहतूक कोंडीस ट्रॅव्हल्स्, काळी पिवळी जबाबदार**
>
> पूर्ववत औसा मार्गे जाणाऱ्या बसेस सुरू ठेवल्यास त्या उड्डाण पुलावरून जातात तसेच मुरूड–बार्शी–धाराशिव जाणाऱ्या बसेस स्व. विलासराव देशमुख मार्गाने या रस्त्यावरून गेल्यास छत्रपती शिवाजी महाराज चौकात वाहतूक कोंडी होणार नाही. लातूर शहराच्या पूर्व भागात बहुसंख्य बस प्रवाशी राहतात. त्यांच्यावर नवीन निर्णयामुळे आर्थिक बोजा पडणार आहे. शहरातील वाहतूक कोंडीस खासगी ट्रॅव्हलस्, काळी–पिवळी जीप जबाबदार आहेत.

२३ एप्रिल २०२५ रोजी पासून मध्यवर्ती बसस्थानक येथून लातूर-मुरूड-बार्शी-इंदापूर-पुणे-मुंबई मार्गावरील सर्व बस, लातूर-औसा-तुळजापूर-सोलापूर-पंढरपूर मार्गावरील सर्व बस आणि लातूर-धाराशिव मार्गावरील सर्व शटल आणि पुढे जाणाऱ्या बस बसस्थानक क्रमांक २ वरून सुटतील, हा निर्णय प्रवाशांसाठी अन्यायकारक आणि खर्चीक ठरणार आहे.

बसस्थानक क्रमांक २ येथून बस सेवा सुरू ठेवण्यासाठी वाहतूक कोंडीचे दिलेले कारण कुचकामी असून, उलट बसस्थानक क्रमांक २ वरून बसेस सुरू झाल्यास छत्रपती शिवाजी महाराज चौक व जुना रेणापूर नाका येथे मोठ्या प्रमाणात वाहतुकीची कोंडी होणार आहे.

पूर्वीप्रमाणेच मध्यवर्ती बसस्थानकातून औसा - तुळजापूर - सोलापूर -कोल्हापूर, मुरूड - धाराशिव - बार्शी - पुणे - मुंबई, लातूर - कळंब, लातूर - औसा - उमरगा - कुलबुर्गी या बससेवा पूर्ववत सुरू ठेवाव्यात अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा निवेदनाद्वारे संघर्ष समिती आणि प्रवासी संघटनेच्यावतीने देण्यात आला आहे.

निवेदनावर भाई उदय गवारे, सूर्यप्रकाश धुत, विश्वंभर भोसले, बसवंत भरडे, ॲड. अजय कलशेट्टी, प्रताप भोसले, ॲड. लक्ष्मण शिंदे, बाबासाहेब सितापुरे, ॲड. जैनू शेख, संजय व्यवहारे, ॲड. भालचंद्र कवठेकर, प्रकाश वाघमारे, प्रा. प्रवीण कांबळे, पद्माकर गायकवाड, ॲड. हरी निटुरे, दीपक गंगणे, ॲड. सुमीत खंडागळे, डॉ. बालाजी रणक्षेत्रे, किरण बनसोडे, किसन सूर्यवंशी, भीम दुनगावे, उत्कर्ष होळीकर यांच्यासह इतरांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## कारमध्ये बसून क्रिकेटवर सट्टा घेणारे तिघे गजाआड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ एप्रिल -** औसा-तुळजापूर महामार्गावरील आशीव टोलनाक्याच्या पुढे एका हॉटेलसमोर कारमध्ये बसून क्रिकेटवर सट्टा लावणाऱ्या टोळीतील तिघांची माहिती खबऱ्याने दिली.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने रविवारी सायंकाळी त्यांच्यावर छापा मारला. तीन सट्टेबाजांना ताब्यात घेतले आहे. त्यांच्याकडून १६ लाख ८० हजार ५०० रुपये किमतीची एक कार, मोबाईल, टॅब असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याबाबत औसा तालुक्यातील भादा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वेगवेगळ्या वाहनांतून ठिकाण बदलत क्रिकेटच्या सामन्यावर सट्टा घेत असल्याची माहिती खबऱ्याने दिली. यावरून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गेल्या आठ दिवसांपासून पाळत ठेवत त्यांचा माग काढला.

सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास औसा-तुळजापूर महामार्गावरील आशीव टोलनाक्याच्या पुढे एका हॉटेलसमोर पांढऱ्या रंगाची क्रेटा कार थांबल्याचे दिसून आले. पथकाने तातडीने कारवर छापा मारला. यावेळी रणजित सोमवंशी ( वय ३९, रा. चांडेश्वर ता. लातूर), शुभम धरणे (२७, रा. पेठ ता. लातूर), अविनाश मुळे (२७, रा. पेठ, ता. लातूर) हे क्रिकेटच्या सामन्यावर फोनद्वारे सट्टा घेत होते. त्यांच्याकडून मोबाइल, टॅब आणि कार असा १६ लाख ८० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

# उन्हाळ्यात रसाळ फळांचे दर गगनाला

## ग्रामीण भागातील ग्राहकांचा हात आखडता; फळ व्यावसायिकांच्या गोटात उदासीनता

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि.२२ एप्रिल-**

गत वर्षापेक्षा यंदाच्या वर्षातील उन्हाळा हा कडक असुन दररोज उन्हाचे वाढते प्रमाण पाहून नरसीसह परिसरातील छोट्या - मोठ्या व्यवसायिकांनी मानवी आरोग्यास लाभदायक व उन्हापासून संरक्षण करणाऱ्या रसाळयुक्त फळांने नरसी बाजारपेठ फुलून गेली. परंतु फळांचे दर हे ग्रामीण भागातील सामान्य माणसांच्या खिशाला परवेडेनासे असल्याने ग्राहकांनी आपला हात आखडता घेतल्यामुळे फळे विक्रेत्यांची विक्री दरवर्षीप्रमाणे होत नसल्याने रसायुक्त फळे विक्रेत्यांच्या गोटात उदासीनतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

तालुक्यातील नरसी येथील बाजारपेठ ही नरसी परिसरातील १५ ते २० गावांसाठी खरेदी, विक्री छोटे मोठे व्यवसाय करण्यासाठी व्यवसायिकांना ही बाजारपेठ आजपर्यंत जणू वरदानच ठरले आहे. म्हणून येथील बाजारपेठ



४ राज्य महामार्गाच्या मध्यवर्ती ठिकाणी वसले असून येथील बाजारपेठ वर्षातील बारा महीने गर्दीने गजबजलेली पाहायला मिळत असते. त्या अनुषंगाने यंदाच्या वर्षातील उन्हाळा भयंकर कडक असुन उन्हापासून मानवी आरोग्यास लाभदायक असणारे चिकू, आंबा, पपई, टरबुज, संत्री, मोसंबी, लिंबू, खरबूज, ड्रायगन फूड, नारळासह, रसाळ युक्त फळांची विक्री मोठ्या प्रमाणात होईल या आशेने नरसीसह परिसरातील अनेक छोटे-मोठे फळ विक्रेते हे रसाळयुक्त फळांची मोठ्या प्रमाणात खरेदी करून नरसी येथील बाजारपेठेत फळ विक्रेते हे या राज्य महामार्गाच्या दोन्ही बाजूने फळांचे मोठ मोठे स्टॉल लावून बसले आहेत. परंतु यंदाच्या वर्षातील रसायुक्त फळांचे दर हे ग्रामीण भागातील सर्वसामान्य माणसांच्या खिशाला परवडेनासे नसल्याने या भागातील ग्राहक रसाळयूक्त फळे खरेदी करण्यापासून आपला हात आखडता घेत आहे. त्यामुळे येथील फळ विक्रेत्यांच्या फळ विक्रीच्या व्यवसायावर खूप मोठा परिणाम झाला असल्याची माहिती नरसीचे फळ विक्रेते सिद्दीकी अकबर बागवान यांनी दिली.

# देगलूर तालुक्यात सूर्य ओकतोय आग

**तभा वृतसेवा**
**देगलुर, दि.२२ एप्रिल-**

देगलूर शहरात गेल्या काही दिवसांपासून तापमानात सतत वाढ होत असून उन्हाचा चटका दिवसेंदिवस तीव्र होत आहे.



उन्हाच्या झळांमुळे नागरिक हैराण झाले आहेत. पुढील काही दिवसांत कमाल तापमानात वाढ होणार असून शहरातील तापमान ४१ अंश सेल्सिअस राहणार असल्याची शक्यता भारतीय हवामानशास्त्र विभागाने वर्तविली आहे.

देगलूर शहरात सोमवारपासून (ता. २१) तापमानाने चाळिशी गाठली असून, मंगळवार (ता.२२) कमाल तापमान ४१ अंश सेल्सिअस तर किमान तापमान २२.५ अंश सेल्सिअस नोंदविण्यात आले आहे. हानेगाव परिसरात ४२ अंश सेल्सिअस इतके कमाल तापमान नोंदविण्यात आले. हे यंदाच्या हंगामातील सर्वोच्च तापमान आहे.

दुपारच्या सुमारास रस्त्यावर गर्दी कमी दिसत असून, गरज नसल्यास नागरिकांनी बाहेर जाणे टाळावे, असा सल्ला वैद्यकीय तज्ज्ञांनी दिला आहे. पुढील दोन दिवसांत कमाल तापमानात आणखी वाढ होणार असल्याचे हवामानशास्त्र विभागाने सांगितले आहे.

देगलूर परिसरात कमाल तापमानात बदल होणार नसून, कमाल तापमान ४० अंश सेल्सिअस इतके नोंदविले जाईल तर किमान तापमान २० अंश सेल्सिअस नोंदवले जाईल. शुक्रवारी (ता. २५)तापमानात किंचित वाढ होणार असून कमाल तापमान ४३ अंश सेल्सिअस नोंदविले जाण्याची शक्यता आहे. आकाश मुख्यतः निरभ्र राहण्याची शक्यता हवामानशास्त्र विभागाने वर्तविली असून पुढील तिन ते चार दिवस उन्हात न फिरणायचे उपदेश केले आहे.

## संक्षिप्त वृत्त

### जिल्हा परिषद शाळा व्यवस्थापन समितीची फेरनिवड

**निवघा बा.** -येथूनच जवळच असलेल्या शिरड जिल्हा परिषद शाळेची फेर निवड करण्यात आली अध्यक्ष संतोष कल्याणकर यांच्या राजीनामा नंतर नवनिर्वाचित शालेय समितीच्या अध्यक्षपदी .नरेश रामराव शिरडकर बिनविरोध यांची निवड करण्यात आली यावेळी शाळेचे मुख्याध्यापक डोके सर बेळगे सर तुपकरी सर शालेय समितीचे माजी अध्यक्ष संतोष कल्याणकर उपाध्यक्ष बालाजी फाळके नागेश कल्याणकर संजय कल्याणकर पत्रकार महेश बोरकर बाळू जांबुतकर अनिल वानखेडे बाळू महाजन संदीप पाईकराव सिद्राम पालुरकर दिलीप शिरडकर .जे एस कदम गजू चौरे सदस्य व व इतर मंडळी उपस्थित होती..

### विभागीय आयुक्त साधणार पाणीटंचाई व पाणीपुरवठा या विषयावर थेट संवाद

**नांदेड** -विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांच्या संकल्पनेतून संवाद मराठवाड्याशी हा उपक्रम सुरु करण्यात आला असून, त्याअंतर्गत २३ एप्रिल २०२५ रोजी दुपारी ४ वाजता ऑनलाईन वेबिनारचे आयोजन करण्यात आले आहे. या वेबिनारमध्ये विभागीय आयुक्त दिलीप गावडे हे पाणीटंचाई व पाणीपुरवठा या विषयावर विभागातील नागरिकांशी थेट संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाच्या माध्यमातून विभागातील नागरिकांच्या अडचणी, समस्या, सूचना आणि अपेक्षा समजून घेण्यात येणार असून त्यानुसार संबंधित विभागांना कार्यवाहीचे निर्देश देण्यात येणार आहेत. सदर वेबिनारमध्ये निवासी उपजिल्हाधिकारी, तहसीलदार, गट विकास अधिकारी, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी सहभागी होणार आहेत. संबंधित नागरिकांसाठी वेबिनारमध्ये सहभागी होण्यासाठी आवश्यक लिंक व क्युआर कोडही प्रसिध्द करण्यात येत आहे. नागरिकांना आपल्या मोबाईलव्दारे या उपक्रमात सहभागी होता येणार आहे. तरी मराठवाडा विभागातील पाणीटंचाईग्रस्त गावांतील नागरिकांनी या संवादात सक्रिय सहभागी व्हावे, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात येत आहे.

### किनवट येथे तिसऱ्या सामूहिक उपनयन संस्कार सोहळ्याचे आयोजन

**किनवट** -अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्यावतीने तिसऱ्या सामूहिक उपनयन संस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा येत्या २ मे २०२५ रोजी सकाळी १० वाजून ३१ मिनिटांनी शहरातील श्री गजानन महाराज मंदिराच्या सभागृहात पार पडणार आहे.



ब्राह्मण समाजाच्या धार्मिक परंपरांना चालना देण्यासाठी आणि पालकांना आर्थिकदृष्ट्या सवलत मिळावी या उद्देशाने ब्राह्मण महासंघाच्या माध्यमातून सामूहिक उपनयन संस्कार सोहळा दरवर्षी आयोजित केला जातो. यंदा हा उपक्रम सलग तिसऱ्यांदा आयोजित करण्यात येत आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विविध समित्यांची स्थापना करण्यात आली असून, नियोजनपूर्वक आणि पारंपरिक पद्धतीने संपूर्ण सोहळा पार पडणार आहे. आतापर्यंत ९ बटुंची नोंदणी झाली असून आणखी इच्छुक पालकांनी आपली बटुंना नोंदणीसाठी पुढे यावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. नोंदणीसाठी अंतिम मुदत ३० एप्रिल २०२५ पर्यंत असून, खालील संपर्क क्रमांकांवर पालकांनी नाव नोंदणी करावी: ९४०४७३८७३६, ९७६३०४८५६६ कार्यक्रमात सहभागी बटुंना संपूर्ण उपनयन विधी, संस्कार साहित्य, भोजन व्यवस्था तसेच प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. कार्यक्रमात श्रद्धाळू नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, विद्वान ब्राह्मण, तसेच इतर मान्यवर उपस्थित राहणार असल्याची माहिती ब्राह्मण महासंघ व मौंज मेळावा समितीकडून देण्यात आली. हा कार्यक्रम म्हणजे धार्मिक आणि सामाजिक मूल्यांचे संवर्धन करणारा एक स्तुत्य उपक्रम असून, नागरिकांनी त्याला उत्तम प्रतिसाद द्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### प्राथमिक शिक्षक संघाच्या राज्य सल्लागारपदी चोंडे तर राज्य उपाध्यक्षपदी कल्याणपाड

**नांदेड**-महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाची जिल्हास्तरीय महामंडळ सभा शुक्रवार, दि. १८ एप्रिल रोजी नांदेड येथे संपन्न झाली. सभेच्या अध्यक्षस्थानी राज्याध्यक्ष केशवराव जाधव होते. या सभेत महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्या राज्य सल्लागारपदी निळकंठ चोंडे यांची तर उपाध्यक्षपदी व्यंकट कल्याणपाड यांची निवड करण्यात आली. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्या कार्याविषयी आणि संघटनेचा इतिहास, शिक्षकांचे प्रश्न सोडविण्यासाठी जिल्हास्तरीय संघटनेने करावयाची कामे याविषयी शिक्षकांचे राज्य नेते माधवराव पाटील, राज्य सरचिटणीस लायक पटेल यांनी मार्गदर्शन केले. यानंतर महामंडळ सभेत संघाचे जिल्हाध्यक्ष निळकंठराव चोंडे सेवानिवृत्त झाल्यामुळे त्यांची संघटनेच्या राज्य सल्लागारपदी, तर राज्य उपाध्यक्षपदी व्यंकट कल्याणपाड यांच्या निवडीनंतर नांदेड जिल्हा महाराष्ट्र राज्य प्राथमिक संघाची नवीन कार्यकारिणी निवडण्यात आली.जिल्हाध्यक्ष शंकर हासगुळे, कार्याध्यक्ष संजय नक्कावार, सरचिटणीस रमेश घुमलवाड, कोषाध्यक्ष बालाजी चंदावाड, सचिव भाऊसाहेब वडजे, वरिष्ठ उपाध्यक्ष संजीवकुमार होरे, संपर्कप्रमुख दिलीप पांचाळ, शिवकुमार पाटील, प्रसिद्धप्रमुख संग्राम झुडपे, रघुनाथ सोनटक्के, शिवशंकर रॅपनवाड यांची तर सल्लागार म्हणून शिवाजी मुंडकर, सचिन पाटील, अविनाश कोल्हे, ओमप्रकाश बावगे, जयवंत देशमुख, नारायण गॅदलवाड, उपाध्यक्ष मोतीपाशा बेग, भीमराव बैलके, शंकर बेंद्रे, संजय वाघमारे, अशोक अंभोरे, संजय खंडागळे, विठ्ठल लांडगे, लक्ष्मीकांत पंतुलवार, कैलास काळेवाड, शेख आलीम, मंगेश कोंडलवाडे, जिल्हा संघटक रामदास ढाले, विजय कुऱ्हाडे, नवीन आरगुलवार, राजेश्वर भंडारे, सुभाष चव्हाण, केरबा सोनमनकर, माधव तांदळे, शंकर काठेवाड, विजय येवतीकर, सहसचिव राहुल भद्रे, मालू जाधव, हनुमंत देवदे, बालाजी बासटवार, हनुमंत कानगुलवार, यादव कानगुले, नागनाथ राजुरे, शिवप्रसाद स्वामी, महिला प्रतिनिधी प्रयागताई बिचकुंदे, अनुपमा बन, सुलक्षणा राजे, आरती घुले, ज्योती कुलकर्णी, सुनीता मुकनपल्ले, आशा रूद्रावार यांची निवड करण्यात आली.

# लोहा महसुल प्रशासनाच्या महेरबानीमुळे अवैध वाळूची साठवणुक

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि.२२ एप्रिल-**

महसुल प्रशासनाच्या मेहरबानीने शहराच्या आजूबाजूच्या परिसरात अवैध वाळूचे मोठ-मोठे ढिग टाकुन साठवणूक केली जात आहे याकडे तहसील महसूल प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे.

शहराच्या वळन रस्त्यावरुन शहरात मोठ्या प्रमात अवैध रेतीची वाहातुक होत आसताना याकडे महसूल प्रशासन डोळेझाक करताना दिसुन येते. रेतीची वाहतुकीत मोठी वाढ झाली आहे. यामुळे अवैध रेतीचे साठवणूक वाढत आहे.

तालुक्यातील बेटसांगवी, शेवडी, पेनूर, भारसावडा, अंतेश्वर यासह इतर ठिकाणावर वाळूचा उपसा मोठ्याप्रमाणात होत आहे.या परिसरात शासनस्तरावर रेती धक्के सुटलेले



नसतानाही मोठ्या प्रमाणात रेती उपसा होत आहे. महसूल प्रशासनाच्या ढिसाळ कारभारामुळे अवैद्य वाळू चोरीत वाढ होत आहे. चोरीच्या मार्गाने वाहातुक करुन शहरात व परिसरात साठवणूक केली जात आहे. शहरात उघडपणे होणारी साठवणुक कुणाच्या आशीर्वादाने होत आहे ? हा मोठ प्रशन निर्माण झाला आहे. गत सहा वर्षांपासून तालुक्यातील रेतीचे ठेका बंद आहे. मग ही यंत्रना कोणाच्या मार्गदर्शनाखाली सक्रीय होत आहे. रेती तस्करीचा शोध घेणे प्रशासनापूढे मोठे आव्हान आहे. शासनाचा कोट्यवधींचा महसूल बुडत आहे पण महसूल विभाग झोपल्याचे सोंग करत आहे.

सध्यातरी एकही वाळूचा ठेका एकाही ठेकेदाराकडे नाही मग ही शहरातून येणारी वाळू जमा होत आहे. जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी या अवैध वाळू चोरीला आळा घालुन महसूल प्रशासनाची झोप उडवावी अशी मागणी होत आहे.

# भाजपाच्या हदगाव शहर मंडळ तालुका अध्यक्षपदी बाला पाटील

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि.२२ एप्रिल-**

पक्ष संघटनेवर जोर देत आगामी काळातील निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपाच्या वतीने तालुक्यास नव्या उमेदीचे तरुण- तडफदार तालुका अध्यक्ष लोकशाही पद्धतीने निवडण्याचा पायंडा पाडला असून त्याच पार्श्वभूमीवर भाजपाचे सक्रिय कार्यकर्ते, पक्ष वाढीसाठी अहोरात्र परिश्रम घेणारे, सदस्य नोंदणी, वरिष्ठांचे आदेशाचे पालन करणारे कोणतेही वशिलेबाजी न लावता काम बोलता है या उक्तीप्रमाणे भाजपाच्या हदगाव शहर मंडळ तालुकाध्यक्षपदी बाला पाटील यांची निवडीची घोषणा झाली असून या कामी निवडणूक निरीक्षक म्हणून संतोष मारकवाड, डॉ. प्रसाद डोंगरगावकर यांची प्रमुख उपस्थिती होती. घोषणे नंतर भाजपा कार्यकर्त्यांच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, राठी चौक व आझाद चौक येथे आतिषबाजी करत जल्लोष



साजरा करण्यात आला.

भाजपा पक्षाच्या नवीन धोरणानुसार हदगाव तालुक्यास तीन तालुकाध्यक्ष निवडण्याचा तंत्र अवलंबिला असून ज्यात वयाची मर्यादा देखील ठरविण्यात आली होती. भाजपा पक्षात वशिलेबाजीला कोणत्याही स्थिर थारा नाही हे या निवडीतून दिसून आले ज्यांनी सदस्य नोंदणी, पक्षाचे विविध कार्यक्रम, वरिष्ठांचे आदेशाचे पालन, पक्ष संघटन मजबूत केले त्यांचीच निवड होणार यात मात्र तीळमात्र शंका नव्हती याच निकषावर हदगाव शहर मंडळ तालुकाध्यक्षपदी बाला पाटील यांची निवड झाली असून या पदाच्या माध्यमातून पक्ष संघटन वाढीसाठी तसेच विविध जनकल्याणकारी योजना सामान्य पर्यंत पोहोचवुन भाजपाचे ध्येयधोरण तळागाळापर्यंत पोहोचविण्याचे प्रामाणिक प्रयत्न करेल अशी प्रतिक्रिया निवडीनंतर बाळा पाटील यांनी व्यक्त केली. यावेळी प्रदेश कार्यकारणी सदस्य शेखर कदम, माजी सभापती तुकाराम चव्हाण, माजी तालुकाध्यक्ष निळू पाटील, किशोर शिंदे, रूपादेवी पाटील, लताताई फाळके, सुप्रिया मुनेश्वर, सचिन कामारीकर, मोरेश्वर माने, अशोक देशमुख, किशन कांबळे गोलू पारटकर ,हरिदास चिंतले, अविनाश पाटील, राजूभाऊ मोरे, गजानन लकडे, बाळू शंकुरवार, संतोष कांबळे, बाळू वंजारे, शिवदास वेमुला, सलीम पटेल यांच्यासह पक्षाचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# भारतीय जनता पार्टी जनसंपर्क अभियान उमरी बाजार गटात अधभूतपूर्व प्रतिसाद

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि.२२ एप्रिल-**

भारतीय जनता पार्टी जनसंपर्क अभियान जिल्हा परिषद उमरी बाजार गटात चांगला प्रतिसाद मिळत असून या अभियानाला दिनांक १२ एप्रिल रोजी तुळजाभवानी मंदिर सारखणी येथून सुरुवात किनवट माहूर विधानसभेचे लोकप्रिय विकास पुरुष आमदार भीमरावजी केराम यांच्या नेतृत्वाखाली या जिल्हा परिषद गटातील तडफदार नेतृत्व करणारे सल्लागार युवा नेते एडवोकेट नैतिक नाईक यांच्या नियोजनबद्ध पद्धतीने प्रारंभ सुरुवात करण्यात आली,

या ग्रामीण भागातील जिल्हा परिषद उमरी बाजार गटातील निराळा तांडा येथील रहिवासी असलेले कर सल्लागार युवा नेते एडवोकेट नैतिक नाईक यांच्या अल्प कालावधीतच त्यांनी उमरी बाजार जिल्हा परिषद गटातील अनेक वाडी तांड्यातील नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या आहेत व तसेच आमदार भीमराव केराम यांच्या नेतृत्वाखाली विविध समस्या सोडविण्यासाठी सतत प्रयत्नशील असल्याचे दिसून येत आहे म्हणून पुढील दिनांक १२ एप्रिल २०२५ रोजी सारखणी येथून या जनसंपर्क अभियानाला सुरुवात आमदार भीमराव केराम यांच्या हस्ते करण्यात आले,

# जिल्ह्यात सोयाबीन प्रक्रिया उद्योग सुरू करावा: खा. डॉ. अजित गोपछडे

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२२ एप्रिल-**

नांदेड जिल्ह्याला औद्योगिक क्षेत्रामध्ये पुढे आणण्यासाठी आणि रोजगार निर्मितीसाठी सोयाबीन प्रक्रिया उद्योग सुरू करावा अशी मागणी खा. डॉ. अजित गोपछडे यांनी पालकमंत्री अतुल सावे यांच्याकडे केली . या उद्योगाच्या उभारणी सोबतच नांदेड - मुंबई विमानसेवा आणि वंदे भारत रेल्वे ही सुरू करावी असे साकडेही त्यांनी पालकमंत्र्यांना घातले.

नांदेड जिल्ह्यात सोयाबीन उत्पादन मोठ्या प्रमाणात होत असते, त्या उत्पादित सोयाबीनवर नांदेड जिल्ह्यातच प्रक्रिया करता आली तरी एक मोठा रोजगार येथे उपलब्ध होईल. शेतकऱ्यांनाही मोठा आर्थिक लाभ मिळेल. या अनुषंगाने त्यांनी राज्यसभेतही प्रश्न उपस्थित केला होता. आता हीच मागणी त्यांनी पालकमंत्री अतुल सावे यांच्या



माध्यमातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. पालकमंत्र्यांनी नांदेड जिल्ह्यात सोयाबीन प्रक्रिया उद्योग सुरू करण्यासाठी मुख्यमंत्र्यांकडे आग्रह धरावा अशी विनंती त्यांनी केली आहे. सोयाबीन उद्योग उभा करत असताना व्यापारी उद्योजकांना नांदेडला येण्या जाण्यासाठी जलद सेवा उपलब्ध व्हावी यासाठी नांदेड - मुंबई विमान सेवा तातडीने सुरू करावी. यासोबतच वंदे भारत ही रेल्वे सेवा ही सुरू करावी अशी मागणी ही त्यांनी केली.

# जिल्हा माहिती अधिकारी प्रवीण टाके यांची कोल्हापूर उपसंचालक पदावर पदोन्नती

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२२ एप्रिल-**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील ७ वरिष्ठ अधिकाऱ्यांना उपसंचालक माहिती म्हणून पदोन्नती देण्यात आली आहे. सामान्य प्रशासन विभागाने आज २२ एप्रिल रोजी या संदर्भातील आदेश काढले आहेत. यामध्ये नांदेडचे जिल्हा माहिती अधिकारी प्रवीण टाके यांचाही सहभाग असून त्यांची नियुक्ती विभागीय माहिती कार्यालय कोल्हापूर येथे उपसंचालक म्हणून करण्यात आली आहे.



जिल्हा माहिती अधिकारी या पदावर गेल्या वर्षी फेब्रुवारी महिन्यात प्रवीण टाके नांदेड येथे रुजू झाले होते. यापूर्वी त्यांनी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयात रूजू झाल्या नंतर नवी दिल्ली येथील महाराष्ट्र परिचय केंद्रात जनसंपर्क अधिकारी, मंत्रालयात वरिष्ठ सहायक संचालक असताना लोकराज्यचे कार्यकारी संपादक म्हणून तर चंद्रपूर व नागपूर या दोन ठिकाणी जिल्हा माहिती अधिकारी या पदावर कार्य केले आहे . शासकीय सेवेत येण्यापूर्वी त्यांनी नागपूर पत्रिका ,तरुण भारत, सामना व लोकमत या दैनिकांमध्ये पत्रकारिता केली आहे. नांदेडमध्ये वर्षभरात दोन लोकसभा व विधानसभा निवडणूक काळात त्यांनी उत्तम काम केले.

आज सामान्य प्रशासन विभागाने जाहीर केलेल्या पदोन्नतीमध्ये रवी गीते जिल्हा माहिती अधिकारी वर्धा यांना विभागीय माहिती कार्यालय कोकण येथे उपसंचालक पदावर नियुक्ती देण्यात आली आहे. वरिष्ठ सहाय्यक संचालक देवेंद्र पाटील, प्रतिनियुक्ती वर असलेल्या मीनल जोगळेकर, कीर्ती मा पांडे, वर्षा आंधळे व किरण मोघे यांनाही पदोन्नती देण्यात आली आहे.

# निवघा ते बाळापूर रस्त्यावर जीवघेणा खड्डा !



**तभा वृतसेवा**
**निवघा बा., दि.२२ एप्रिल-**

निवघा बाजार ते हदगांव रस्ता हा अत्यंत वर्दळीचा रस्ता असून या रस्त्यावर जागोजागी खड्डे पडले आहेत. निवघा बाजार ते मानवाडी फाटा ८ कि.मी. अंतर आहे. या रस्त्यावर धानोरा (रुई) या गावाजवळून कयाधु नदी वाहते मुख्य रस्त्यावर कयाधू नदीवर अरूंद पुल असून, पावसाळ्यामध्ये जास्त प्रमाणात पाऊस पडला तर कयाधू नदीवरील पुलावरून पुराचे पाणी वाहते पुलावरील पाणी कमी होईपर्यंत हा मुख्य मार्ग पावसाच्या पाण्यामुळे काही काळ बंद असतो. पावसाचे पाणी पुलावरून वाहील्याने प्रत्येक वर्षी पुलाच्या बाजूचा धानोरा गावाकडील रस्ता खरडून जातो. ठीकानी मोठे खड्डे तयार झाले आहेत रस्त्यावरील खड्डा हा जिवघेना झाला असुन अपघात होण्याची शक्यता आहे सा.बां. विभागाचे मात्र दुर्लक्ष होत आहे.

पावसाळा संपल्यानंतर बांधकाम विभागाकडून थातूर- मातूर पद्धतिने या मुख्य रस्त्यावरील पुलाजवळील पडलेले खड्डे भरले जातात. एक महीन्याच्या आत बांधकाम विभागाने भरलेले खड्डे जसे थे होतात याकडे पुर्ण दूर्लक्ष होत असल्याचे या रस्त्यावरील वर्दळ असणाऱ्या अनेक गावांच्या नागरीकांमधुन बोलल्या जाते. असाच एक खुपच मोठा खड्डा अनेक दिवसापासुन धानोरा येथिल कयाधू नदीच्या पुलाच्या बाजुला पडला आहे. रस्त्याच्या दोन्ही साईडकडून खड्डे पडून रस्त्याच्या मधोमध मोठा जिवेघेना अपघाती खड्डा पडला असून, या रस्त्यावर मागील वर्षात दोन नागरीकांना पुढील वाहया नदीजवळील खड्डयामुळे दुचाकी, चारचाकी वाहनचालकांना वाहन चालवतांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. हा खड्डा अत्यंत धोकादायक असून, या रस्त्यावरील खड्ड्यामुळे वाहनाचा अपघात होवून जिवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबंधित सार्वजनिक बांधकाम उपविभाग हदगांव येथिल वरिष्ठ अधिकारी यांनी याकडे लक्ष देवून या रस्त्यावरील खड्डे बुजवण्याची मागणी येथिल जनतेतून होत आहे.

# मनोहर पा. शिंदे यांच्या हस्ते नुतन शहर अध्यक्ष विश्वाभंर शिंदे यांचा सत्कार



**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि.२२ एप्रिल-**

भाजपा नांदेड दक्षिण शहर मंडळ अध्यक्ष विश्वंभर पाटील शिंदे यांच्यी फेर निवड झाल्याबद्दल माजी जिल्हा परिषद सदस्य मनोहर पाटील शिंदे यांनी नुतन अध्यक्ष विश्वभंर शिंदे याचा सत्कार दिनांक २२ एप्रिल रोजी सकाळी आपल्या निवासस्थानी करण्यात आला.

माजी जिल्हा परिषद सदस्य मनोहर पाटील शिंदे यांच्या निवासस्थानी भाजपा मंडळ अध्यक्ष नांदेड दक्षिण अध्यक्षपदी विश्वाभंर पाटील शिंदे यांच्यी फेर निवड झाल्याबद्दल स्वागत व सत्कार करून पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी नांदेड शहर उपाध्यक्ष जयप्रकाश येवले, नांदेड तालुका सरचिटणीस शैलेंद्र ठाकूर यांच्या सह ग्रामपंचायत सदस्य राजेश बोटलवार,शंकर शिंदे, यांच्या सह , ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ उपस्थित होते.

# सागद येथील महिलांचा जिल्हा परिषदेवर घागर मोर्चा

## जलजीवनचे काम अपूरे, गावात भीषण पाणीटंचाई



**जलजीवन मिशन योजनेची सखोल चौकशी करणे गरजेचे**

जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये जलजीवन मिशन योजनेची कामे करण्यात आली आहेत. परंतु बहुतांश गावांमध्ये ही योजना कुचकामी ठरत असल्याचे दिसत आहे. या योजनेंतर्गत लाखो रूपये खर्च करूनही ग्रामस्थांना पाणी मिळत नसल्याच्या तक्रारी अनेक गावातील नागरिकांनी केल्या आहेत. त्यामुळे या योजनेची सखोल आणि निष्पक्ष चौकशी होण्याची नितांत आवश्यकता आहे. ग्रामीण भागात घराघरापर्यंत जलजीवन मिशनच्या अंतर्गत शुध्द आणि स्वच्छ पाणी मिळावे हा उद्देश असतांना या योजनेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ एप्रिल**

जिल्ह्यातील सागद येथे ग्रामस्थांना भीषण पाणीटंचाईला तोंड द्यावे लागत आहे. गावात जलजीवन मिशनचे काम अपूर्ण आहे तर गावात एका बोअरला पाणी आहे परंतु बोअरचे पाणी ग्रामस्थांना घेऊ दिले जात नाही. त्यामुळे महिलांनी दि २२ एप्रिल रोजी जिल्हा परिषदेवर घागर मोर्चा काढीत मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांना पाणीटंचाईवर उपाययोजना करण्यासाठी निवेदन सादर केले आहे.

जिल्ह्यातील सागद येथे भीषण पाणीटंचाईमुळे ग्रामस्थ हैराण झाले आहेत. गावात जलजीवन मिशनचे काम आज रोजी बंद पडले आहे. जलजीवनची विहीर कोरडीठाक पडली आहे. दलीत वस्तीचा बोअरला पाणी आहे परंतु विलास गरड यांच्या शेतजमिनीत हा बोअर असल्यामुळे बोअरचे पाणी गावातील लोकांना देत नाहीत. सदरील बोअर त्याच्या मालकीचा आहे असे गावकऱ्यांना सांगत आहे. वास्तविक सदरील बोअर हा दलीत वस्तीचाच आहे. या बोअरचे पाणी ग्रामस्थांना देण्यात यावे. जलजीवन मिशन अंतर्गत असलेली विहीर कोरडी पडल्यामुळे तसेच केलेली पाईप लाईन अपूरी आणि कामही अपूर्ण असल्यामुळे या योजनेचा ग्रामस्थांना काहीच उपयोग होत नाही. पाणीटंचाईमुळे महिलांना हंडाभर पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. गावातील पाणीटंचाईवर उपाययोजन करून पाणीप्रश्न सोडवावा अन्यथा जिल्हा परिषद कार्यालयासमोर आमरण उपोषणाचा इशारा या महिलांनी दिला आहे. निवेदनावर विजय इंगोले, कैलास धुळे, संजीव धुळे, सदानंद इंगोले, आकाश खिल्लारे, अर्चना नामदेव, सुमनबाई इंगोले, वंदना हनवते, ज्योती मोरे, सोनुबाई मनवर, गीता भगत, कांताबाई धवसे, गयबाई इंगोले, सौमित्राबाई खडसे, अर्चना भगत, शारदा इंगोले, सुनंदाबाई धुळे, मालताबाई धुळे, निलीमा इंगोले, सविता वाढवे, प्रदीप मोरे, नामदेव धुळे, आकाश खडसे, भास्कर हनवते, रवि इंगोले, मिथुन वाढवे, मनोज इंगोले, हर्षद इंगोले, जयदीप इंगोले, लिंबाजी धुळे, सतीश धुळे, गजानन इंगोले आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# हिंगोलीत वकीलांचे काळ्या फिती लावून निषेध करीत आंदोलन

## वकीलांना योग्य सुविधा मिळत नसल्याचा आरोप



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ एप्रिल**

येथील जिल्हा न्यायालयाच्या नवीन इमारतीमध्ये वकील आणि पक्षकारांना भौतिक सुविधाची मागणी करूनही त्या मिळत नसल्यामुळे वकील संघाच्यावतीने दि २२ एप्रिलपासून काळ्या फिती लावून निषेध करीत कामकाज करण्यात आले.

हिंगोली येथे जिल्हा न्यायालयाची सुसज्ज आणि भव्य इमारत बांधण्यात आली असून याठिकाणी नुकतेच जिल्हा न्यायालयाचा कारभार सुरू झाला आहे. या इमारतीमध्ये वकीलांसाठी सुविधा असाव्यात यासाठी दि १९ एप्रिल रोजी जिल्हा वकील संघाने वकीलांच्या समस्याबाबतीत व आजपर्यंत प्रमुख जिल्हा न्यायाधीश यांना दिलेल्या निवेदनावर काहीही उपाययोजना करण्यात आल्या नाहीत. त्यामुळे वकील संघाच्यावतीने मंगळवारी काळ्या फिती लावून कामकाज करण्यात आले. यावेळी वकील संघांच्यावतीने वकील संघ हिंगोली येथे ४१७ वकील सदस्य असतांना केवळ एक हॉल व अपुरे फर्निचर देण्यात आले. वाढीव वकील संधाची मागणी आवश्यक ते फर्निचर अद्याप उपलब्ध झाले नाही. नवीन इमारतीत वकील आणि पक्षकारांना उपहारगृह व्यवस्था करण्यात यावी, वकीलासाठी लॉकर व्यवस्था, वकीलांसाठी लायब्ररी, नोटरी वकीलांना बसण्यासाठी जागात इमारतीत द्यावी, बार टाईपेस्ट व झेरॉक्सची सुविधा देण्यात यावी, ऑनलाईन फाईलींगसाठी इंटरनेटची व्यवस्था, महिला वकीलाकरिता स्वच्छतागृह आदी मागण्या करण्यात आल्या. यावेळी वकील संघाचे जिल्हाध्यक्ष ॲड सुनील भुक्तर, ॲड भाकरे, ॲड चव्हाण, ॲड शिरसाट, ॲड घुगे आदींची उपस्थिती होती.

# थाटात लोकार्पणानंतर दुसऱ्याच दिवशी रूग्णालयाला टाळे

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ एप्रिल**

औंढा नागनाथ तालुक्यातील सिध्देश्वर येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीचे आ. संतोष बांगर यांचेहस्ते लोकार्पण करण्यात आले परंतु दुसऱ्याच दिवशी मंगळवारी पावणे दहा वाजता आरोग्य केंद्राल टाळे दिसले. टाळं का लावण्यात आले हे अजूनही अस्पष्ट असले तरीही रूग्णांची मात्र गैरसोय होणार का असा प्रश्न उपस्थित होत आहे.

सिध्देश्वर व परिसरातील गावे व तांड्यावरील गावकऱ्यांना तातडीने आरोग्य सेवा मिळावी यासाठी सिध्देश्वर येथे सुमारे आठ वर्षापूर्वी प्राथमिक आरोग्य मंजूर करण्यात आले. या आरोग्य केंद्राला सिध्देश्वरसह गांगलवाडी, नंदगाव, ढेगज, वडचूना, दुरचूना, सावंगी, पाताळवाडी, भोसी, दुधाळा, सावळी या गावांसह परिसरातील सात ते आठ तांडावस्ती व इतर गावे जोडण्यात आली आहेत.

याठिकाणी आठ वर्षापूर्वी इमारतीचे बांधकाम मंजूर होऊन बांधकाम देखील तातडीने पूर्ण करण्यात आले. मात्र प्रत्यक्षात आरोग्य केंद्र सुरूच करण्यात आले नाही. त्यानंतर कोरोना काळात याठिकाणी कोवीड सेंटर सुरू करून कोवीडच्या रूग्णांना उपचारासाठी या प्राथमिक आरोग्य केंद्रात ठेवण्यात आले होते. मात्र कोवीड नंतर पुन्हा ही इमारत ओस पडली होती.

दरम्यान, सिध्देश्वर प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर होऊन इमारत पूर्ण झाल्यानंतरही उद्घाटन झालेच नाही. त्यामुळे या भागातील रूग्णांना उपचारासाठी औंढा नागनाथ व हिंगोली येथे यावे लागत होते. रूग्णांची होणारी गैरसोय लक्षात घेवून या इमारतीचे तातडीने लोकार्पण करावे तसेच पूर्ण क्षमतेने आरोग्य केंद्र सुरू करावे अशी मागणी करण्यात आली होती. मा९ या मागणीसाठी आरोग्य विभाग चालढकल करीत होते. त्यानंतर आरोग्य विभागाने गडबडीत दि २१ एप्रिल रोजी आरोग्य केंद्राचे लोकार्पण केले परंतु दि २२ एप्रिल रोजी काही जण आरोग्य केंद्रात गेले असता केंद्राला कुलूप दिसले. लोकार्पणानंतर दुसऱ्याच दिवशी आरोग्य केंद्राला कुलूप दिसल्यामुळे नागरिकांनी नाराजी व्यक्त केली असून या इमारतीत पिण्याचे पाणी नाही, वीज उपलब्ध नाही, कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांची दुरावस्था आहे तर लोकार्पणाची घाई का केली, असा सवाल या भागातील नागरिक उपस्थित करीत आहेत.



**हिंगोली– येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली मग्रारोहयो अंतर्गत आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी उपजिल्हाधिकारी अनिल माचेवाड, प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे, उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड, जिल्हा कृषी अधीक्षक राजेंद्र कदम यांच्यासह कृषी विभाग, जिल्हा परिषदे विभागातील अधिकारी, कर्मचारी यांची उपस्थिती होती. यावेळी मग्रारोहयोचा आढावा घेण्यात आला. छाया–विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### ग्रामपंचायत अधिकारी संघटनेची निवडणुक

हिंगोली– महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी डीएनई – १३६ अंतर्गत औंढा नागनाथ येथे पंचायत समिती कार्यालयात पार पडलेल्या बैठकीत औंढा नागनाथ तालुका ग्रामपंचायत अधिकारी संघटनेच्या अध्यक्षपदी कैलास विलासराव देशमुख यांची तर उपाध्यक्षपदी राम दास कचरू कांबळे, सचिवपदी योगेश गोविंदराव इपकलवार यांची निवड झाली. यावेळी ग्रामपंचायत अधिकारी संघटनेच्या तालुका अध्यक्षपदासाठी कैलास देशमुख, चंद्रकांत पुंडगे यांनी उमेदवारी अर्ज भरले. निवडणूक प्रक्रिया दुपारी तीन वाजता सुरू झाली. ५४ ग्राम पंचायत अधिकाऱ्यापैकी ५३ ग्रामपंचायत अधिकारी यांनी मतदान केले. तर १ ग्रामपंचायत अधिकारी गैरहजर होते. चार वाजेपर्यंत सर्व ग्रामपंचायत अधिकारी यांनी मतदान केले. त्यामध्ये ग्रामपंचायत अधिकारी कैलास विलासराव देशमुख यांना २७ मते पडली तर ग्रामपंचायत अधिकारी चंद्रकांत पुंडगे यांना २२ मते पडली यामध्ये निवडणूक निर्णय अधिकारी आनंदराव सांगळे यांनी ग्रामपंचायत अधिकारी कैलास विलासराव देशमुख यांना २७ मते पडल्याने औंढा नागनाथ तालुका अध्यक्ष पदासाठी विजय घोषित केले. निवडणूक प्रक्रियेत निवडणूक निर्णय अधिकारी आनंदराव सांगळे, निवडणूक निरीक्षक अधिकारी एम एस गिरी ,सहाय्यक निवडणूक निरीक्षक डी एन कंधारे, सहाय्यक निवडणूक निरीक्षक आर आर किलचे, डी एन इंगोले, आर व्ही भगत, रवी निलावार यांनी निवडणुकीचे काम पाहिले. निवडणूक प्रक्रिया ही मतपत्रिकाद्वारे पार पडली. यावेळी निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

# पोषण पखवाड्यात महिला बालकल्याण विभाग राज्यात दुसरा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ एप्रिल**

हिंगोली जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाने ११९७ अंगणवाड्यांमधून तब्बल ७४ हजार उपक्रम राबवून राज्यात दुसरा क्रमांक मिळविला आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांच्या मार्गदर्शनात जिल्हा परिषदेने पहिलेच मोठे यश मिळवले आहे.

राज्यातील सर्व जिल्ह्यांमधून जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाच्यावतीने दि ८ एप्रिल ते २२ एप्रिल या कालावधीत पोषण पखवाडा राबवण्यात आला आहे. या उपक्रमात पोषण आहाराच्या संदर्भातील विविध उपक्रम यशस्वीपणे राबवून त्याची माहीती शासनस्तरावर दररोज सादर करण्याबाबत सूचनाही देण्यात आल्या होत्या. त्यानुसार हिंगोली जिल्ह्यात जिल्हाधिकारी राहुल गुप्ता आणि मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांच्या मार्गदर्शनाखाली उपमुख्य कार्यकारी अधिकारी गणेश वाघ, बालविकास प्रकल्प अधिकारी राजकुमार धापसे, सानीका सोरेकर, संगीता इंगळे, आर आर मगर, विवेक कुमार वाकडे यांच्या मार्गदर्शनाखाली ११९७ अंगणवाडी मधून विविध उपक्रम राबवण्यात आले आहेत. यामध्ये प्रामुख्याने मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांच्या सुचनेनुसार कर्करोग संशयीत महिलांच्या आरोग्य तपासणीबाबत प्रत्येक गावात जनजागृती करण्यात आली आहे. याशिवाय पोषण रॅली, स्वस्थ बालक व बालिका स्पर्धा, बालकांची आरोग्य तपासणी, गरोदर मातांची आरोग्य तपासणी, महिला मेळावे, पोषण आहार पाककृती प्रदर्शनी, मुलींच्या जन्माचे स्वागत, गरोदर महिला ओटीभरण, बालगोपाळ पंगत, गृह भेटी या उपक्रमांचा समावेश आहे.

हिंगोली जिल्ह्यातील सर्वच अंगणवाडीमधील अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून या कालावधीत तब्बल ७३ हजार उपक्रम राबवण्यात आले. या उपक्रमांची दररोज वरिष्ठ स्तरावर छायाचित्रांसह माहीती सादर करण्यात आली आहे. हिंगोली सारख्या पाच तालुक्याच्या जिल्ह्यात राबवण्यात आलेल्या ७४ हजार उपक्रमांमुळे हिंगोली जिल्हा परिषदेने राज्यात दुसरा क्रमांक मिळविला आहे. यापुढेही नाविन्यपूर्ण उपक्रम राबवण्यावर भर देणार असल्याचे गणेश वाघ यांनी सांगितले.

# हिंगोली जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या अधिकाऱ्यासह चौघांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ एप्रिल**

हिंगोली जिल्हा मध्यवर्ती बँकेत पैसे काढण्यासाठी गेलेल्या पारडा येथील शेतकऱ्यासह त्याच्या भावास जातीवाचक शिवीगाळ करून मारहाण करणाऱ्या बँकेच्या अधिकाऱ्यासह चौघांवर शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार हिंगोली तालुक्यातील पारडा येथील शेतकरी चांदू वाघमारे व त्यांचा भाऊ हे दोघे दि १५ एप्रिल रोजी जिल्हा मध्यवर्ती बँकेत पैसे भरण्यासाठी गेले होते. यावेळी त्याठिकाणी मोठ्या प्रमाणावर गर्दी होती. पैसे भरण्याची स्लिप भरण्यावरून चांदू वाघमारे व बँकेचा सेवक शेख मुनीर यांच्यात वाद झाला. शाब्दीक चकमकीनंतर शेख मुनीर यांनी चांदू वाघमारे यांच्या तोंडात चापट मारली. यामुळे चांदू यांच्या तोंडाला दुखापत झाली. सदर भांडव सोडविण्यासाठी चांदू यांचा भाऊ मध्ये पडला असता बँकेचे अधिकारी व तसेच कर्मचारी शेख मुनीर, काळे, पवार यांनी त्यांना बँकेच्या बाहेर काढले. त्यानंतर चौघांनी मिळून चांदू यांचय भावाला जातीवाचक शिवीगाळ करून मारहाण करण्यास सुरूवात केली. या मारहाणीमध्ये त्यांच्या तोंडाला गंभीर दुखापत झाली त्यानंतर त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली.

दरम्यान, या मारहाणीत बँकेचे कर्मचारी काळे यांच्या डोक्याला मार लागला असून तेही गंभीर जखमी झाले आहे. बँकेचे अधिकारी यांनी सकाळीच तब्बल ७०० शेतकऱ्यांना स्लीप वाटप केले असून पीकविम्याचे पैसे काढण्यासाठी शेतकऱ्यांनी बँकेत व परिसरात मोठी गर्दी केली होती. कायदा व सुव्यवस्था बिघडू नये तसेच बँकेचे व्यवहार सुरळीत पार पडावे यासाठी बँक प्रशासनाने खबरदारी घेण्याचा प्रयत्न केला मात्र अचानक झालेल्या वादामुळे तसेच त्यानंतरच्या मारहाणीमुळे एकच खळबळ उडाली होती. घटनास्थळी पोलिस दाखल झाले होते.

याप्रकरणी चांदू वाघमारे यांनी शहर पोलिसांत दिलेल्या तक्रारीवरून बँक अधिकाऱ्यासह चौघांवर जातीवाचक शिवीगाळ करणे व मारहाण करण्याच्या आरोपावरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास शहर पोलिस करीत आहेत.

# हिंगोली रेल्वे स्थानकावर संकट कालीन बचाव प्रशिक्षणाची संयुक्त मॉक ड्रिल







**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ एप्रिल**

येथील रेल्वे स्थानकावर रेल्वे अपघातबाबत नांदेड रेल्वे मंडळ आणि एनडीआरएफ यांच्याकडून संकट कालीन बचाव प्रशिक्षणाची संयुक्त मॉक ड्रिल आयोजित करण्यात आली होती. अत्यंत चित्त थरारक पध्दतीने सर्व यंत्रणांनी त्यांची जबाबदारी ओळखत या प्रशिक्षणात सहभाग नोंदविला. सकाळी ९ ते १२ यावेळेत हे प्रशिक्षण पार पडले. हे प्रशिक्षण पाहण्यासाठी मोठ्या संख्येने नागरिकांनी गर्दी केली होती.





हिंगोली रेल्वे स्थानकात दि २२ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजता संकट कालीन बचाव प्रशिक्षणाला सुरूवात झाली. यावेळी नांदेड रेल्वे मंडळाचे अधिकारी, एनडीआरएफचे अधिकारी व कर्मचारी यांच्यासह शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक नरेंद्र पाडळकर व त्यांचे पथक, नगर पालिकेचे अधिकारी व कर्मचारी तसेच अग्नीशमन दलाचे अधिकारी व कर्मचारी, आरोग्य विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

सकाळी प्रशिक्षण सुरू झाले. यावेळी रेल्वे स्थानकाचा संपूर्ण आढावा घेण्यात आला. त्यानंतर रेल्वेच्या एका बोगीला आग लागल्यानंतर ही आग विझवण्यासाठी एनडीआरएफ, अग्नीशमन दलाचे अधिकारी, कर्मचारी यांनी शर्थीचे प्रयत्न केले तर बोगीत अडकलेल्यांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यासाठी संबंधित प्रशिक्षणार्थी मोठ्या धैर्याने पुढे जात असतांना तसेच स्ट्रेचरवर आणून परिसरात उभ्या असलेल्या आरोग्य विभागाच्या रूग्णवाहीकेपर्यंत आणतांना दिसत होते. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी रेल्वे पोलिस, स्थानिक पोलिस यांनी त्यांचे काम पार पाडतांना दिसून आले. तब्बल तीन तास चालू असलेले हे प्रशिक्षण अत्यंत सुनियोजितपणे आणि सुरक्षितपणे पार पाडण्यात यंत्रणांना यश आले. यावेळी सर्व यंत्रणांचे उपस्थित अधिकाऱ्यांनी कौतुक केले.